REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० ३ माह जूंन सन १८७७ इ० | अंक २२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### विविधज्ञानविस्तार.

मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ............ | ३—० |
| मागाहून. ........ | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपालहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

☞ मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे, विशेषतः संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. पुढील मजकुरास आपल्या सुंदर पत्रीं जागा मिळावी अशी विनयपूर्वक प्रार्थना करितों.

जामोद तालुके जळगाव एथील मराठी शाळेंत तारीख २१ माहे मे सन १८७७ इसवी रोजीं सायंकाळीं सुमारें पांच वाजतां सभा भरली होती सभेची जागा चांगली सुशोभित केली असून लोकांस व्यवस्थेशीर बसण्या करितां बैठक चांगली केली होती. ह्या सभेची खटपट करणारे रा. रा. मार्तंड रंगनाथ हेड मास्तर व एथील गणपती पाटील हे दोन गृहस्थ होते. यांच्या मेहेनतीनें गांवांतील संभावीत गृहस्थ शेट सावकार पाटील पांडे भिक्षुक व इतर लोक मिळून सवाशें जमले होते. सर्व लोक जमल्यावर हेड मास्तर यांच्या सूचनेवरून एथील रहाणारे व वऱ्हाडांतील पहिले बी. ए. रा. रा. हरी रामचंद्र गोहणखेडकर यांणीं मुख्य स्थान स्वीकारिलें. नंतर हेड मास्तर यांनीं सभेचें कारण असें दर्शविलें कीं, रा. रा. हरी रामचंद्र बी. ए. हे प्रथम आपल्या ह्या शाळेंत विद्यार्थी होते व ह्यांनीं मोठे श्रम करून विद्याभ्यास केला व बी. ए. ची परीक्षा दिली हें सर्वांस समजण्याकरितां व ह्यांचा कित्ता सर्वांनीं घेण्याकरितां हा आजच्या सभेचा उद्योग केला आहे. त्यांचें भाषण आटोपल्यावर बी. ए. यांनीं चार विषयांवर भाषण केलें. पहिला विषय, लोकांचें कर्तव्यकर्म, दुसरा— सृष्टींतील पदार्थांची उत्पत्ती, तिसरा— विद्यावृद्धीपासून फायदे, व चवथा—आई बापांनीं लहानपणीं मुलांस कसें वागवावें, अशा ४ विषयांवर सुमारें दोन तास सुरस व प्रौढ भाषण करून त्यांनीं लोकांचें मनावर चांगला ठसा उमटवून दिला. हें झाल्यानंतर पुन्हा हेड मास्तर यांनीं हरी रामचंद्र यांची विद्वत्ता, सभेपासून फायदे, व सर्व लोकांनीं आपल्या मुलांस विद्या शिकवावी अशा विषयावर मनोरंजक भाषण केलें. नंतर पान सुपारी वगैरे होऊन सभा विसर्जन झाली. पत्रकर्ते महाराज, आमच्या ह्या जामोदवासी लोकांस हा पहिलाच प्रसंग. ह्या गावीं शाळा होऊन बरेच दिवस झाले परंतु सभा काय ती हीच व हें कृत्य पाहून सर्वांस आनंदही झाला. ह्यास कारण आमचे एथील हेड मास्तर होत. यांचे खटपटीनें ही सभा झाली व ती फारच चांगली झाली अशाबद्दल सर्व लोकांनीं व बी. ए. नीं ह्यांचे आभार मानिले. अशा सभा जर एथें नेहमीं होत जातील तर हल्लीं आहे त्या पेक्षां चांगली सुधारणा होऊन लोकांच्या रीतिभातिही सुधारतील ह्यांत संशय नाहीं. पत्र विस्तार फार झाला ह्याकरितां पुरें करितों कळावें लोभ करावा ही विनंती.

एक
सभासद

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. एडिटर साहेब नव्या बातमीदारास नवीन व पहिलीच बातमी दुःखाची देण्याचा प्रसंग आला तो असाः—

आपल्या अकोलें तालुक्यांत उगवें म्हणून एक मोठें खेडें गांव आहे तेथें लोकवस्ती पुष्कळ असून बिच्याऱ्या त्या बापड्यांवर शुक्रवारीं दिवसा बारा वाजल्यानंतर एकाएकी कहर गुदरला.

शेतांत कोणी एक अविचारी तुच्छविहीन पशूनें पल्हाट्याचे गंजास अग्नि लाविला. त्यावेळीं वायू त्यास अनुकूल होऊन आधींच खेडें गावांत झोपड्यांची संख्या विशेष असल्यानें एका मागून एक ओळीनें घरें जळण्यास आरंभ झाला. दिवसाचा समय असल्यानें घरांतून जीव घेऊन पळण्यास पुष्कळ दीन दुबळे, बालकें, स्त्रिया इत्यादिकांस फावलें, तरी शेवटीं एक मनुष्य अग्निराजास बळी गेलाच. नवीन बांधलेलें शालागृह व सुमार १० १२ धाबीं व कवेलूचीं घरेंवगैरे अग्निराजानें उदरांत घेतलीं. अनेकांचा सर्व मालाचा सत्यानाश झाला. असो. हे दुःखद वृत्त कशामुळें घडून आलें असावें ! पाण्याचा पुरवठा फारच फार कमी यामुळें. अकोल्याचे उत्तरेस जीं कांहीं गावें आहेत तीं बहुधा अशींच किंबहुना यापेक्षां अधिक संकटाचीं आहेत. तेथें एखादा मारवाडी नवाच मरुद्देशांतून आला तर त्यास स्वदेशांतच असल्यासारखें वाटेल. यास्तव पुढील सोयीकरितां सरकारांतून तलाव बांधण्याची योजना चालली आहे. जवळच एथून आगर, कंचनपुर म्हणून बिनपाण्याचीं गावें आहेत. त्यांच्या दरम्यान नदीचें पाणी कोंडून बंधारा अगर तलाव करावा अशाविषयीं खटपट सरकारी युरोपियन कामगार करीत आहेत. ही स्तुत्य गोष्ट आहे अलं.

एक नवा बातमीदार.
भ.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. बरेच दिवस आपल्या भेटीस आलों नाहीं याचें कारण ( हल्लीं मी वऱ्हाडांत नाहीं हो ! ! ) साल मजकुरीं या महाराष्ट्रांतील दुष्काळांत वास्तव्य करितों. इकडे लोकांची जी विपत्ती आहे तो अनेक पत्रांतून प्रसिद्ध झाली तरी आपण हल्लीं लिहिल्या मजकुराचा आव्हेर कराल असें नाहीं.

साल मजकुरीं पर्जन्याच्या कमतरतेमुळें सोलापुर, पुणें, नगर, कानडा वगैरे जिल्ह्यांत व मद्रास इलाख्यांत जसा काळाच' कडाखा उडाला आहे असें आमचें सरकार समजतें तसा आमच्या सातार जिल्ह्यांत उडाला असून आमचें सरकार या जिल्ह्याविषयीं मात्र कां निष्ठूर झालें आहे हें समजत नाहीं. सोलापुर जिल्ह्याप्रमाणें आमच्या जिल्ह्याची स्थिति असून लोक विपत्तिग्रस्त अन्न अन्न करीत भटकत आहेत. या पाटण तालुक्याविषयीं सरकारचें मत असें आहे कीं हा तालुका मुल्यांतिल डोंगरी असल्यानें लोकांस पीक आलें. परंतु काय सांगावें ! ! एकेकास जमीनींत धान्य तर काय पण ताटही सांपडलें नाहीं. वसुलाचा पैसा माफ होईल म्हणून आशा बाळगून होते परंतु सूट मिळाली नाहीं आणि साल मजकूरीं नोटिस फी व प्रोसेस फी मात्र ज्यास्त द्यावी लागती. वेळेवर पैसा न मिळाल्यामुळें असा प्रसंग येऊन हल्लीं नंबर जप्त करून लिलावाची सुरुवात झाली आहे.

गरीब लोक कुळकरण्याच्या तोंडाकडे जप्तीच्या वेळीं व नंबर लिलावाच्या वेळी पहातात, मामलेदारास पदर पसरतात, कलेक्टरास अर्ज द्वारें विनवितात परंतु दाद घेतो कोण ? पैसा वसूल करणें हा मुख्य अधिकाऱ्याचा धर्म. गरिब गुरीब मुक्यांतील अजाण लोक पुत्रशोकाप्रमाणें शोक करून स्वस्थ रहतात. सरकारानें प्रथम मुद्दाम कारकून नेमून पीकपहाणी करविली व लोकांस कांहीं तरी माफी मिळेल अशी आशा दर्शविली. पहिला हप्ता द्यावा अशी लोकांस समज देऊन निमें वसूल प्रथम घेतला तेव्हां दुसऱ्या हप्त्याच्या सुटीविषयीं आशा होती ती हल्लीं नष्ट होऊन जप्त्या व लिलाव सुरू आहेत "तस्मात प्राक्तन हें समर्थ बळिये ललाट रेषा खरी" या मंत्राचा जप सुरू आहे.

पत्रकर्ते महाराज आपण सुकाळांत असल्यानें जरी आमच्या पाटण तालुक्यांतील लोकांच्या दुःखाचा ठसा तुमच्या हृदयावर बठणार नाहीं तत्रापि जर प्रत्यक्ष अवलोकन कराल तर त्यांतून अश्रु[illegible] गळल्या खेरीज रहाणार नाहींत असें मी जाणतों. प्रातःकाळापासून प्रहर रात्रपर्यंत दारातलें भिकार तुटत नाहीं. ज्यांच्या पूर्वजांनीं भिक्षा मागितली नाहीं ते दीन वाणी अन्नार्थ दुसऱ्याच्या दारीं उभे राहू लागले, ज्यांच्या अंगा दोन गड्यांचें बळ तो रस्त्यानें काठी धरून भेलकांडत चालतो. रानांतील मडाचें पीठ, भुईफोड, उंबरांचीं फळें, करवंदें वगैरे पदार्थांनीं आजपर्यंत जीव रक्षण केलें पण आतां नाहीं हो नाहीं ! ! ! लवकर पाऊस न पडल्यास रस्त्यावरून प्रेते दृष्टीप्रत्तास येतील यांत संशय नाहीं. भिकार फार झाल्यानें भीक घालावी तरी कोणाला? ( भरली मूठ सवा लाखाची ) चार दाणेही त्याच्या पदरीं जाणें कठीण ! !! लोक अन्ना करितां रस्त्यांतून सावकार लोकांचे पाय धरतात त्यांच्या बीभत्स शिव्या सोसतात, नाकें घासतात, पदर पसरतात आणि यदा काच

च असे ह्मणतात ( जो व्यापारी तो किती दयावंत हे लिहिण्यासच नको ) हर ! हर ! हे साल कठिण ! लोकांचे दुःखास पारावार नाहीं.

आपण शंका घ्याल कीं दयाळू सरकारानें दुष्काळ संबंधी लोकांची कांहींच दाद घेतली नाहीं. तर तसें नाहीं हो? वठहुकुम व सर्क्युलरें यांची कुळकर्ण्याच्या दप्तरी भवर फल झाली "दुष्काळानें कोणी मरेल तर सर्व अधिकाऱ्यास जबाबदार धरलें जाईल असे सक्त हुकुम" मास्तर लोकांसही या बाबतींत हुकूम अनाथ व्यंग असला निरुपयोगी लोकांच्या निर्वाहाचा समाचार घ्यावा. नसल्यास तालुक्यास पाठवावे पाटील कुळकर्णी याणी त्यास अन्न द्यावें ( पाटील माहाचें पीठ व कुळकर्णी भिक्षुकी यावर निर्वाह करणार त्याणी पदरचें प्रथम अन्न द्यावें कोठून? ) व त्याच्या चौकशी करितां भीक कारकून, वेर्लीफ, मास्तर, पोलिस, पाटील कुळकर्णी, स्पेशल अमलदार मामलेदार अवल कारकून चीफ वगैरे चौकशी कर्ता असून अनाथीण लोक मरूं नयत असा बंदोबस्त ठेवावा त्यांनीं अन्न द्यावें ही गोष्ट इतिहासाला रसभरीत झाली परंतु खरी लोकांची वाट सरकारास समजत नाहीं इतके अमलदार चौकशीस नेमल्यापासुन अनाश्रितांस आश्रय काय होईल तो होईल. सध्या घरंदाज लोकांस मात्र नरता काळ आला आहे तो असा "एका गृहस्थास ३६० मा मर्ह होते रोज एक भेटीस येई यामुळें आपण उपास करून त्यास पोटास घालीत असे अशानें त्रासून त्यानें देशत्याग केला" "नित्य नवा नवरा" कुळकर्णी सर्वांचा तावेदार येणारे ते सर्व रावसाहेब तेव्हां त्यानें कोणा कोणाला पुरावें

हे आपणच मनात आणा ह्मणजे झालें पत्रविस्ताराबद्दल माफी असावी. कळावे तारीख १९ माहे मे सन १८७७ इसवी.

तुमचा बातमीदार
मुरेकर

---

## वऱ्हाडसमाचा

मिति अधिक ज्येष्ठ वद्य ७ शके १७९९

**दुःखाची गोष्ट**—हैदराबाद सरकारचे वऱ्हाडाविषयींचे मागण्याबद्दल विलायत सरकारानें नुकताच त्यांस अखेरचा जबाब दिला कीं, तुमचा वऱ्हाडावरील हक्क आह्मास बिलकूल मान्य नाहीं याविषयींचे कागदपत्र अजून बाहेर पडले नाहींत.

---

## दुष्काळ व सरकारचें आणि लोकांचें औदार्य.

गुदस्त सालीं पर्जन्य न पडल्यामुळें दुष्काळ पडला तेणें करून अर्ध्या हिंदुस्थान देशास मोठी विपत्ती प्राप्त झाली तिला ७।८ महिने होत आले ईश्वराचे कृपेनें तो काळ बदलण्याचा आतां सुमार आला आहे ह्मणजे पाऊस पडण्याची सुरुवात झाली तेव्हां मजूर कामावर ठिकठिकाणी लागलेले लोक व गाव सोडून परागंदा झालेले लोक आतां माघारे जाऊं लागले आहेत ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. आतां लवकरच दुष्काळग्रस्तांस सहाय करण्यानिमित्त सुरू असलेलीं सरकारी कामें बंद होतील व लोक आपआपले बारमाही धंद्यास लागतील.

प्रसंगानें कांहीं कांहीं नव्या गोष्टी व मनुष्यें नावारूपास येत असतात व कांहींचें खरें स्वरूप कळत असतें तसा प्रकार या दुष्काळाचे संबंधानें उघडीस आला आहे त्या विषयीं दोन शब्द लिहूं.

जुन्या काळच्या पुराणांतील गोष्टीविषयीं आह्मांस कांहीं सांगावयाचें नाहीं. तेव्हां राजे स्वदेशीय होते, देशांत द्रव्य विपुल होतें, व राजा कर्णासारखे उदार पुरुष दाते होते त्यामुळें त्या वेळीं दुष्काळ पडले तरी लोकांची निकृष्ट स्थिति फारशी होत नसेल असें वाटतें, कारण तसें पुराणांतरी कोठें वर्णन नाहीं. दुर्गादेवीच्या दुष्काळाबद्दल इतिहासांत विशेष माहिती नाहीं, तरी एका ब्राह्मणनीनें साऱ्या महाराष्ट्र देशाचें संरक्षण केलें असें आपण ऐकिलें आहे. पण ७० वर्षांपूर्वी महाराष्ट्र देशांत दुष्काळ पडला होता तेव्हां लोकांची काय दशा झाली तिचें वर्णन प्रसिद्ध कवि राम जोशी बावा यांनीं एका लावणीत केलेलें आहे ती लावणी चवथे पृष्ठावर आह्मी आज छापिली आहे ती वाचकांनीं पाहिली ह्मणजे त्या वेळची भयंकर स्थिति त्यांचे मनांत येऊन अंगावर शहारे उभे राहतील यांत संशय नाहीं त्या काळीं महाराष्ट्र देशांत पेशव्यांचें राज्य होतें व त्यांचा मोठा जलशा होता. आणि अशा ब्राह्मणशाई राज्यांत प्रजेचे दुष्काळामुळें अतिशयित हाल झाले, कित्येकांनीं जीव दिले, कित्येक धर्मभ्रष्ट झाले, कित्येकांच्या स्त्रियांवर यवनांचे जुलूम झाले ही भयंकर स्थिति मनांत आणिली असतां हल्लीं परमेश्वरानें आपणास इंग्लिश सरकारचे अमलांत ठेविलें आहे हें त्याचे मोठे कृपादान समजलें पाहिजे.

पाहा! इंग्लिश सरकार आपले जातीचें, गोताचें, धर्माचें, अथवा देशचें नव्हे, केवळ मुसलमाना सारखे आपणा पासून वेगळें व त्यांच्या पेक्षां हजारो कोस दूरचें असतां त्यांनीं रयतेस पुत्रवत मानून सर्वांचें पालन केलें ही केवढी मोठी गोष्ट आहे! दुष्काळांत अन्न न मिळाल्याच्या कारणानें एकही प्राणी मरण पावला जाऊं नये, व ज्या अधिकाऱ्याच्या सुस्तीमुळें तसा कोणी मरण पावेल तर त्यावर सरकारची मोठी इतराजी होईल असे हुकूम इंग्लिश सरकारानें प्रसिद्ध केले ते वाचकांस माहित असतील. तसेंच बंगाल्यांतील दुष्काळा करितां सरकारानें साडेसहा कोटि रुपये खरचले हेंही आमचे वाचकांस ठाऊक असेल. आतां मजूरीचे पैसे देण्यांत काट कसर झाली ही मुळांत कांहीं गडबड नसून अधिकाऱ्यांच्या मतभेदानें झाली व असे प्रकार पुष्कळ होतात या विषयीं उदाहरणार्थ लांब जावयास नको. मुंबई इलाख्यांत दुष्काळांत सापडलेले सुमार तीन लक्ष लोक कामावर लागले आहेत व मद्रास इलाख्यांत सुमार आठ लक्ष लोक कामावर असून अपंग व अनाथीं अशा साडेतीन लक्ष मनुष्यांस धर्मार्थ अन्न देण्याची नित्य तजवीज चालू आहे. हें औदार्य मद्रासचे गवरनर ड्यूक आफ बकिंगहाम यांचें होय. व त्याच्यास प्रमाणें मुंबई सरकारचें मत असतें तर इकडेही तितक्या लोकांचा निर्वाह सरकारानें सुखानें होऊं दिला असता. पण ही अधिकाऱ्याच्या स्वतांच्या विचाराची गोष्ट आहे, एथें मुख्य सरकारचें कांहीं नाहीं. तेव्हां असें उदार व रयतेचा जीव बचावणारें सरकार आपणास मिळालें आहे ही उत्तम गोष्ट खरोखरच आहे व यावरून आपण असाही सिद्धांत करूं कीं, इंग्लिश सरकारचें राज्य चिरकाल राहिलें तर असे भयंकर प्रसंग कितीही आले तरी रयतेनें डग मागण्याचें कांहीं कारण नाहीं; तथापि तसे दुष्ट प्रसंग न यावेत असें ईश्वराजवळ आमचे मागणें आहे. अस्तु.

वरील हिशेबावरून पाहतां इंग्लिश सरकारचे कृपादानानें आज सुमार १९ लक्ष मनुष्य उदरपोषण करीत आहे. व त्यांत आपल्या पुढील सुखाकरितां बहुत सोयी करून ठेवित आहे. तालुक्यांतून या गावाहून त्या गावास शेकडो सडका होऊं लागल्या आहेत, शेकडो तलावांचीं कामें चालू आहेत, जुने तलाव दुरुस्त करीत आहेत, नद्यांना धरणें करित आहेत, गारदौंडाकडे व हुबळीकडे दोन मोठाल्या रेल्वे सुरू झाल्या आहेत इत्यादि देशसुधारणेचे व दुष्काळशमनाचे अखंड व अक्षय फायदे पाहून इंग्लिश सरकाराविषयीं कोणाही विचारी पुरुषाचें अंतःकरण सद्गदीत झाल्यावाचून व त्याचे नेत्रांतून आनंदाश्रु आल्यावाचून राहणार नाहींत.

या दुष्काळ प्रसंगानें संस्थानिक, धनाढ्य लोक, व इतर परोपकारी प्रजा यांचेंही औदार्य लोकदृष्टीपुढें पुष्कळ आलें ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. शिंदे सरकारानीं कित्येक ठिकाणीं अन्नछत्रें घालून हजारो लोकांचें पोषण केलें. काठेवाडांतील संस्थानिकांनीं हजारो रुपये रिलीफ फंडाकडे दिले. मुंबईचे शेट मुरारजी गोकुळदास यांचे प्रयत्नानें हजारो रुपये गरीब लोकांच्या कामास आले. शहरोशहरीं लोकांनीं वर्गण्या जमवून अनाथ देशबांधवास सहाय केलें. याचीं उदाहरणें पुणें, सोलापुर, नगर, पंढरपुर, इंदापुर इत्यादि कित्येक ठिकाणचीं वाचकांस ठाऊक असतील च व या सर्वांविषयीं विचार केला ह्मणजे लोक आपलीं कर्तव्यकर्में बरींच जाणूं लागले आहेत व आपली भूतदया योग्य प्रसंगीं प्रकट करूं लागले आहेत ही एक महत्तम गोष्ट समजली पाहिजे. व यावरून कोणत्याही कामीं प्रजा खरोखर गांजली ह्मणजे खरे देशहितेच्छु असेच पुढें येऊन ती गांजणूक दूर करण्यास झटतील व कृपाळु परमेश्वर त्यांचे प्रयत्नास येश देईल अशी उमेद बाळगुन आह्मी हा लेख पुरा करितो.

---

## साऱ्या वऱ्हाडाचें सदरस्टेशन अकोल्यास अवश्य असावें.

सरकारांत हल्लीं अशी वाटाघाट चालली आहे. ह्मणतात कीं उमरावतीस व अकोल्यास अशा दोन ठिकाणीं जीं मुख्य मुख्य आफिसें आहेत तीं एके जागीं करावीं. आणि असें करण्यांत सोय हाच मुद्दा असावा असें वाटतें. ह्मणून त्यासंबंधानें आह्मी आज दोन ओळी लिहिल्या तर निरर्थक होणार नाहींत, व वरिष्ठ अधिकारी त्या विषयीं योग्य विच्यार करतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

साऱ्या वऱ्हाडाच्या मुख्य कचेऱ्या एके जागीं करावयाच्या ह्मणजे त्या मध्यावर असणें फार अवश्य आहे. व तो मध्य अकोल्यास जसा आहे तसा उमरावतीस मुळींच नाहीं. उमरावतीपासून वऱ्हाडची हद्द उत्तरेस १८ कोस, पूर्वेस १० कोस, पश्चिमेस ६० कोस व दक्षिणेस ५६ कोस आहे. तसा प्रकार अकोल्याचा नसून ते चारी बाजूनें मध्यावर आहे व तेणेंकरून रयतेची मोठी सोय आहे. गरीब रयतेला आपले कामा साठीं फार लांब जाणें येणें पडूं नये व सरकारासही साक्षीदार, कैदी वगैरे लोकांचे कामीं भत्याचा निरर्थक अधिक खर्च पडूं नये या साठीं मुख्य कचेऱ्यास जेवढा मध्य साधेल तेवढा साधणें फार अवश्यकतेचे, दूरदृष्टीचें व दयाभूतपणाचें काम आहे.

दुसरें, कोणी कोणी असें ह्मणतात कीं उमरावती मध्यावर जरी नाहीं तरी रेलवेचें तेथें स्टेशन असल्यामुळें एका बाजूस असल्याची अडचण मनांत आणावया जोगी नाहीं ह्मणून तेथें ठाणें करावें परंतु तें ह्मणणें दुरुस्त नाहीं. कारण अकोल्यास वऱ्हाडांतील मुख्य रेलवे आहे तशी उमरावतीस नाहीं, उमरावतीस वेगळी रेलवेची शाखा आहे त्या कारणानें सहज तास दोन तासांचा खोळंबा होतो ही रयतेस व रयतेपेक्षां सरकारी अधिकाऱ्यांस मोठी गैरसोय आहे. उपरावती एथून सुमार २९ कोस आहे त्या मानानें एकच रेलवे सरळ असती तर तीन तासाचा वेळ बस झाला असतां पण बडनेऱ्या पासून रेलवेचा वेगळा फाटा असल्यामुळें ५॥ तास लागतात ही गोष्ट मनांत आणली तर अकोल्या पेक्षां उमरावतीसच सदर स्टेशन असावें असें ह्मणणारांचा मुद्दा केवळ व्यर्थ होतो असें आह्मांस वाटतें.

तिसरें, उमरावतीची छावणी रयतेस व सरकारी नोकरी करणारास किती गैरसोयीची आहे व अकोल्याची किती सुलभ आहे यांचा विच्यार ज्यांनीं दोन्ही जागच्या कचेऱ्या पाहिल्या आहेत त्यांच्या मनांत तात्काळ आल्यावाचून रहात नाहीं. उमरावतीच्या कचेऱ्या गावांपासून सुमार अडीच मैल लांब असून मध्यें एक लहानसा डोंगर आहे त्यामुळें त्या लांबीचें व त्या चढावाचें दुःख हल्लींच शेकडो लोकांस भोगावें लागतें तें कदाचित सर्व क

चेन्या तेथें गेल्या तर सहस्त्रावधी लोकांस भोगावें लागेल सबब तसें न होईल तितकें चांगलें.

कोणी ह्मणतात उमरावती शहर मोठें असून तेथें व्यापार चांगला आहे याजकरितां तेथें सदर स्टेशन असावें. पण आह्माला वाटतें कीं, सरकारच्या मुख्य कचेऱ्यांस ही मोठीशी जरूर आहे असें नाहीं. मानेफळास व बुलढाण्यास मुख्य कचेऱ्या झाल्या त्या ते गाव मोठे व्यापाराचे ह्मणून झाल्या नाहींत. अकोला जिल्ह्यांत खामगाव मोठी व्यापाराची जागा आहे ह्मणून तेथें जिल्हा कचेरी झालेली नाहीं. याच न्यायानें उमरावती व्यापाराचें मोठें गाव आहे ह्मणून तेथें सर्व कचेऱ्या ठेवाव्या हें ह्मणणें बरोबर नाहीं. उमरावती शहर मोठेंच आहे ह्मणून सदर स्टेशन तेथें न ठेविल्यानें तर त्यास कांहींही उणें होणार नाहीं, आणि अकोल्यास तें ठेविल्यानें हें शहर वाढून कालांतरानें मोठें होणार आहे. हा वऱ्हाडास अधिक फायदा आहे. सर्व कचेऱ्या अकोल्यास आल्यानें हें शहर वाढल्यावाचून राहील अशी कोणास सहसा शंका येऊं नये. कारण अर्ध्या कचेऱ्या एथें आलेल्या आहेत त्या योगें दहा वर्षांत या शहराची सुधारणा किती झाली व तें कसें वाढलें हें सर्वांस सहज दिसत आहे.

याजकरितां अकोल्यास सर्व मुख्य कचेऱ्या ठेविल्यास सरकारचा हेतु व रयतेची सोय हीं दोन्हीं उत्तम प्रकारें सिद्धीस जाणार आहेत. वस्तीच्या आणि पाण्याच्या संबंधानें पाहिलें असतां अकोल्याची छावणी चांगली सोयवार दिसते, लाखो रुपये खर्चून नवीन बांधलेल्या एथें सरकारी इमारती आहेत. नदी आहे व हवाही उमरावतीपेक्षां कांहीं मात्र वाईट आहे असें आह्मास वाटत नाहीं. कदाचित थोडी गुणाकडेच अधिक असेल तथापि या कामांत आमचें मत कांहीं उपयोगी नाहीं. स्यानिटरी कमिशनर मे० आबट साहेब इकडील पूर्ण अनुभवी यांचें मत या कामांत विशेष ग्राह्य आहे सबब सरकार त्यांस विचारीलच. व बाकी वर सांगितलेले सर्व प्रकार मनांत आणील आणि अकोल्यासच सदर स्टेशन करील असें आह्मास वाटतें.

हा मजकूर लिहून गेल्यावर कालचा उर्दू अखबार आह्मी पाहिला त्यांत एथील हैस्कुलाकरितां स्वतंत्र इमारत बांधण्याचा बेत असून तो गवनमेंट पर्यंत आला आहे व तसें झाल्यावर ज्या मोठपाठ्या बराका आहेत त्या नवीन येणाऱ्या आफिसास उपयोगी पडाव्या असें त्यांत उद्धृत केलें आहे. परंतु आवई खालीं तो मजकूर लिहिला आहे ह्मणून त्यावर आह्मास विशेष भरंवसा ठेवतां येत नाहीं. तरी चोहोंकडून असे विचार चालून अकोल्यास सर्व आफिसें येण्याची गोष्ट घडून येवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## वऱ्हाड

गणपतराव नाटे होऊं लागला आहे. फार ताप होतो, तरी रात्रीं लवकरच थंडावा येतो व उत्तरावा मनस्वी वारा वाहतो. आंब्याची सुगी मोठ्या झपाट्यानें चालू आहे. शेंकडों गाड्या नित्य येतात व तितक्यांचा नित्य खप होतो. आंब्याची स्वतांईही पुष्कळ आहे. रोगराई कांहीं नाहीं. दोन आठवड्यापूर्वीं महामारीचा उपद्रव झाला होता त्याचा आतां मागमूस नाहीं, व वरसातही लवकरच सुरू होईल असें दिसतें.

रा. रा. लक्ष्मीपति नायडू बारिष्टर सिमल्याकडे गेले होते असें समजतें. व त्यांनां कांहीं नोकरी मिळण्याचें संधान आहे असें ह्मणतात.

उमरावतीच्या कमिशनर कचेरींतील ६० रुपयांचे क्लार्क रा. रा. सदाशिव शास्त्री यांणीं पेनशनाचा अर्ज केला असें समजतें. त्याचप्रमाणें उमरावती मिडल क्लास स्कुलांतील ४० रुपयांचे फर्स्ट असिस्टंट रा. रा. गंगाधर रामचंद्र जोशी हेही पेनशनाकरितां डाक्टरचें सर्टिफिकिट मिळवून डायरेक्टर साहेबांकडे पाठविण्याचे तयारीं आहेत असें समजतें.

एप्रिलमहिन्याचे अखेरीस रेलवेचें वेळापत्रक बदलून भुसावळेकडील गाडी अकोल्यास दिवसां ११ अवर ४ मिनिटांनीं येण्याचा ठराव झाला आहे पण त्याप्रमाणें एक दिवसही कधीं घडून आल्याचें दिसत नाहीं, त्यामुळें लोकांची व्यर्थ कुचंबणा होते व कधीं कोणी उशिरानें गाडी येते या धोरणानें उशीर करून गेला तर त्याची गाडी चुकते. सबब रेलवेनें नियमितपणा राखण्याचें मोठें अगत्य आहे.

चक्रवर्तिनी साहेबाच्या वाढदिवसानिमित्त काल सरकारी आफिसांनां सुटी होती.

खानबहादुर नवाब शाबुदिन साहेब उमरावतीचे असिस्टंट कमिशनर यांचे तीर्थरूपास हैदराबाद येथें इंग्रजसरकाराकडून दिल्ली दरबार संबंधांत "इंतिजाम जंग हस्त हजारी ,, असा किताब मिळाला. हे अर्काटच्या राजघराण्यांतील पुरुष आहेत व याच कारणाकरितां त्यांचे चिरंजिवास प्रथम ईकडे अव्वलचीची जागा मिळाली.

गेले मंगळवारीं भुसावळ व वरणगाव यांचे दरम्यान मालाचे गाडीस आग लागून दोन डबे जळाले त्यामुळें रस्त्यास हरकत होऊन दोन प्रहरीं येणारी गाडी संध्याकाळचे ९ वाजतां आली.

व्यापारी लोक रेलवे स्टेशनावरील आपलीं धान्याचीं पोतीं गावांत परत आणून साठवून ठेवण्याचे उद्योगास लागले आहेत. रेलवेच्यानें लोकांचा सर्व माल नेवावला नाहीं ह्मणून सर्वत्र बरीच गडबड झाली व त्यामुळें व्यापारांत उलाढाल झाली, त्यास उपाय नाहीं.

म्युनिसिप्यालिटीचे नियमांत असें कलम आहे कीं, कोणी मनुष्यानें सार्वजानिक रस्त्यावरील आपलें घर रांडा रहाण्याचें किंवा वाईट चालीचें स्थळ, अगर जुगाराचा अड्डा असें करूं नये. त्या आधारें अकोल्यास ठराव झाला कीं, प्रसिद्ध रस्त्यावरील घरवाल्यांनीं आपलीं घरें अशा कामाला देऊं नयेत व त्यावरून प्रसिद्ध रस्त्यावरील ज्या ज्या घरांतून रांडा रहात आहेत त्यांच त्यांचे मालकास तशा मजकुराच्या नोटिसा झाल्या आहेत.

इलिचपुरास बैलाचे गाडीं खालीं चेंगरून छोटीबाई नावाचे लकेरीवालीची ६ वर्षांची मुलगी मरण पावली याजबद्दल बाईच्या सहीचें गेले आठवड्याचे वऱ्हाडसमाचारांत एक पत्र प्रसिद्ध झालें आहे तें आमचे वाचकांचें पहाण्यांत आलें असेल. बाईनें लिहिलें आहे कीं त्या गाडींत मोठमोठाले चीफ व दरोगे होते व मजे मुकद्म्याची चौकशी आजवर झाली नाहीं, परंतु तेथील वऱ्हाडमित्र नावाचे वर्तमानपत्रावरून आह्मांस स्मरतें कीं त्या गोष्टीची चौकशी तेथें सुरू झाली होती व तिचा आहवाल व गाडींत भले गृहस्थ होते त्यांचीं नावें त्यांत पुढें येणार होतीं पण त्या नंतर हा वेळपर्यंत त्या पत्रांत कांहीं आल्याचें आह्मास आठवत नाहीं. बाई ह्मणते त्याप्रमाणें बडे लोकांच्या चैनीच्या गाडी खालीं जर तिची मुलगी खरोखर चेंगरली गेली व पुढें मरणही पावली तर त्या बिचारीची आमच्या बंधूनीं दाद लावावयाची होती, पण तसें कां झालें नाहीं कोण जाणे! बडे लोकांनीं गाडींत रांडा घेऊन चैनीस निघावें आणि त्यांच्या संसर्गांत गरीबास मरण प्राप्त व्हावें आणि त्याची बाईच्या ह्मणण्याप्रमाणें दादही लागूं नये. असें असेल तर ही मोठी दुःखाची गोष्ट समजली पाहिजे. छोटीबाई ह्मणते कीं, माझी फिर्याद पोलिस सुपरइंटेंडेंट साहेबांनीं तिजवर स्टांप नाहीं ह्मणून परत केली पण आह्मास ही गोष्ट खरी वाटत नाहीं, कारण जेथें सदोष मनुष्यवध हा गुन्हा झाला आहे तेथें त्या गोष्टीची पोलिसचे मुख्य अधिकाऱ्यास कोणीही खबर दिली तर ती त्यानीं ऐकणें त्यास भाग आहे व त्या कागदास टिकिटाचें कारण पडूं नये असें आह्मांस वाटतें. मग कदाचित चौकशी होऊन निकाल झाला असेल व साहेबांस बाईनें उगीच त्रासकारक अर्ज केला असेल आणि तो घेण्याचें कांहीं कारण राहिले नसेल ह्मणून सु. सा. नीं कदाचित तिचा अर्ज परत केला असेल तर तसें तिला कळवावयाचे तरी होतें. व त्यांचें खात्यांतील चिफांचा त्या गोष्टींत संबंध होता सबब साहेबांनीं त्या कामीं अधिक लक्ष्य पुरवावयाचें होतें, पण शेवट पर्यंत कसें काय झालें तें आह्मास समजलें नाहीं, याजकरितां आमचे तेथील प्रिय बंधु या गोष्टीचा खुलासा लिहितील तर बरें होईल.

त्या जिल्ह्यास फार हुशार व चलाख असे नवा. मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर आहेत व ते रयतेचें हार्द चांगलें जाणतात असें आह्मास ऐकून ठाऊक आहे सबब छोटीबाईनें वर्तमानपत्रांत गिल्ला करण्यापूर्वीं त्यांकडे हें गाऱ्हाणें न्यावयाचें होतें ह्मणजे त्यानीं लागलींच तिची दाद घेतली असती पण तसें तिनें केलें किंवा नाहीं हें आह्मास ठाऊक नाहीं सबब निकाल सहित तेथील वर्तमानपत्रांतून अगर सरकारांतून तरी हें प्रकरण प्रसिद्ध व्हावें ह्मणजे फार चांगले होईल व तेणेंकरून तिकडील अधिकाऱ्यांविषयीं बाईच्या लेखानें लोकांचा उगीच गैरसमज होऊं पहात आहे तो दूर होईल.

## वर्तमानसार

गेल्या आठवड्यांत मद्रास इलाख्यांत बराच पाऊस पडला, दोन तीन महिने पुरेल असें तळ्यांनां पाणी आलें ही आनंदाची गोष्ट हिंदुस्थान सरकारानें विलायतेस कळविली.

हिंदुस्थान सरकारानें सर रिचर्ड टेंपल साहेब याजविषयीं दुष्काळ संबंधानें जे उत्तम मत प्रदर्शित केलें तें विलायत सरकारास मान्य झालें असें त्यांनीं तारेंतून कळविलें आहे.

चक्रवर्तिनी साहेबांच्या वाढदिवसाचे प्रसंगीं लोकांस कांहीं पदव्या व मान देण्याचा बेत होता तो कांहीं कारणानें जानेवारीचे पहिले तारखेपर्यंत तकुब ठेविला आहे.

ग्रीस देशांतील बातमी आली आहे कीं तुर्कस्थानाविरुद्ध लढण्यास उठण्याची तेथें गडबड आहे.

जूनचे दुसरे तारखेस रशियनबादशाहा फौजेचे मुख्य तळावर स्वतां जाणार होते. त्यानंतर डान्यूब नदी उतरण्याची सुरवात मोठे कडेकोट रीतीनें होणार.

जर्मनीचे मुख्य प्रधान प्रिन्स बिस्मार्क बर्लीन शहरास गेले आहेत.

तुर्कस्तानांतील किल्ला अर्दाहान हा तेथील गवर्नरानें रशियाच्या स्वाधीन होऊं दिला याबद्दल त्याची कोर्टमार्शल बसउन चौकशी सुरू आहे.

इराणच्या बादशाहाकडून तुर्कस्थानास पत्र आलें आहे त्यांत त्यानी मोठा भरंवसा दाखविला आहे असें कळतें.

टर्कीचे लोखंडी पत्र्याचें एक मोठें जहाज इब्राहिला येथें रशियन लोकांनीं समुद्रांत बुडवून टाकिलें.

अफगाणिस्थानच्या राज्यापैकीं चौघे वारसांस तूर्त हिंदुस्थानामध्यें ब्रिटिश सरकाराकडून नेमणुकी मिळत आहेत:—

१ सरदार जलालुद्दीनखान यांस रावळपिंडी एथें ठेविलें आहे. हा सरदार अकबरखान ज्यानें सर विलीयम म्याक्नाटन यांस ठार मारिलें त्यांचा मुलगा आहे; याचें शेरअली खान यांच्या मुलीशीं लग्न झालेलें आहे. तेव्हां हा काबूलच्या हल्लींच्या अमिराचा पुतण्या असून जांवईही आहे.

२ सरदार महंमदशेरीफखान यांस नैनीताल एथें ठेविलें आहे. हा शेरअलीखानांचा सख्खा बंधु आहे. हा पूर्वीं फरा आणि गिरिस्क या प्रांताचा मुखत्यार होता. हा काबूलच्या सर्व सरदारांत अग्रगण्य आहे ज्यांनीं वारंवार अमिराचा व त्यांचे विरुद्धपक्षचा स्वीकार केला त्यांतील हा मुख्य आहे याचे दोघे पुत्र नुकतेच काबुलांत परत गेले आहेत.

३ सरदार अहंमदखान यास जलंदर एथें ठेविलें आहे. हा शेअर अलीखानाचा सावत्र बंधु आहे. हा हल्लीं सुमारें चाळीस वर्षांचे वयाचा आहे. ब्रिटिश लोकांची मर्जी संपादन करून काबुलची गादी मिळवावी अशी याची इच्छा नाहीं असें नाहीं.

४ सरदार याकुबखान यास जमु एथें ठेवलेलें आहे. हा काबूलच्या अमीराचा चुलता आहे.

काबुलांतील दोघे सरदार हल्लीं रशियन सरकारच्या राज्यांत असून समरकंद एथें आहेतः—

१ सरदार अबदुल रहिमानखान हा माजी अमीर अफजुलखान याचा ज्येष्ठ पुत्र असून करम एथील एका सरदाराचे मुलीपासून याचा जन्म झालेला आहे. व हा बुखाऱ्याच्या अमीराचा जांवई आहे.

२ सरदार इशाकखान हा माजी अमीर अझीम खान यांचा मुलगा आहे. इसवी सन १८६८ मध्यें शेअर अलीखान याजवर यानें बंड करून लढाई केली होती परंतु तींत अपयश आल्यामुळें तो रशियाचे राज्यांत पळून गेला.

वृ. धा.

## लावणी.

( रामजोशी यांची दुष्काळावरील )

इगाश्रमसिवाउगाकशाला युगांतखळहाकली ॥ कळीमातलासारा धनदाराइच्छीराज्यासहिहाकली ॥ ध्रु० ॥ कुणानकुणिधणी मनायेइलतसें जनासिजनवंचिती ॥ धनानिमित्तें मरती कितिगरतिधरूनि यवनअभचारिती ॥ अठादिसामधि पठाणतिंदालुटावयाधांवती उठावयालातकवा नाहींबकासारा धणिचाकग्झुंजती ॥ दारबिसघरदार दिलेंतरि मारचुकेनाती ॥ कारवदुंमिकाई बधिल्याहोगाई बाटविल्याद्विजसती ॥ फंदमातलेधुंदझालिबेवंदबुडालीक्षिती ॥ मंदकरितिमसलतीला मगफसलीतिला नावरितां फळभोगिती ॥ पुंडघरोघरि बंडकुणाबर दंडकोणबांधिती ॥ खंडकुणाचागावा कुणिझ्पावदावा कुणींकुणालाकिती ॥ असानकोणी पुसावयाला कसाकाळकशिगती ॥ बसावयानचजागा मगपागागजरथ बागाकुटें राहती ॥ चिकाआंतज्या निवयापढविल्या पिकाशिंगळलाविती ॥ विकावयायानेल्या किमेल्याअबळा अंतरल्याजनचुंबिती ॥ फांसगळयामधि बासपाठिवर लोहहडालाविती। मासविप्रचोवर्चेतोकाचावाविती सांडसघेउनिहातीं ॥ धीरवीरहंबीरहोउनी फकिरभीकमागती ॥ चीरनसेहोंआंग किंतिसांगावातेतापजिवालागती ॥ हातेंधरुनिदेवताफोडिल्या लतारामभंगिती ॥ गतायुकितिझाले कितिप्यालेविषकिति उरलेसुखसेविती ॥ चाल ॥ किती सागरउदकेंकुटुंबसहवाहले, कितिदेवगतीनेंकाशीसहिपावले ॥ कितिकर्नाटकदेशांनधनिकधावले ॥ कितिअन्नुचेजनतेथचिभांबावले ॥ कैकांनींहिरेवचनागकैफ वावले ॥ कितिउठाउठीभयभीतमरण पावले ॥ कितिब्राह्मणगालहीयवनांनींचावले कावले जनकरतीलकांगावले ॥ अतिसात्विकतेदुष्कर्मींसरसावले ॥ किती फंदकरितितेबंदांतचघातले ॥ चाल ॥ कायसमयहल्यारुद्रकरिदयादृष्टिझाकली ॥ भयनकाक्षितिझालीघरघालीरुद्रविंशतिजगींफाकली। उगाभ्र० ॥ १ ॥ रुसानकालिवरपुसामनाला कसाकाळहातरी ॥ असाजनक्षयकांहो कुणिपाहिःसंशय कथितोयाचेवरी ॥ धराधीश कुणि परासह्मणती कगपातकेंवरीं ॥खराब जननिजकर्में करितिअधर्म राजाचीअफतरी बापतयालातापवृद्धपणि पापपुत्रहाकरी ॥ शापदेतसेतोही ह्मणेनोहिमाझावीर्यजहातरिअरी मायटाकिलीपायबांधुनी बायकोसिघेशिरीं । होयकशाचाबेटतोपेटाग्यांतुनिसापकाढिला वारे सूनबहिणसासु जेह्मणतीतिशिसुतवास नाघरी ॥ भवनबुडेपापानें मधुपानिमातुनि मायसुतालावरी ॥ मनींधरुनिकामिनीमठामधिं मुनीविनयचातुरी । जगींदाविताबा परीआंतुमिकावा भोंदुनिखातीपुरी ॥ लेशनसेउपंदशअपुला देशटाकुनीदुरीं ॥ केशवार्चनकरती वर्तीपरिआंतुनि कर्मेनानापरी ॥ असेधूर्तजेतूर्तजगामधि मूर्तपापचवघरी पुर्तिमखादिकयांचित्रयाचीकर्में ह्मणूनकाहो खरीं ॥ वित्तहरितिनिरनिमित्तठेउनि चित्त अर्थयावरी ॥ मत्तधन्याशीचोरी करिती अधिकारी दयाकोठुनभुसुरीं ॥ सतीह्मणतिनिजपतीनिजपतीस्यजूनि नांदतीपराचेघरीं ॥ निवेमारितिभर्ते त्यावर्तेदुसरे करितिकितिसुंदरी ॥ चाल ॥ कितिकन्या हयविक्रयेंपरमपातकी एकाचीवृत्तिएकासकरिघातकी ॥ कितीदुर्मतिनेगुरुपत्नीलाहाटकी कितिजारणमारणउच्चाटणनाटकी ॥ कितिकांचीवाणीमृषावदुनिहालकी ॥ धनियास पालखिचाकरासनालकी ॥ कुणिविधवाठेवितिघरामधिपाणकी ॥ मित्रांसवंचितीमग कोठुनिभावकी ॥ अशीकितिपापैंजगींकुणाठाउकी ॥ चाल ॥ जराकयास्तव करावयास्तव जरामतीसजःकली ॥ कराश्रवणहो याचें व्हायाचेंऐशी विधिवाणी भाकली ॥ २ ॥ उगाभ्र० ॥ चिन्हबाटतें भिन्नपुढ तेज खिन्नजाहलेमर्नीं ॥ भिन्नदेहाकितिकरतो कितिभरितीपोटें स्नानहीकंटाळती ॥ पहाकितिकजन महागाइनें दाहीदिशाधुंडुनी ॥ अहोशेवटींमेले कितिगेलयम लोकांशिगणवेकुर्णीं ॥ भणाणसारादणाण झाला कणानपावतीसर्णीं ॥ कुणासनमिळेभाजी कुणिराजीकरडी मिळोअमडीजुनी॥ मुरकचढतीकुणी भूकह्मणतीद्विज आधुकतशाब्राह्मणी ॥ कुकगिशारशाला कुणीत्यालाउभेराहुंनदेतिअंगणीं ॥ कढीह्मणतिकुणीवडीघालती उडीअन्नपाहुनी ॥ रढावितातिकितिपोरें कितिढोरेंतैशीं ओढितिदागंतुनी ॥ पाकहानहोहाकमागिती भाकर द्याह्मणउनी ॥ टाकमुखामधिकांहीं मजनाहींह्मणती अन्नपंधरादिनीं ॥ जळापिउनि किती नळांतफुगले पळांतपुयागुनी ॥ गळापडुनिकितिरडती कितिमरतीबाळक मुडदेकवटाळुनी ॥ क्षुद्रइतरजेशूद्रतयांवरिरुद्र कोणयाक्षणीं ॥ मुद्रसेकचात्याला भलत्याला भाकर मागती— मुखपसरुनी ॥ चणाअगरनाचणाएकादा धणामिळत्यांतुनीं ॥ उणादिवाळिदसरा कितिदुष्काळाचा घसराध्यापाहुनी ॥पीठडाळकुठें मीठदिगावरि नीटपडतिजाउनी ॥ धीटसोशितिकाठीं परिपाहिंसोडितिनचमेल्यावाचूनी ॥ चाल ॥ कांरेतिलकायहे अन्नादिणगांजली ॥ हीदुनियासारीजठराग्नींतभाजली ॥ नचमाधुकरीलाकोणितदालाजली ॥ वचीतीशंतीचखलांतराडमाजली ॥ धनीकाचदिलितअपणांतचसामावली ॥ शेवटिविळेपळीदिवेलावणीबाजलीं ॥ यावायेउनियादेवाकांगांजली ॥ कैकांनींकुटुंबेंविषपाजुनिनिजविली ॥ हीदुष्काळाची बरी नौबदवाजली ॥ वर्णावीह्मणु नेयांकविमतिलाडाजली ॥ चाल ॥ काळकठिणदुष्काळउडालाकाळरीतिठाकली ॥ बाळवृद्धलोकांहीकुठेकाहींतरिहोमर्यादाराहिली ॥ ३ ॥ उगाभ्रमसि० ॥ सुधीह्मणतिनिरवधीकाळया मध्येंदिडपायली ॥ कधींएकिलिचीपटी कधीनिपटकोळवीं चोळवींकधिंपाहिली ॥ जुनाजिन्नसवरी उणावाटकठेंकुणांतपतराहिली ॥ मणासरुपयेतेरा तेलालावरा तुपा शपतवाहिली ॥ गुळअसोतोळाभरआहेकीं मूळमिठाचीडली ॥ खुळलवंगा पैशाच्यासंवंगा मिरचीपांचदिधली ॥ हुजूरवाणी रुजूतराजू खजूरीतिएकली ॥ खिजुनिघेतीपैसा देतिलहोकेसा माखलीनचजीभली ॥ गहूंह्मणतीजिन्हूसवंगते नवचिपर्टीजाहलीं॥ नवेमऊजेदाणेबेदाणेझाले अशीदशासाहिली ॥ मकारांडही अकाइलापारि शिकाकोठडीकेली ॥ नकोद्राडएरंडी हेरंडीअठाचिपटीं कधिंऐकिलीं ॥ दुकाळयामाधिवकाळमंडळी ठकापरिसठकभली ॥ दुकानघालुनि बसती वरिदिसतीनिर्मळघातुकतावाइली ॥ नितळसोनिया पितळह्मणती निजपितळपुतळिआटिली ॥ कुतळवुडविलेसारे हीवारे वेळाचे सराफालाधिली॥सारहिऱ्याला गारह्मणती सोनारदेतपावली ॥ चारशेरतांब्यालाकांभ्याला ह्मणेकासार देतआधिली॥ पुरेकाळहा नुरेयोग्यता विरेनिघुनिचालली । अहोशालुच्याफरदा चवलीचाखुर्दाकायगोष्टचांगली ॥ चाल ॥ हेराहोभाजीतबागवानजोडका ॥ पैशाचाएकचिमुळाएकदोडका ॥ पैशासमक्याचाकंदएकमोडका॥ हा कांदर्दापैशासएकबोडका ॥ जळणासरुपायाएकलहानखोडका ॥ घोड्यासशिपाईका यकरीलबोडका ॥ काळानेंदेशयापरिकेलारोडका । मगहत्यारगजउपायकायथोडका। खाऊनिनावदह्मणोनयेगोडका चाल अजातरिपुहप्रजाइतःपरमजावृष्टिशिरकली ॥ दुजीआसनकविरायाचीकृतियेथुनीउरकली !। ४ ॥

ने. ओ.

## नोटिसा

मामोजी वलद बाबनजी मेहेतर तेली रहाणार कसबे पनज तालुके अकोट यास खालीं सही करणार मंजाई ज्वजे मामोजी तेली हल्लीं रहाणार कसबे अकोट इजकडून देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून आपल्यास एक मूलआहे.हल्लीं तीन वर्षेंझालीं तुह्मीं मजला वागवीत नसोन अन्नवस्त्र वगैरे कांहींच देत नाहीं. मी आपले बापाचे घरीं राहून निर्वाह केला. आतां माझा बाप मरण पावला. मजला आतां कोणी पालन करण्यास राहिलें नाहीं सबब तुह्मास कळविण्यांत येतें कीं, तीन वर्षांचे खावटीबद्दल १२० रुपये कलदार देऊन आतां मजला तुह्मी आपले घरीं घेऊन जावें. तीन वर्षें माझा संसारही गमाविला. खावटीचे रुपये देऊन मजला संसार मार्गास लावावें व ही वर्तणूक सदरील नोटिस तुह्मास पावल्यापासून पंध्रा दिवसांत करावी. जर याप्रमाणें तुह्मी न केल्यास मुदतीनंतर मी कायदेशीर रीतीनें दुसरा नवरा करून संसारास लागेन व तुमच जबबदारींतून मोकळी होईन. आणि नोटिशिचे खर्चासुद्धां खावटी घेण्यांत येईल. कळावें तारीख २७ माहे मे सन १८७७ इसवी.

(सही) मंजाई जवजे मामाजी तेली.
बस्ती अकोट निशाणी
हातची बांगडी.

नोटिस

देवीदत्त हुकुमचंद साहू दुकान कारलें प्रगणे अडगाव जिल्हा अकोला यास खालीं सही करणारयाजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मास शेतें २६०० रुप यास विकत दिलीं तीं अशीं:—

कारल्याचीं शेतें ५ व पिंपळ खेड्याचीं शेतें २ अशीं ७ शेतें आमचे नावें करून देण्यासाठीं तुह्मास दोन च्यार वेळा भेटलें परंतु तुह्मी लोटाळोटी करीत गेला यांत नीट निघणार नाहीं ह्मणून या नोटिशीनें कळवितों कीं, ही नोटिस पोचल्या पासून १५ दिवसांचे आंत आह्मांस दिलेलीं शेतांचा खातां आमचे नावें करून द्यावीं नाहीं तर आह्मी तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशाचे खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेऊं. कळावें तारीख ३० माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) मंगळचंद राधाकिसन
रहाणार सोनाळें
तालुके जळगांव
दस्तूर खुद.

नोटिस

उखाजी वलद कानुजी तायडे वस्ती धामणगाव गौतमाऱ्याचे तालुके जळगाव यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून मला ३ वर्षें टाकून दिलें मी आपले मामाचे घरीं तेव्हांपासून आहे कियेक वेळा आणून घातले असतां तुह्मी दारू पिऊन मस्त होऊन वाटेल तिकडे फिरता माझे पोट पाण्याची सोय लागत नाहीं यास ३ वर्षांचा खर्च माझे मामासचुकून देऊन मला आज पासून ८ दिवसांत घेऊन जावे याप्रमाणें न केल्यास मी दुसरा पाटाचा नवरा करीन मग तुमचा मजवर लग्ना संबंधी हक्क रहाणार नाहीं याप्रमाणें एक अंक रजिस्टर करून तुह्मास पाठविला आहे कळावें. तारीख १० माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) निशाणीची बांगडी निवी
मर्द उखा वलद कानू
माथणी तालुके
खामगाव.

हें पत्र अकोला एथें ... छा० त खंडेराव बाळाजी ... प्र. केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० १० माहे जून सन १८७७ इ० अंक २३

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | रुपये |
|---|---|
| रा. रा. कृष्णराव सखाराम पो. इ. | ३० |
| ,, गणेशसिंग दलसिंग रजपूत | ६०८ |
| ,, वामनरावजी पाटील | ६०८ |
| श्रीमती लक्ष्मीबाई देशमुखीण | ६०८ |
| रा. रा. यशवंतराव गोविंदराव देशमुख | १३ |
| ,, वामन बापुजी लिमये मास्तर | १०८ |
| ,, सेक्रटरी जळगाव लायब्ररी | ४ |
| ,, दादापांडे दानापुरकर | ६०८ |
| ,, धोंडो त्रिंबक क्लार्क | २७०८ |
| ,, उदेभान देशमुख डोंगरगाव | १३०२ |
| श्री. रा. रा. रामचंद्रराव आपासाहेब | ६०८ |
| मे. अबदुल रहिमान कोतवाल | १००२ |
| ,, सिकंदरखा हबीबखा मक्तेदार | ९ |
| ,, अबासबेग हुसेनबेग खतीब | ७ |
| ,, बेल सा. जुडिशियल कमिशनर | ६ |
| रा. रा. सितळसिंग नायबतहशि० | ६०८ |
| ,, तुकाराम पाटील पिलकवडीकर | ६०८ |
| ,, सेक्रेटरी यवतमाळ लायब्ररी | ६०८ |
| ,, बळवंत व्यंकटेश मास्तर | ६०८ |
| ,, रघुनाथ मोरेश्वर मास्तर निंबे | ६०८ |
| ,, चिटणीस श्रीबालाजी लायब्ररी | ६०८ |
| ,, लक्ष्मणसिंग बाळाराम तहशिलदार | २६ |
| ,, गणेश अनंत मास्तर तळेगाव | १० |
| ,, धोंडो बापुजी किडे कारंजे | ६ |
| ,, दुलिचंद ओंकारदास साहू | ६०८ |
| ,, श्रीकृष्ण देवराव देशपांडे | ६०८ |
| ,, श्रीराम भिकाजी इन्स्पेक्टर | ५०६ |
| ,, बजाबा रामचंद्र डे. ए. इ. | ६ |
| ,, बुटाजी देशमुख झिसांगकर | १० |
| ,, एजंट न्यू ब्यांक बांबे शाखा खामगाव | ५०५ |

## नोटिसा

गणपतराव नारायण वकील रहाणार वडनेर तालुके दर्यापुर यास लखाजी वल्लद हरबाजी नार वस्ती मौजे सावरगाव तालुके अकोट याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी स्वतां एकीकडे राहून रावजी वल्लद महादाजी आंधिही रहाणार सावरगाव यास बहिवटदार नमूद करून त्याचे सहीची नोटिस तारीख २ माहे मे सन १८७७ इसवीचे वर्तमानपत्रांत दिली तिचे उत्तर येणेंप्रमाणें:—

१ मौजे सावरगाव तालुके अकोट एथील सर्वे नंबर ३६ चें शेत पांच वर्षांचे करारानें तुम्हापासून वहीतीस घेतलें त्यापैकीं तीन वर्षें भोगलीं व दोन वर्षें भोगावयाचीं राहिलीं आहेत तीं पुरीं झाल्यावाचून सदर्हू शेत आपणास परत मागण्याचा हक्क नाहीं.

२ सदर्हू शेताबदल स्वामित्व कबूल केलें ती रकम तुह्मास पावली आहे. किंबहुना हिशेबाअंतीं तुमची रकम वजा आतां माझेंच घेणें तुम्हाकडेस निघेल. तम्ही नोटिसींत साऱ्याशिवाय कांहीं पावलें नाहीं म्हणून लिहिलें आहे हें मोठें आश्चर्य आहे.

३ कोडत खुलें झालें म्हणजे फिर्याद करूं म्हणून सूचना लिहिली त्यास उत्तम आहे आपण फिर्याद केल्यास मी जबाब देण्यास तयार आहे. वर्षें पुरीं झाल्यावाचून तें शेत सरकारही परत देवविणार नाहीं. हें आपणही समजत असालच. विनाकारण फिर्यादीचा खर्च बुडून आमचा खर्च आपणास द्यावा लागेल.

——

येणेंप्रमाणें नोटिस दिली ती आपणास कळावें. विनाकारण मजला उत्तर द्यावें लागलें त्याजला खर्च लागेल तो माझे घरीं पाठवून द्यावा, नाहींपेक्षां फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील आपणास कळावें. तारीख ६ माहे जून सन १८७७ इसवी.

(सही) लखाजी वल्लद हरबाजी नार
वस्ती मौजे सावरगाव ता.
अकोट
दस्तूर खुद्द.

---

### नोटिस.

गंगाई मर्द पुंजाजी माळी हल्लीं मुक्काम दहिहांडे तालुके अकोट इला खालीं सही करणार पुंजाजी वल्लद यादोजी माळी रहाणार बोरगाव तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं मला तारीख २९ माहे एप्रिल सन १८७७ इसवीचे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली तिचे उत्तर खालीं लिहिल्याप्रमाणें:—

तूं नोटिसींत जो मजकूर लिहिला आहेस तो सर्वथैव खोटा आहे तूं आमचे एथून तुझा बाप मूळ आल्या कारणानीं रवाना झाली असून रीतीप्रमाणें तुझे बापानीं आणून घालण्याचें असून तसें केलें नाहीं ह्मणून आह्मी दोन वेळा आमचे चुलत्या स मूळ पाठविलें तरी तूं आली नाहींस हा अपराध तुझा आहे तूं खोटसाळ मानसाचे नादीं लागून आपले प्रपंच्याचा हाणी करून पहातोस हें रास्त नाहीं नोटिस दिली ह्मणजे माझा हक्क तुजवरचा गेला असें नाहीं तूं खर्च मागतेस परंतु तो तुला मिळणें नाहीं. यास्तव तुला कळविलें जातें कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आमचे घरीं येऊन नांदावयाप्रमाणें न केल्यास रीतीप्रमाणें तुला ताब्यांत घेण्याविषयीं दावा करून ताब्यांत घेतली जाशील लुच्या सोद्यांच्या नादीं लागून आपले इजतीची हाणी करून घेणें असेल त्यासही आह्मी राजी आहों पोटखर्च आमचे एथें आल्याशिवाय बिलकूल मिळणार नाहीं व तू आपली नोटिस हीच फारकत समजून गंधर्व करशील तर फौजदारी मुकदमा होऊन तुला, त्या गंधर्वाच्या नवऱ्याला व तुझे मदतगार लोकांनां जेलांत जावें लागेल हें खूप समजावें. कळावें तारीख २ जून सन १८७७ इसवी.

( सही ) पुंजाजी वल्लद यादोजी माळी निशाणी खुद्द

---

### नोटिसीचा जबाब

सलावतदीन वल्लद अबदूलनबी मुजावर वस्ती कसबे हिवरखेड तालुके अकोट जि. अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतो कीं तुह्मी ता. ७ माहे एप्रिल सन १८७७ इसवीची नोटिस दिली त्याचें उत्तर आह्मी दिलें. त्याचें प्रत्युत्तर तारीख १२ माहे मे सन १८७७ इसवीचें तुह्मी दिलें ह्मणून त्याचा जबाब हल्लीं देण्यांत येतो तो असा—

शेतीचे नंबर तुमचे हिश्शाबद्दल चतुर्थांश सर्वे नंबर १२० पैकीं तुह्मी गहाण ठेविला त्याचे दस्तैज दोनमधे त्याबद्दल नोटिसांत तुह्मी जवारीबद्दल लिहिता व रुपयाबदल लिहिता त्यांत तुमचे दस्तैवजांत शेतीविषयीं जवारी व रुपये देण्याचा संबंध कांहीं नाहीं. एका दस्तैवजांत हिसा दीड तिफणचा दोन सालापासून आमचे तांबेत असून त्याचा वाहून पेरून आम्ही उपभोग घेत आलों. दुसरे दस्तैवजांत हिस्सा एका तिफणचा सनमजकूरचे चैत्र शुध्ध १ पासून आम्ही आपले तांबेत घेतला. हल्लीं वाही ह्मणजे किस्तकारी करणें सुरूं आहे तेव्हां दोन्ही दस्तैवजाची जमीन आमचे तांबेतच आहे. तुमच्या एका दस्तैवजांत रुपये देण्याचा करार पौश शुध्ध १चा असून दुसऱ्यांत मिती माघ वद्य ५ चा आहे. सदर्हू दोन्ही दस्तैवजांत करारास रुपये न दिल्यास शेताचा उपभो तुह्मी घेत असावे असें लिहिलेलें असून वर लिहिलेले करारास तुह्मी रुपये दिले नाहींत ह्मणून सनमजकूरचा उपभोग घेण्याचा हक्क आह्मास आहे. दुसरें तुह्मी लिहिता कीं, जमीन तुह्मी ठेविता किंवा दुसऱ्यास विकूं असें पंचमार्फत ठिरविलें असें लिहिता त्यास तुह्मी कोणत्याही प्रकारें आह्मास लिहिलेले करारावर रुपये पटविले नाहींत आणि तुह्मी लिहिता कीं सावकार नामे चतुर्भुज केवलराम गुमास्ते साहू याचे दुकानीं रुपये ठेविले तर ती रकम सावकाराचे एथें ठेवण्यास कारण काय ? त्या सावकाराचा गुमास्ता नामे गणोबा आमचे जवळ असें बोलला कीं आमचें नाव बदलाम करण्याचें कारण काय, आमचे एथें रकम ठेविली नाहीं. दुसरे जवारीचें कारण तो दस्तैवज तुमचे नावें नसून तुह्मी लिहिता हा मुळींच तुह्मास उपयोग नाहीं ज्याचा दस्तैवज आहे त्यास आह्मी जवारी व रुपये दिले. दुसरें तुह्मी लिहिता कीं, ती शेती आह्मी दुसऱ्यास फरोक्त केली. तेव्हां जोंपर्यंत आमचे हक्क तांबेतील आदा होई तोंपर्यंत तुमचा हक्क नाहीं व घेणाराचा हक्क त्या मालावर कायम नाहीं. आमची ज्या दिवशीं दस्तैवजांत लिहिलेल्या शर्तीप्रमाणें आदाई होईल तेव्हां तुमचा हक्क त्यावर कायम होईल तेव्हां तुह्मी विकण्यास पात्र आहा तोंपर्यंत विकले जाऊं सकत नाहीं. सदर्हू जुळले अन्वयें जाणून तुह्मी लिहिता त्यास सदर्हू मालाचे ऐवजाचे तुह्मी मालक नाहीं फक्त तुमचे नावचे दस्तैवज आहेत ते तुमचे इकडून रकम पटून लिहिलेल्या शर्तीप्रमाणें आदाई होईल तेव्हांच तुमचा हक्क पोंचेल. आणि वरकड हिस्सेदाराचे दस्तैवज निरनिराळे आहेत त्यांत लिहिलेले शर्तीप्रमाणें रकम पटल्यास तेही हक्कास पात्र होतील. तोंपर्यंत तेही हक्कास पात्र नाहींत. हल्लीं पावेतों शेती व अमराई वगैरे जे तांबेगहाण माल आमचे ताब्यांत आहे त्यावरून आह्मास फिर्याद करण्याचें कारण नाहीं. नोटिसाचा खर्च मेहेरबानगी करून पाठवून द्यावा नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें. तारीख २ जून सन १८७७ इसवी.

(सही) कादरबेग वल्लद रोशनबेग
वस्ती कसबे हिवरखेड
निशाणी हातची कट्यार.

---

### नोटिस

खानाजी वल्लद बेंडाजी पाटील रहाणार मौजे खानापुर प्रगणे दहिहांडे तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आह्मी तुह्मास शेत २५० रुपयास दिलें होतें त्यापैकीं १२५ रुपये करार टळल्यावर दिले व त्याचे व्याज येणें राहिलें व ऐना पैकी बाकी राहिलेले १२५ रुपये गुदस्ता द्यावे ते अद्याप पावले नाहींत करार होऊन फार दिवस झाले त्यास या नोटिसीनें कळविलें जातें कीं आठ दिवसांचे आंत व्याजासुद्धां व नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व रुपयाची आदाई करावी नाहीं तर सदर्हू शेत तुमचे नावे फरूं न देतां परत घेतलें जाई

ल. कळविले तारीख ६ जून सन १८७७ इसवी.

[ सही ] विठोबा नागोजी कासार साहू दुकान दहिहांडे
दस्तुर खुद

वऱ्हाडसमाचार

मिति अधिक ज्येष्ठ वद्य १४ शके १७९९

## विलायत सरकार.

इंग्लिश सरकारचें राज्यसूत्र चालविण्याचें धोरण मोठें सुरेख आहे. एकावर एक, एकावर एक असे पुष्कळ अधिकारी असून त्या सर्वांवर हिंदुस्थान सरकार म्हणून वरिष्ठ आहे व त्यांनीं सर्वकाल मनास वाटेल तेंच करूं नये म्हणून त्यांच्या कृत्यास व त्यांवर अपील करणारास चांगलें वाईट म्हणण्याची सत्ता विलायतेसही बरीच ठेवलेली आहे ही गोष्ट फार चांगली आहे व यावरून इंग्लिश सरकारची दूरदृष्टी मनांत येते. हिंदुस्थानांत जीं कामें चांगलीं होतात त्यांचा चांगुलपणा विलायत सरकारानें वढून दाखविला म्हणजे यांनां तशा प्रकारचीं चांगलीं कर्मे करण्यास उत्तेजन येतें, व विलायत सरकाराकडून यांच्या कृत्याचा निषेध झाला म्हणजे यांस तशा प्रकारचें कृत्य पुढें न करण्याविषयीं वचक रहातो.

सिव्हिल सर्व्हिसमध्यें भल्या नेटिव गृहस्थास परिक्षेवाचून नेमण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास आहे तरी हें सरकार आजपर्यंत क्वचितच तशी नेमणूक करीत आलें. रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस नाशकास जाइंट जडज नेमिलें हीच काय ती पहिली नेमणूक व तीही अति उत्तम निवडणुकेनें झाली पण ही देखील बहुत सिविल सर्व्हिसवाल्यांस आवडली नाहीं व त्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या या कृत्याबद्दल विलायतेस तक्रार केली तींत नेटिव लोकांच्या वतीनें विलायत सरकारानें चांगलें चित्त पुरविलें व त्या लोकांस जबाब दिला कीं हिंदुस्थान सरकारानें जी गोष्ट केली ती कायदेशीर आधारानें बरोबर केली. या निष्पक्षपाताच्या ठरावाबद्दल आह्मी विलायत सरकारची तारिफ करतों.

फुलर साहेबानें एका गाडीवाल्यास लाथानीं मारलें तेणेंकरून तो मरण पावला, याजबद्दल हिंदुस्थान सरकारानें सर्व युरोपियन लोकांस पुढें तसें न व्हावें ह्मणून चांगला बोध करून अपराध्यास शासन केलें. याबद्दलही कित्येक लोक कुरकुरत होते व त्यांच्या अंगवळणी पडलेल्या रीतीप्रमाणें नेटिव लोकांस मारण्याचा व तुच्छ रीतीनें वर्तविण्याचा आपला क्रम विलायत सरकार तरी हयात ठेवील असें त्यांस वाटत होतें पण आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं विलायत सरकारानें हिंदुस्थान सरकारच्याच मताकडे आपला झोल देऊन युरोपियन लोकांची नेटिवविषयींची तिरस्कारपूर्वक हलकी वर्तणूक सर्वथैव अयोग्य होय असें लिहून कळविलें.

मद्रासेंत वेल्ड नामें एका साहेबानें एका सन्याशाचें प्रेत पुरलेल्या ठिकाणाहून उकरून काढून दुसरीकडे न्यावें अशी त्याच्या मुलास धमकी दिली होती व त्याप्रमाणें तो न वर्तल्यास सरकार मार्फत तें प्रेत उकरवून हगंदारींत नेऊन पुरूं असेंही त्यास कळविलें होतें. गरीब प्रजेवर धर्मसंबंधाचे कामांत अशी नीच रीतीची सक्ती झालेली मद्रासचे थोर मनाचे गवरनर ड्यूक आफ बार्किंगहाम यांस क्षणभर ही मानवली नाहीं व त्यांनीं त्याबद्दल वेल्ड साहेबांस चरचरीत शासन केलें ह्मणजे कांहीं महिने सस्पेंड केलें. ही गोष्ट हिंदुस्थान सरकारास व अखेर विलायत सरकारासही मानवली व त्यांनीं वेल्ड साहेबांस मोठा टपका देऊन मद्रास सरकारची तारीफ केली हें, आमचे वाचकांस कळविण्यास आम्हास संतोष वाटतो.

या तीन गोष्टी हिंदुस्थान सरकारानें रयतेच्या कळवळ्याच्या व फायद्याच्या केल्या व त्यांच्या या कृत्यास विलायत सरकारानें नावाजलें, त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारानें रयतेच्या हिताच्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य करून लोक नको नको ह्मणत असतां लांड रिविन्यु ह्मणजे जमीनी संबंधी पैशाच्या फिर्यादीचा दिवाणीकडील अधिकार काढून मुलकी खात्याकडे देण्याविषयीं एक कायदा केला व तो सुधारण्याविषयीं लोकांस कांहीं आशा नव्हती व ते दिलगीर होते पण विलायत सरकाराकडून हिंदुस्थान सरकारच्या त्या कृत्यास टपका येऊन पूर्वापार चालीविरुद्ध व मुंबई सरकार नको ह्मणत आहे तर तो कायदा जरूरीनें पास करण्याचें कांहीं कारण नव्हतें असें त्यांनीं हिंदुस्थान सरकारास कळविलें हें ऐकून नहुतांस संतोष झाल्यावाचून रहाणार नाहीं.

अशी विलायत सरकार कित्येक गोष्टींत आह्मा गरीब नेटिवांची दाद घेते व आमचा पुस्तपन्हा करिते याजबद्दल आह्मी ईश्वरापाशीं त्यांस सुख व ऐश्वर्य यांची वृद्धि मागतों व असेच रयतेच्या सोईचे व सुखाचे दुसरे अनेक मार्ग खुले करण्यास ईश्वरानें त्यास सद्बुद्धि द्यावी असें इच्छितों.

पार्लमेंट सभेत हिंदुस्थानचे मेंबर असावे व सिविल सर्विसची परीक्षा हिंदुस्थानांत घेण्याची सोय व्हावी. या गोष्टी आजच्या काळास हिंदुस्थानास अत्यंत अवश्यक आहेत सबब सदरील बाबीप्रमाणें याही दोन्ही महत्वाच्या गोष्टीकडे त्यांचें चित्त पुरेल तर देशाचें एक बरेंच मोठें अनिष्ट टळेल सबब इकडे त्यांचें मन लवकर वळेल अशी परमेश्वरानें त्यांस सद्बुद्धी द्यावी म्हणून त्याची आम्ही प्रार्थना करितों.

## इराणची हिरातावर स्वारी.

इराणी लोक मध्य एशियेंत अलिकडे बरीच गडबड करूं लागले आहेत. हल्लीं असें वर्तमान समजलें आहे कीं, ते आपलें सैन्य एकत्र जमवून हिरातवर हल्ला करण्याच्या तयारींत आहेत. या शहरास साऱ्या काबूल देशाची किल्ली असें नाव आहे व तें घेण्याविषयीं इराणी लोकांचा फार दिवसांपासून प्रयत्न आहे. सन १८३८ त त्यांनीं हिरात शहर घेण्याची खटपट केली होती पण तें साध्य झालें नाहीं. सन १८५३ त इंग्लिश सरकारचा व इराणचे शहाचा तहनामा झाला त्यांत ठरलें होतें कीं, शहानें हिरात घेण्याचा यापुढें कधीं प्रयत्न करूं नये परंतु सन १८५६ सालीं त्यांनीं तो तह मोडला व हिरातावर दुसऱ्यानें चाल केली. तेव्हां इंग्लिश सरकारानें इराणाशी लढाई करण्याचा ठराव करून हिंदुस्थानांतून तिकडे फौजा लोटिल्या, त्या बरोबर शहा सल्ला करावयास कबूल झाला. व त्या अन्वयें बगदाद एथें तारीख २ माहे मे सन १८५७ इसवी रोजीं तहनामा झाला. त्यांत इराणानें काबूल देश, हिरात, व त्याच्या आसमंतांतील प्रांत यांवर स्वामित्व करण्याचे आपले सर्व हक्क सोडून दिले व काबुलांतील अंतर्गत स्थितींत आपण आतां कधीं मन घालणार नाहीं असें लिहून दिलें. याच तहनाम्यांत असाही ठराव आहे कीं, इराण व काबूल या दोन सरकारांत कांहीं तक्रार उत्पन्न झाली तर इराण सरकारानें काबूल सरकारावर हत्यार उचलण्याचे पूर्वीं आपली हकीकत दोस्त इंग्लिश सरकारास कळवावी व त्यांनीं त्याची पंचाईत करून निकाल करावा. व त्याकडून कांहीं न होईल तर मग लढाई करावी. इतका प्रकार पूर्वीं झालेला असतां वर लिहिल्या प्रमाणें जर इराणचा शहा हिरातावर चाल करण्याच्या तयारींत आहे ही गोष्ट खरी असेल तर इंग्लिश सरकारास त्यानें जुमानिलें नाहीं असें ह्मणणें भाग आहे. व आह्मांस भरवसा आहे कीं ज्या इराणानें आपणास रशियाचा सख्य संकेती ह्मणविलें आहे त्याला आमचे इंग्लिश सरकार काबूल देशाची किल्ली जें हिरात शहर तें घेऊं देणार नाहींत. आतां इराणच्या फौजेकडे पाहिलें तर तिच्यांत कांहीं पाणी नाहीं, ती केवळ बाजार बुणग्या सारखी आहे तेव्हां तिला रशियन लोक अनुकूळ झाले नाहींत तर काबुलवाले इराणच्या फौजेचा सहज पराभव करतील असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. व इराण सरकारही हिरात घेण्याची गोष्ट केवळ इंग्लिश सरकारच्या व आपल्या तहनाम्याविरुद्ध करीत आहे तेव्हां इंग्लिश सरकारही स्वस्थ बसून इराणास पाहिजे तसे चाळे करूं देईल असें सहसा घडणार नाहीं. दुसरीही एक आधार युक्त खबर अशी समजली आहे कीं काबुलच्या अमीरानें आपला मुलगा याकुबखान यास कैदेंतून सोडिलें व तो हिरातच्या फौजेचें अधिपत्य घेण्याकारितां तिकडे निघून गेला. याकुबखानाच्या मुक्ततेविषयीं कित्येक वेळां खबरा आल्या व त्या खऱ्या झाल्या नाहींत ह्मणून हल्लीचीही खबर खरी मानण्यास विशेष भरवसा येत नाहीं तरी या प्रसंगाचे अनुरोधानें ही खबर खरी मानण्यास पुष्कळ आधार आहे कारण अमीराला इराण स्वारी करावयास येणार असें भय आहे आणि याकुबखानास शत्रुविषयीची चांगली माहिती आहे ह्मणून तो आपले पुत्राला मोकळा करून शत्रूपासून आपलें रक्षण करील हें उघड आहे.

## गहूं.

जानेवारीपासून आलीकडे ३।४ महिन्यांत हिंदुस्थानांतून १६ लक्ष हंड्रेडवेट गहूं विलायतेस रवाना झाले. गुदस्तसालीं साडेसहा लक्ष व तिगस्तसालीं ९२ हजार हंड्रेडवेट रवाना झाले होते. एक हंड्रेडवेट ह्मणजे पक्के ५६ शेर. या मानानें हिशेब पाहिला तर या ४ महिन्यांत सुमार ११२००० खंडी गहूं इकडून विलायतेस गेले. व सालोसाल हें मान वाढत चाललें आहे. आजपर्यंत हिंदुस्थानांतून विलायतेस जाणारा विशेष वर्णन करण्यासारखा पदार्थ ह्मटला ह्मणजे कापूस होता, आतां गहूंही विशेष जाऊं लागला. ज्या मालाचा खप अधिक होतो तो माल अधिक तयार करण्याकडेही लोकांचें लक्ष्य विशेष लागतें तेव्हां कापसाप्रमाणें हिंदुस्थानचे लोक गहूंही विशेष पिकवूं लागतील, व गव्हास शेतें नांगरटीचीं लागतात त्यामुळें जमिनीवर मेहनतही विशेष होईल आणि कुणबी लोक अधिक उद्योगास लागून सुखी होतील ह्मणून पुष्कळ लोक या गोष्टीचा संतोष मानिताहेत. व त्याप्रमाणें घडून येवो असें आह्मी इच्छितों.

सांप्रत प्रांतांतून पडित जमीनी थोड्याच राहिल्या आहेत ह्मणून अधिक माल तयार करण्याला अधिक फाव आहे असें दिसत नाहीं आणि जो माल तयार होणार त्यांतून कोट्यावधि रुपयांचा बाहेर प्रदेशीं जाऊं लागेल तर इकडे गव्हाचें दुर्भिक्ष्य होऊन त्याची किंमत फार चढेल व गरीब गुरीबास सणावारास तरी गव्हाची पोळी खावयास मिळते ती पुढें मिळेल किंवा नाहीं अशा पंचाइतींत कित्येक लोक आहेत. कोणी ह्मणतात कीं कोणत्याही पदार्थाचा व्यापार वाढणें वावगें नाहीं, पण तो पदार्थ देशांत खरोखर विपुल उत्पन्न झाला पाहिजे. तरच त्या व्यापारापासून लोकांस फायदा होईल, नाहींपेक्षां विलायतेस खप आहे या भरावर व्यापारी लोक शेतकऱ्यांपासून पाहिजे त्या दरानें गहूं खरेदी करून पर देशी पाठवितील व मग इकडे त्याची महर्घता होईल.

## वऱ्हाड

निजाम सरकारचे राज्यांतील दुष्काळामुळें त्रासलेले लोक मद्रास इलाख्यांत रिलीफ संबंधीं कामावर जातात तें मद्रास सरकारास पसंत न पडून त्यांनीं निजाम सरकारास लिहिलें कीं तुह्मी आपले लोकांस आपले मुलखांत कामें देण्याची तजवीज करावी, त्यांचा उपसर्ग आमचे इकडे लागू देऊ नये. यावर निजाम सरकारानीं लिहिलें कीं आमचे मुलखांत बहुत कामें सुरू आहेत व त्या कामावर आमची रयत

पु..ळ लागली असून इंग्लिश सरकारची ही हजारों प्रजा येऊन गुजराण करीत आहे, तरी आपले मनांत नसल्यास आपल्या मुलखांत आलेल्या आमचे लोकांस आपण कामास न लाविलें तरी हरकत नाहीं. पुढें हिंदुस्थान सरकारानें या गोष्टीचा असा निकाल केला कीं निजाम सरकारच्या हद्दीच्या फार जवळ मद्रास इलाख्यांत कामें चालवू नयेत ह्मणजे तिकडील लोक फारसे येणार नाहींत, व जे कामावर लागले आहेत त्यांस राहूं द्यावें.

निजाम सरकारचे राज्यांत स्टेट रेलवेचीं आणखी कामें सुरू करावयाचीं आहेत त्यांस परवानगी मिळण्यासाठीं विलायतेस स्टेट सेक्रेटरीकडे डेप्युटेशन गेलें होतें त्यांनीं सांगितलें कीं या गोष्टीस आमची संमति आहे व नेटिव संस्थानांतून अशीं कामें बहुत व्हावीं अशी आमची इच्छा आहे, पण हिंदुस्थान सरकाराकडून या बाबदींत अजून कांहीं लिहून आलें नाहीं तें आल्यावर याविषयीं अखेरचा जबाब देण्यांत येईल.

उमरावती हायस्कुलावर कायमचे हेड मास्तर नेमण्याची योजना रावबहादुर नारायणभाई डायरेक्टर सिमल्याहून परत येईत तों पर्यंत होत नाहीं असें समजतें. तूर्त रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर बी. ए. हेच इनच्यार्ज्य काम पाहातील.

येथील तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर लेले यांची खामगावास बदली झाली, व तेथील तहशिलदार मि० दोराबजी कावसजी यांची अकोटास बदली झाली, व अकोटचे मि० आर्देसर दिनसाजी यांस अकोल्यास नेमिलें. मि० आर्देसर यासारखे तरुण, हुशार, व चालाख तहशिलदार अकोल्यास येणार हें ऐकून आह्मास संतोष होतो. आमचे डिपुटी कमिशनर मे० मेन साहेब यांनीं ही निवडणूक उत्तम केली. जुने तहशिलदार रा. रा. भास्करराव येथें २१३ वर्षे होते. तितक्या काळांत त्यांनीं आपलें काम बिनबोभाट केलें व त्यांची मिजास केवळ साधी ह्मणजे भिक्षुकी तऱ्हेची असून वागणूक निर्लोभ व निष्पक्षपाती अशी होती याजबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों व आमचे नवीन येणारे तहशिलदार आह्मांस याहून अधिक वर्णनीय व सुखावह होवोत असें इच्छितों.

स्यानिटरी कमिशनर यांजकडील जननमरणाचा मार्च महिन्याचा तक्ता रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापला आहे त्यावरून कळतें कीं त्या महिन्यांत ३१११ पुत्र व २८३३ कन्या अशीं ५९४४ मुलें जन्मलीं व ४५९६ मनुष्यें मरण पावलीं. त्यांत महामारीनें २९, देवीनें ७७६, तापानें २४२८, अंतड्याचे रोगानें ७३९, दुखापतीनें ७४, व इतर रोगाने ५१० मनुष्यें मरण पावलीं.

दिल्ली दरबारच्या वेळीं ज्यांस पदकें बक्षिस मिळालीं आहेत त्यांनीं जानेवारीच्या पहिले तारखेस चक्रवर्तिनी साहेबांच्या जन्मादिवशीं व इतर दरबारच्या प्रसंगीं तीं भूषणार्थ वापरीत जावीत असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

अकोटास व शिगावास व्यापाराचे हंगामासाठीं सरकारानें तारायंत्राचीं आफिसें ठेविलीं होतीं तीं बंद केलीं.

इलिचपुराहून ५वे तारखेचें पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं, मेळघाटांत एक राजा मरण पावला त्याचे जागेवर दुसरा वारस बसविण्याचा विचार करण्याकरितां सर्व गोंड राजांचा चिखलदऱ्यास ४थे तारखेस दरबार झाला. हवा अतिशय उष्ण आहे. पाऊस पडला नाहीं. डिपुटी कमिशनर साहेब चिखलदऱ्यावर आहेत. पांच सहा दिवसांनीं खालीं येतील.

साऱ्या वऱ्हाडचें सदर स्टेशन अकोल्यास होणें अवश्य आहे अशाबद्दल कार्यकारण सहीत गेल्या आठवड्यांत आह्मी एक निबंध लिहिला होता त्याविषयीं उमरावतीच्या प्रमोदसिंधु पत्रांत असें लिहिलें आहे कीं "उभयता मे. कमिशनर साहेब यांचें, अकोल्यास सदरची जागा करावी, असें मत आहे. व तेथेंच सदर जागा होऊन सर्व मुख्य कचेऱ्या तेथें ठेवणार असें ह्मणतात."

रा. रा. यज्ञेश्वर दीक्षित यांची सांगलीकर नाटकवाली मंडळी सुमार दोन महिने एथें होती ती इलिचपुराकडे जाण्याकरितां अकोटमार्गे एथून बुधवारीं गेली. कांहीं खेळ त्यांनीं फार चांगले केले, कांहीं मध्यम होते, व कांहींत उगाच गोंधळ होता तरी त्यांस एकंदरींत पैसे पुष्कळ मिळाले हें त्यांचें भाग्य होय. हे लोक आश्रितवी होते व ३।४ पात्रे यांच्यांत चांगलीं हुशार होतीं. दक्षिण प्रांतीं दुष्काळ पडला असल्यामुळें ७।८ नाटकें या भागांत आलिलीं आहेत व तीं ६।४ महिने इकडेच रहातील. नामांकित नाटकवाले इचलकरंजीकर नागपुरास गेले आहेत व ते थोडे दिवसांत एथें येणार असून त्यांच्या करितां नाटक गृहाची योजना चालू आहे असें समजतें.

चालू सालांत वऱ्हाडांतून कापसाचे एकंदर गठ्ठे तारीख १२ मे पावेतों २५२१०५ रवाना झाले. त्यांतून ३६७ वायव्य प्रांतांत जाऊन बाकीचे सर्व मुंबईस गेले.

पूर्व वऱ्हाडांतील फर्स्ट ग्रेड ओव्हरसियर मि० रंग स्वामी मुदलियार व फर्स्ट ग्रेड सब ओव्हरसियर मि० व्यंकट स्वामी नायुडू यांस कामाचे सोयी करितां पश्चिम वऱ्हाडाकडे दिलें.

एथें ताजना पेठेंत गोठाण ह्मणून कांहीं जमीन होती ती वसाहतीकडे देण्याचा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला.

उमरावतीचे मोफ्युसिल कंपनीचे एजंटानीं मुंबईस तार पाठविल्यावरून समजतें कीं, बुधवारीं तिसरे प्रहरीं तेथें वारा पश्चिमेकडचा येऊन वादळ झालें व सुमार पाव इंच पाऊस पडला.

मेजर हडलस्टन साहेब विलायतेस रजेवर गेले त्यामुळें मार्चाचे ४ थे तारखेपासून खालीं लिहिलेली वर्गा वर्गी हिंदुस्थान सरकारानें करून आपले ग्याझेटांत छापून प्रसिद्ध केली ती येणें प्रमाणें:—

मेजर जे टी बुशबी सेकंड क्लास आफिशिएटिंग डिपुटी कमिशनर यांस फर्स्ट क्लास आफिशि० डिपुटी कमिशनर केलें.

क्या० एच सी ए स्प्यान्स्की थर्ड क्लास डिपुटी कमिशनर यांस आफिशि० सेकंड क्लास डिपुटी कमिशनर नेमिलें.

मेजर सी टी ओ मेन फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर यांस थर्ड क्लास आफिशि० डिपुटी कमिशनर नेमिलें.

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर यांस फर्स्ट क्लास आफिशिएटिंग असिस्टंट कमिशनर केलें.

मि० ए इलियट थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशि० सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

मि० त्रिंबकराव प्रभाकर उमरखेडचे स्पेशियल माजिस्ट्रेट यांचे अधिकाराखालीं पुसद तालुक्यांतील बिटरगाव तुकडी खालचे कांहीं गाव दिले.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं मि० पी सी अप्पा कानू पंडारम एथील चारिटेबल डिस्पेन्सरीवरील सेकंड क्लास आस्पिटल असिस्टंट यांची पहिले क्लासची परीक्षा पास झाली.

उमरावतीस वेड्याचें इस्पितळ आहे तें पहाण्याकरितां अकोल्याचे सिविल सरजन यांस रेसिडेंट साहेबांनीं एक्सआफिशिओ ( अधिकार नाम्यानें ) विजिटर ( तपासनीस ) नेमिलें आहे.

अकोल्याचे आस्पिटलमध्यें ३ विद्यार्थी शिकत होते ते हुकुमावरून हैदराबादेस मेडिकल स्कुलांत अभ्यास करण्याकरितां गेले.

बुधवारीं व गुरुवारीं अकोल्यास पाऊस पडला.

## वर्तमानसार

**पर्जन्याचा आहवाल** — कारवाडाकडे ६ वे तारखेस २ इंच पाऊस पडला. त्रावणकोर एथें आठ दिवसांत ८ इंच पाऊस पडला— कोचीन बंदराकडे तारीख ३० मे पासून पर्जन्य सुरू झाला— ह्मैसुराकडे चांगला पाऊस पडला. धारवाडाकडे चांगला पाऊस पडला. बेळगाव, कानडा, कलादगी, सातारा, पुणें आणि खानदेश इकडेही थोडा थोडा पाऊस पडला. सातारा, बेळगाव आणि धारवाड जिल्ह्यांत पेरण्या सुरू झाल्या. मध्य प्रांतांत गोदावरी, बिलासपुर आणि बालाघाटजिल्ह्यांत मोठा पाऊस पडला. बंगाल्याकडे चांगला पाऊस पडला. मध्य हिंदुस्थानांत एक दोन पाऊस पडले. अयोध्या व वायव्य प्रांत यांत अजून उन्हाळा आहे. पंजाबांत अजून पाऊस नाहीं. ब्रह्मदेशांत रंगून पावेतों चांगला पाऊस पडला. असाम देशांतही पाऊस पडला— कंदाहार एथें ४ दिवस आणि ४ रात्रीं धुवाधार पाऊस पडला अशी खबर आली आहे.

मि० आर्मस्ट्रांग नागपुर प्रान्तांचे चीफ इंजिनियर यांचे जाग्यावर कर्नल जे. ओ. मेन रायल इंजिनियर यांची नेमणूक होईल असें ह्मणतात.

नागपुर प्रान्ताचे जुडिशियल कमिशनर ले० कर्नल मेकंजी पेनशन घेणार असें वर्तमान आहे.

रा. रा. विनायकराव वासुदेव मुंबई सरकारचे ओरियंटल ट्रान्सलेटर यांची नोकरी निमे पेनशनास योग्य होऊन चुकली व ते पेनशन घेतही होते पण सरकारानें त्यांस आणखी एक वर्ष नोकरी करावी अशी परवानगी दिली आहे.

मुंबईचे माजिस्ट्रेट राव बहादूर नाना मोरोजी यांचे चिरंजीव रा. रा. सदाशिवराव विलायतेस गेले होते ते तिकडे बारिस्टरचे परिक्षेत पास होऊन आले हें ऐकून आह्मास संतोष होतो.

ग्रीस सरकार आपली फौज दुप्पट वाढविणार.

उत्तम लोकवासी डाक्टर उइलसन साहेब यांनीं हिंदुस्थानांत ५० वर्षे राहून देशाचे सुधारणेंसाठीं व विद्याज्ञानासाठीं बहुत परिश्रम केले अशा सत्पुरुषाचें चरित्र त्यामागें पुस्तक रूपानें अक्षय रहावें अशी सर्वांची इच्छा आहे असें जाणून डा. डफसा. तें लिहिण्याच्या तयारीस लागले आहेत व माहित्य मिळवीत आहेत हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो.

आमची अशी इच्छा आहे कीं कैलासवासी डा० भाऊ दाजी यांचें चरित्र ही कोणी शोधक, उद्योगी व विद्वान् गृहस्थांनीं लिहून काढावें.

बल्लारी आणि हुबळी या दरम्यान रेलवेचें काम चालू आहे तें १२ मैल पुरें झालें व पुढें झपाट्यानें चालू आहे.

आनरबल अशली ईडन सी एस आय यांस सर रिचर्ड टेंपल साहेबाचे जागीं बंगालचे लेफटिनेंट गवरनर नेमिलें.

इराणचे कांहीं यात्रेकरू मक्केस गेले होते व तेथून ते मदिना येथे जात असतां त्यांवर हल्ला झाला त्यांत ९ इसम ठार मेले व ४२ जखमी झाले असें वर्तमान आल्यावरून तुर्कस्थानांतील इराणचा वकील यास शहानें कळविलें आहे कीं या गोष्टीचा तुह्मी बारीक तपास करावा.

हिंदुस्थानांतील सर्व रेलवेस जानेवारीपासून पावणे तीन महिन्यांत तीन कोटि रुपये मिळाले. ही रकम गुदस्त साला पेक्षां ६५॥। लक्षांनीं अधिक आहे. ई आय, जी आय पी, आणि मद्रास या तीन रेलवेस ५४ लक्ष रुपये अधिक फायदा झाला व एकट्या जी आय पीस २२,३७,१४८ रुपये मागील सालच्या पावणे तीन महिन्या पेक्षां अधिक मिळाले.

यंदाच्या सिविल सर्व्हिसच्या परिक्षेत एक पारशी गृहस्थ मि० कावसजी जामासजी हे पास झाले व त्यांचा नंबर ८वा आला हें ऐकून आम्हास संतोष होतो.

चीन देशांत कांहीं शोध लावण्यासाठीं कित्येक उद्योगी व साहसी युरोपियन लोक गेले होते त्यांजवर तिकडील लोकांनीं हल्ला केला त्यांत मि० मार्गारेट म्हणून एक गृहस्थ मरण पावले. त्यांचे कुटुंबास नुकसानीबद्दल एक लक्ष रुपये इंग्रज सरकारानें चीन सरकाराकडून देवविले.

रोम्यानियामध्यें पश्चिमभागास रशियन फौज ८५००० जमली आहे. डानयुब नदीतून अर्धा जून महिना संपावितां मार्ग निघेल असें वाटत नाहीं.

ऐशिया माईनरमध्यें रशियाची फौज झपाट्यानें पुढें पाऊल टाकित आहे. व कार्सच्या किल्यावर तोफांचा हल्ला चालू झाला आहे. तुर्क लोकांची एशिया खंडांतील स्थिती मोठी गडबडीची आहे.

---

### यंदाचा पाऊस

चालू सालामध्यें पर्जन्यवृष्टी कशी व्हावी याविषयीं धुळेकर रामजोशी यांनीं अनुमान करून ता० वै० त छापिलें आहे तें असें:—

१ रोहिणी नक्षत्राचा पर्जन्य थोडा व्हावा परंतु वायूचें वाहणें विशेष व्हावें.

२ मृग नक्षत्राची अल्प वृष्टि व्हावी परंतु उष्णता फार व्हावी.

३ आरद्र नक्षत्राची बरीच वृष्टि व्हावी परंतु उष्णतेचा वेग दुःसह होऊन लोकांस पीडा व्हावी.

४ ज्येष्ठ वद्यांत २ पासून ७ पर्यंत पर्जन्य वृष्टि बरीच व्हावी आणि उष्णतेचें मान कमी व्हावें.

५ ज्येष्ठ वद्य ८ मीस पुनर्वसु नक्षत्र लागतें त्याचा स्त्री पुरुष व चंद्र सूर्य योग आहे त्याचा पर्जन्य पुष्कळ पडावा.

६ आषाढ शुद्ध १–२–३ या तिथीस उत्तम वृष्टि व्हावी. ५ मीस अतिवृष्टिचा योग आहे.

७ आषाढ शुद्ध ८ मीस पुष्य नक्षत्र लागतें त्याला स्त्री स्त्री चंद्र सूर्य असे योग आहेत त्या योगें अतिशय अभ्रें येऊन वृष्टि व्हावी.

८ आषाढ शुद्ध १५ मेस पर्जन्य पुष्कळ पडावा असा योग आहे.

९ आषाढ वद्य १ पासून ३ पर्यंत पर्जन्य पुष्कळ पडावा.

आश्लेषा नक्षत्राचा शेवट पर्यंत बराच पर्जन्य पडावा.

१० श्रावण शुद्ध ७ स मघा नक्षत्र लागतें त्याचें मूषक वाहन आहे. स्त्री स्त्री व चंद्र सूर्य योग आहेत. त्या योगें अभ्रें अतिशय येऊन वृष्टिही पुष्कळ व्हावी.

११ श्रावण शुद्ध १३ पासून १५ पर्यंत पर्जन्य पडण्याचा अतियोग आहे.

१२ श्रावण वद्य २–३ येस बराच पर्जन्य पडावा.

१३ श्रावण वद्य ४ स पूर्वा लागतात त्याचें [illegible] वाहन आहे स्त्री पुरुष व चंद्र सूर्य योग आहे. त्या उभय योगांचा अति पर्जन्य पडावा असें आहे.

१४ श्रावण वद्य ९ पासून १२ पर्यंत पाऊस पडण्याचा अतियोग आहे.

१५ भाद्रपद शुद्ध १ स पर्जन्य पडावा, अभ्र फार यावें.

१६ भाद्रपद शुद्ध ४ स उत्तरा नक्षत्र लागतें याचें मूषक वाहन स्त्री नपुंसक योग व सूर्य सूर्य योग आहे. त्याचें फळ वायू पुष्कळ सुटावा, अभ्रें पुष्कळ येऊन पर्जन्य वृष्टि थोडी व्हावी.

१७ भाद्रपद शुद्ध १० पासून १४ पर्यंत पर्जन्याचा योग चांगला आहे

१८ भाद्रपद वद्य ३ स हस्त नक्षत्र लागतें महिषि वाहन चंद्र सूर्य व स्त्री पुरुष योग आहे. त्याचें फळ पर्जन्य वृष्टि विशेष व्हावी.

१९ भाद्रपद वद्य १० पासून १४ पर्यंत पाऊस पडण्याचा योग चांगला आहे.

२० आश्वीन शुद्ध ९–१० मीस पाऊस पडण्याचा योग आहे. वृ. धा.

---

## वऱ्हाडप्रांताच्या अखेर निकालाची आवई.

इंग्रज सरकारचें निजाम सरकाराकडे फौजेचा खर्च चालविण्याकरितां म्हणून जें कर्ज झालें होतें त्याच्या फेडीकरितां निजाम सरकारानें आपला वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकारचे ताब्यांत दिला होता. आतां कर्ज सव्याज फिटून इंग्रज सरकाराकडे आपलीच जास्ती रकम गेली असेल या सबबेवर निजाम सरकारानें तो परत मागितला आणि याच मोठ्या निकडीच्या कामाकरितां त्यांचे राज्यकारणी मुख्य प्रधान सर सालरजंग हे गेल्या वर्षी महाराणी साहेबांची भेट घेऊन वऱ्हाडप्रांत परत घेण्याच्या संबंधानें त्यांच्याशीं कांहीं बोलणें चालणें करावें या हेतूनें इंग्लंडास गेले होते. परंतु त्यांच्या जाण्यापासून कांहींएक उपयोग न होतां वऱ्हाड प्रांताची त्यांच्या जवळ कोणी देखील गोष्ट काढली नाहीं व सर सालरजंगानीं तें प्रकरण बाहेर काढावें असें तेथल्या मोठ्या वजनदार लोकांचें आणि पार्लमेंट सभेचें मत नव्हतें शेवटीं सर सालरजंग यांस स्वदेशीं निमूटपणें विन्मुख यावें लागलें. कांहीं दिवसांमागें अशीही कंडी पिकली होती कीं निजाम सरकारचा वऱ्हाड प्रांत परत मागण्याचा कांहीं हक्क आहे किंवा नाहीं याची चौकशी करण्याकरितां मिश्रमंडळ बसणार आहे; परंतु त्याप्रमाणें कांहींच झालें नाहीं. पुढें हल्लींचे गादीचे मालक लहान आहेत तोंपर्यंत वऱ्हाड प्रांत परत द्यावयाचा किंवा नाहीं याबद्दल विचार सुद्धां करावयाचा नाहीं असा इंग्रज सरकारानें ठराव केला. इतकें झा[illegible] महाराणी साहेब हिंदुस्थानच्या चक्रवर्तिनी झाल्या तेव्हां पुण्याच्या लोकांनीं आपल्या मागणीचा अर्ज दिल्लीस कितीएक पसंत केलेल्या मंडळी बरोबर पाठविला त्यांतही निजाम सरकारचा वऱ्हाड प्रांत इंग्रज लोकांच्या राज्या खालीं निरर्थक घुसडला गेला आहे तो त्यांचा त्यांना मोठ्या आनंदानें व आभारपूर्वक परत द्यावा असें मागणें केलें होतें. या सर्व कारणांवरून वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकार निमूटपणें निजामाचा निजामास परत देईल असा फार भरवसा होता व या भरवशावरच हैदराबादचे सरकारी कामगार व प्रजा आणि हिंदुस्थान देशाच्या इतर भागांतले लोक स्वस्थ होते व इंग्रज सरकार वऱ्हाड प्रांत फुकट गिळून टाकील असें त्यांस वाटत नव्हतें, परंतु ती सगळी आशा व्यर्थ होऊन लोकांच्या कल्पना खोट्या ठरल्या आणि इंग्रज सरकार वऱ्हाड प्रांत परत देण्याचें नाकबूल करतें हा विचार एतद्देशीय लोकांच्या काळजाचे तुकडे तोडणारा आहे. स्टेट सेक्रेटरी वऱ्हाड प्रांत परत देण्याचें नाकबूल करतात अशी आधारसहित वदंता आली आहे तेव्हां ती खोटी ठरेल असें कालत्रयीही होणार नाहीं. याच्या उलट वदंता आली असती तर मात्र तिजवर विश्वास ठेवला नसता; परंतु ही वदंता ज्या अर्थीं नकाराच्या पाड्याची आहे त्या अर्थीं ती सत्य आहे व असेलच. त्या प्रांतावर निजाम सरकारचा हक्क मुळींच नाहीं अशा विषयीं कोणतीं कारणें लावलीं आहेत हें मात्र अजून समजत नाहीं, परंतु तेंही लौकरच समजेल असा अदमास आहे. कारणें कांहीं असोत किंवा वऱ्हाड प्रांताच्या संबधानें इंग्रज सरकारचे विचार पाहिजे तसे असोत तथापि इंग्रज सरकार वऱ्हाड प्रांत परत देत नाहीं अशी हल्लीं वऱ्हाड प्रांताच्या अखेरच्या निकालाची जी आवई उठली आहे ती तर तथ्य होय. निजाम सरकारचे मुख्य दिवाण सर सालरजंग व हिंदुस्थानचे माजी व्हाईसराय या उभयतांमध्यें वऱ्हाड परत घेण्याकरता जो पत्रव्यवहार झाला व जें जाबजबाबी प्रकरण उजेडांत आलें त्यावरून माशानें गिळलेलें माणीक पुनरपि हस्तगस्त होणें नाहीं व गळ्यापर्यंत येऊन ठेपलें तरी इंग्रज सरकार कुरबुरी वाचून वऱ्हाड प्रांत परत देणार नाहीं असें पुष्कळ दूरदर्शी छिद्रप्रेक्षक लोकांनीं भविष्य करून ठेवलेंच होतें. हैदराबादच्या दरबारी लोकांचीही अशीच खात्री झाली होती परंतु हा वऱ्हाड प्रांत परत देण्याचे कृत्यांत मुत्सद्दी इंग्रज प्रधानांनीं राजकारणाच्या संबधानें या वेळीं मोठी चूक केली असें आह्मास वाटतें; कारण कीं सांप्रतच्या प्रसंगीं युरोपांतील तुर्कस्थानांत, काबुलांत आणि मध्य एशियाच्या बहुतेक भागांत खिस्ती लोकां विरुद्ध यवनलोकांचीं मनें खवळलेलीं आहेत व मारूं किंवा मरूं असा त्यांनीं संकल्प केला आहे अशा बिघडलेल्या वेळीं तरी इंग्रज लोकांनीं अन्यायानें घेतलेला वऱ्हाड प्रांत आह्मी तुमचा परत देत नाहीं असें ह्मणून निजाम सरकारच्या यवनी प्रजेच्या व हिंदुस्थानांतल्या आबाल वृद्धाच्या अंतःकरणास मृत्यूच्याही पलीकडचें दुःख होण्यासारखें उत्तर दिलें हें त्याच्या मुत्सद्दीपणास व धूर्ततेस लांछन आहे. वऱ्हाड प्रांताचा अखेर [illegible] काल लांबणीवर पडलाच होता, तेव्हां [illegible] यवनी युद्ध निवारल्यावर त्याचा आणखी वर्ष दोन वर्षांनीं चांगला विचार करून निकाल केला असता तर फारशी हरकत नव्हती. हीच संधी त्यांनीं अखेरच्या निकालाची पसंत केली, तेव्हां इंग्रजी मुत्सद्यांची परिणामावर दृष्टी गेली नाहीं असें वाटतें. या विषयाचे संबंधानें आणखी आमचे विचार आहेत ते आह्मी पुढें सवडीप्रमाणें आमच्या वाचकांस कळवूं. इं. प.

---

## नोटिस.

महादेव रावजी वस्ती कुटासें तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मास मालकांचे तर्फे पटवारी नेमण्याचे कामास्तव मी मुखत्यार पत्र दिलें होतें तें काम शेवटास गेलें सबब तुह्मास दिलेलें मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें हें आपल्यास समजावें, कळावे तारीख ७ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) नंदाजी उदाजी देशमुख
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

विठोबा वलद जयराम सोनार वस्ती मौजे चिवरें प्ररगणे व तालुके मलकापुर जिल्हा बुरढाणे यांस काशी मर्द विठोबा सोनार वस्ती खडदगाव परगणे पिंपळगाव राजा तालुके मलकापुर इजकडून कळविण्यांत येतें कीं, तू माझा लग्नाचा नवरा असून सुमारें बारा वर्षे झालीं. लग्न लागल्यावर एक वेळ मात्र मी तुझे घरीं लहान असतां गेली होती हल्लीं अक्रा वर्षे झालीं. मी आपले बापाचे घरांत पांच वर्षे राहून सहा वर्षांपासून वेगळी रहात आहे व मजवर तुझी भक्ती नसल्या कारणानें तूं मला जन रीतीनें नांदवीत नाहीं मजला ऋतुप्राप्त होण्यास ८ वर्षे झालीं. मी जातीवाले लोकांकडून तुजला पुष्कळ प्रकारें बोध करविला पण तो तुला न रुचतां त्या लोकां बरोबर मजला तोंडी सोडचिठीचा निरोप पाठविला त्यास ही बरेच दिवस गुजरून गेले. व आतां माझी जरूर तूं ठेविली नाहींस असें मजला पक्कें समजून आलें. व तुझ्या तोंडच्या निरोपाप्रमाणें मी आतां दुसरा पाटाचा नवरा करणार आहे. व तसा मी बेत करून तुजला ही नोटिस दिली आहे तर तुजला माझी जरूर असल्यास व मजला जन रीतीनें वागविण्याची इच्छा असल्यास या नोटिशीचे तारखे पासून १५ दिवसांत माझे घरीं येऊन माझ्या खाण्याचा व कापडाचा झालेला खर्च ६ वर्षांचा ३०० रुपये देऊन मला घेऊन जावें. तसें तूं न केल्यास तुझे तोंडचे निरोपाची फारकत समजून १५ दिवसा नंतर मी पाटाचा नवरा खचित करणार आहे व पाटाचा नवरा केल्यावर मग माझेवर तुझा कोणतेही प्रकारचा दावा चालणार नाहीं ते सर्व प्रसिद्ध व्हावयास व तुजला खचितपणें समजल्यास ही नोटिस वर्तमानपत्रांत छापून दिलेली आहे कळावे तारीख १ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) काशी मर्द विठोबा सोनार
रहाणार मौजे खडदगाव
निशाणी खुद्द हातची
बांगडी असे.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

... 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता० १ माहे जून सन १८७७ इ० | अंक २४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वार्षिक आगाऊ | ९ |
| तालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वार्षिक आगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे

NOTICE.

नोटिस.

WARDHA VALLY STATE RAILWAY.

वर्धा व्हाली स्टेट रेलवे

शुक्रवार तारीख १९ जून सन १८७७ इसवी रोजीं व त्यापुढें वर्धा व्हाली स्टेट रेलवेचा पुढील भाग हिंगणघाट एथें केलेल्या नव्या कायमच्या स्टेशनापर्यंत सुरू होईल आणि त्या तारखेपुढें दुसरी नोटिस होईपर्यंत मिक्सड गाडी सरकारच्या हुकुमाअन्वयें दरआठवड्यांत प्रत्येक मंगळवार, गुरुवार व शनिवार या दिवशीं हिंगणघाट कायम स्टेशन आणि जी. आय. पी. रेलवेचे वर्धा स्टेशन यांचे दरम्यान जाऊं येऊं लागेल.

ही आगगाडी वर्ध्याहून हिंगणघाटाला जाण्याला सदरील दिवशीं संध्याकाळीं ९ अवर १० मिनिटांनीं निघत जाईल व हिंगणघाटाहून वर्ध्याला जाण्याकरितां सकाळीं ९ अवर १० मिनिटांनीं निघत जाईल. या गाड्या जी आय पी रेलवेच्या नागपुर मुख्य लायनीच्या जाणाऱ्या येणाऱ्या गाड्याच्या धोरणानें जाणार येणार आहेत.

सदरील तारखेस व त्या तारखेच्या पुढें हिंगणघाटाचें टेंपररी स्टेशन बंद केलें जाईल.

तारीख १९ [illegible] ख ३० सप्तंबरपावेतों दोन्ह[illegible]न सरकार हुकुमा अन्वयें व[illegible] रेलवेवरील सर्व प्रकारच्या [illegible] जो दर घेण्याचा साधारण [illegible] त्या[illegible] दर मणास ६ पे[illegible]ल. आणि गुडस, पार्सलें, प्यासेंजर [ उतारू लोक ] व इतर ट्राफिक यांबद्दल वर्धा व्हाली रेलवे वरील दरदाम आणि त्या दूरत्वाचें प्रमाण व टर्मिनल्स वगैरे संबंधानें ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे प्रमाणें हिशेबी धरले जातील. तसेंच कामाकाजाविषयींचे कायदेकानू ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे प्रमाणेंच वर्धाव्हाली रेलवेचे आहेत असें समजावें व याजबद्दल आणखी माहिती पाहिजे असेल तर स्टेशनावर व खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळेल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई, १२ जून १८७७

## नोटिसा

लक्ष्मणदास रतनचंद मारवाडी दुकान उकळी तालुके जळगाव नजीक वस्द यास गंगाराम सोनासा रंगारी पातुर्डेकर याजकडून नोटिस देण्यात येते कीं आह्मी बालासा रंगारी सरात यांचें शेत खरेदी घेतलें तें तुह्माजवळ गहाण होतें त्याजबद्दल तुह्मास रुपये ४० यावे असें बालासा यानें सांगितल्यावरून आह्मी तुह्माकडे आलों. तुह्मी रकम रुपये ४० आमचे नांवावर लिहून आह्मांस शेत सोडिल्याची चीठी लिहून दिली या गोष्टीस सुमार एक वर्षांवर दिवस होऊन गेले. आह्मी तुमचे दुकानीं २।३ वेळां रुपये घेऊन आलों असतां तुह्मी घेतले नाहींत यास साक्षीदार आहेत. तुमचे पोटांत काय कपट आहे आह्मास ठाऊक नाहीं. शेतांचे खरे दीखत ८० रुपयांचें झालें आहे त्यांत ४० वायद्याबद्दल व ४० तुमचे अशी रकम आहे. व तुमची रुजुवात ४० रुपयांची आहे असें असतां तुह्मी विनाकारण तक्रार काढून जास्ती रकम मागता त्यावरून नोटिस देतों कीं तुह्मास ४० रुपयांहून अधिक कांहीं मिळणार नाहीं व फिर्याद कर ह्मणता त्याप्रमाणें केल्यास खर्च मिळणार नाहीं व इजतीबद्दल जबाब घेतला जाईल. कळावें तारीख १० माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) गंगाराम सोनासा रंगारी दस्तुर खुद

### नोटिस.

गणपती वल्लद सखाराम सोनार रहाणार पातुर्डे तालुके जळगाव यास नोटिस देणार बापू वल्लद योगाजी गुरव रहाणार पातुर्डे याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी फुरसान धनगर जानोरीकर याचें शेत खंडांत घेऊन मला तिसरा हिस्सा रुप[illegible]मला दिला त्यासुद्धां तुमची [illegible]कडेस आजमितिस हिशेब करून रुपये १०४ शिवाय व्याज निघालें आहे पैकीं आमचे हिश्शाचा कानूस खंडी १। शिवाय घेणें आहे त्याचे दाम त्या तारखेस वजा जातां जे रुपये निघतील ते आपण घ्यावे तर घेत नाहीं व आमचे शेत आह्मास देत नाहीं तर असें न करितां तुमचे रुपये घेऊन आठ दिवसांत शेत आह्मांस यावें असें न केल्यास नुकसान आमचें होईल तें तुह्मापासून योग्य रीतीनें फिर्याद करून घेतलें जाईल. कळावें तारीख १० जून सन १८७७ इसवी.

( सही ) बापू यवगाजी दस्तुर खुद

### नोटिस.

रा. रा. राबजी वल्लद हरसिंगजी बाघमारे रहाणार कानसणी तालुके अकोले यास धवकल वल्लद बाबाजी गावंडे रहाणार मौजे दहीगाव तालुके अकोलें याजकडून. तुह्मी मला तारीख २७ मेच्या वऱ्हाडसमाचारांतून नोटिस दिली तिचें उत्तर येणें प्रमाणें:—

तुह्मी माझे सासरे आहा व माझी बायको माझे घरून मी घरीं नसतां तुह्मी वारंवार मला न विच्चारतां घेऊन जाता व हल्लींही तुह्मी अशाच प्रकारें सुमार ४ महिन्या पूर्वीं घेऊन गेला व घरांतील कांहीं ऐवजही तिनें बरोबर नेला आहे व असाच हरहमेशा ही ऐवज घेऊन जाते. तुह्मी लिहिता कीं, तिला चांगलें वागवीत नाहीं हेंही तुमचें ह्मणणें खोटें आहे. कारण माझे एथील पंचानीं ज्या रीतीनें मला सांगितलें त्याप्रमाणें मी उत्तम प्रकारें वागवीत आहें. तुह्मी लिहिता कीं, बायकोला न विच्चारतां दुसरी बायको केली. तर मी पाहिजे असल्यास पंचवीस बायका करीन व त्या सर्वांस वागवीन मला मना करण्याचा कोणास अधिकार नाहीं. तसेंच तिला वागविण्याविषयीं तुह्मी लेख व जामीन मागता पण अशा नवरा बायकोच्या व्यवहारांत लेख किंवा जामीन असावा अशी प्रवृत्ती नाहीं मला तिची गरज आहे ह्मणूनच मी ११०० रुपये खर्चून तिच्याशीं लग्न लाविलें व तोच माझा पुरमगज करार आहे. आतां तिला घेऊन जावें असें तुमचे ह्मणणें आहे पण जर माझी बायको तुह्मी माझे एथून चोरून घेऊन गेले तर तुह्मासच आणून द्यावी लागेल पाहिजे आतां या नोटिशीनें तुह्मास इतकेंच कळविलें जातें कीं, ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत माझी बायको माझे एथें आणून घालावी. असें न केल्यास तुह्मावर दावा करून माझे एथून दर वर्षास नेलेला ऐवज व लग्नास लागलेला खर्च १२०० रुपये असें भरून घेतलें जाईल हें खूप समजावें. मी फारकत वगैरे कधीं करून देणार नाहीं. माझे संसाराचा सर्व नाश तुह्मीच केला माझी बायको दरसाल तुह्मी घेऊन जात होते पण माझे घरीं नीट रीतीनें राहूं दिली नाहीं त्यासाठीं मी आपले आजीसासूसही मी आपले घरीं ठेविली व तुह्मी त्या दोघींस ही घेऊन गेले ह्मणून मला निरुपायानें दुसरें लग्न करणें भाग पडलें तरी मी तिला वागविण्यास तयार आहे. कळावें तारीख ९ माहे जून सन १८७७ इसवी.

[ सही ] धवकल वल्लद बाबाजी गावंडे निशाणी खुद हातची

### नोटिस.

गिरधारीलाल निबाभाई आगरवाले रहाणार पातुर्डे यांसी देवीदास कन्हयालालजी पातुर्डेकर याजकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं, आमची खातेबाकी तुह्माकडेस अजमासें ७००।८०० रुपये निघत आहे. तर तुह्मास दोन चार वेळा हिशेब करण्यास बोलाविलें परंतु तुह्मी येत नाहीं. दुसरें आह्मी तुह्मास शेतें बटाईनें दिलीं त्यांपैकीं तीन शेतांतील माल तुह्मी दाखल केला बाकी शेतांतील माल न देतां त्याचा हिशेबही दाखवित नाहीं. याजबद्दल आमचे जवळ तुमचें बटाईचें लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें आणि दुकान व घर तुह्मी रहता त्याचें भाडें सालअखेरीस देत जावें असा करार होता त्यास तरवालापेक्षां तीन चार महिने अधिक गुजरले आहेत व लिहिलेप्रमाणें मकानाची दुरुस्ती तुह्मी ठेवित नाहीं तर आठ दिवसांचे पोटांत सदर्हूचा निकाल करावा. नाहीं तर योग्य रीतीनें फिर्याद करून घर व दुकान ताब्यांत घेऊं व सदर्हू खातेबाकी व बटाईचा माल व सालबंदीची बाकी येणेंप्रमाणें सर्व घेतलें जाईल कळावें. तारीख १० माहे जून सन १८७७ इसवी.

[सही] देवीदास कन्हयालालजी पातुर्डेकर दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. महाराज, मी श्री काशी क्षेत्रीं गेलों होतों तिकडील थोडयोडा माहिती आपण प्रसिध्द केल्यास आपणाकडे पाठवित जावी असा हेतु आहे व त्याकरितां स्नानवगैरे विधीविषयीं सर्व लोकांचे माहितीकरितां टिपण पाठविलें आहे तें आपले पत्रांत घेण्याची कृपा व्हावी. यांत दक्षिणेचा विच्चार गरीबी रीतीप्रमाणें माफक धरिला आहे. याहून उदारमनानें कोणी हजारों रुपये खर्चितील तर पुण्य विशेष आहेच. पण अवश्यक काय करावें लागतें व त्यासाठीं काय खर्च करावा लागतो

हें सर्वांस कळावें याकरितां हें पत्र लिहिलें आहे.

**स्नान व क्षौर.**

काशीस गंगेवर स्नानाला गेलें व तर्थि विधी करावयाचा असला तर क्षौराचे पूर्वी पुष्करणी तीर्थी स्थान करावें लागतें तेथें गंगापुत्र ह्मणजे पंडे नाम ब्राह्मण लोकांचा हक्क आहे ते यात्रेकरूस फार नाडितात अशी आह्मास तेथील स्थाईक लोकांकडून माहिती मिळाली त्यावरून आह्मी त्यांस बोलाऊन आणून १० रुपये देण्याचा ठराव केला. ते वर्षाचें अन्न, ९० रु. २५ रुपये असें मागत असतात व गरीब गुरीबापासूनही एक रुपया खालीं बहुधा घेत नाहींत. गंगेवर मुकटा पंचपात्री घेऊन बोडवयानें जावें लागतें. स्नाना पूर्वी मुकटा वाळत घालावा. व पुष्करणी तीर्थी स्नानास जावें तेथें एक नारळ किंमत एक आणा व फुलें एक पैसा व ३ अर्घ्ये ३ पैसे व परत येतांना विष्णूपुढें एक पैसा इतका खर्च लागतो. मग दुसरे कडे येऊन क्षौराचा संकल्प करावा व क्षौरास जावें. न्हावी शेंकडों तयार असतात त्यास क्षौराप्रीत्यर्थ निदान एक आणा द्यावा लागतो. नंतर श्रावणी सारखे मृदगोमय वगैरेचें स्नान व शुद्ध स्नान करावें, ओलें वस्त्र सोडलेलें गंगापुत्रास द्यावें लागतें, न दिल्यास त्याकरितां चार आठ आणे द्रव्य द्यावें. संध्या करून परत जातांना ब्राह्मणास चार आठ आणे पाहिजे असल्यास वाटावें.

**श्राध्ध.**

श्राध्धाचा ठराव पात्रास अमुक आणे असा असतो. निदानपक्ष पांच आणे पात्र घेतात. ब्राह्मण पांच निदानपक्ष दोन सांगावे. दक्षिणा चार आण्याचे खालीं नाहीं. मग आठ आणे, रुपया पाहिजे ती द्यावी. दुसरे दिवशीं कालाष्टक ह्मणून कालभैरवाचे ब्राह्मण सांगावे लागतात त्यांत निदान ब्राह्मण ८ व सुवासिमी दोन सांगाव्या असें आहे. हा चालचलाऊ मुशाफरीचा बेत आहे. याहून यथासांग यात्रा ज्यास करावयाची असेल त्यानें वेगळी माहिती मिळवावी व ती भट सांगतात. कळावें

एक फिरस्ता

## वसूल.

रा. रा. गोविंदराव यशवंतराव तहशिलदार बाळापुर ५
,, ,, भोलासिंग चीफ का. बाळापुर १०
,, ,, सोनेसिंग जेलदरोगे वाशिम ६।८
,, ,, लक्ष्मणराव जानराव जहागिरदार टुणकी १०
मे० बमनजी उकडजी आणि कंपनी १५

**वऱ्हाडसमाचार**

मिति ज्येष्ठ शुद्ध ७ शके १७९९

## माळव्याच्या अफूवरील अधिक कराचें गाऱ्हाणें.

माळव्यांत अफूचें पीक फार आहे व तेथून पेट्या भरून ती अफू चीन देशास जाते. एका पेटींत १४० रत्तल ह्मणजे पक्के ७० शेर अफू असते तिला इंग्रज सरकार ६०० रुपये कर घेते. असें असतां आलीकडे आणखी ५० रुपये जास्त घेण्याविषयीं सरकारानें ठराव केला आहे तो फार जरब होतो ह्मणून सरकारानें घेऊं नये व पूर्वीचाच कर कायम ठेवावा अशाविषयीं सरकारास अर्ज करण्याच्या विचाराकरितां या महिन्याचे तिसरे तारखेस इंदुरास मोठमोठाले व्यापारी मंडळीची सभा भरली होती व त्या प्रसंगीं पुण्यचे रा. रा. गणेश वासुदेव जोशी हेही तेथें गेलेले होते त्यांनीं याच विषयाच्या संबंधानें त्या सभेंत एक तासभर सुरस व्याख्यान दिलें त्यावरून असा नवीन वाढविलेला कर माफ होण्याविषयीं सरकारास अवश्य अर्ज केला पाहिजे अशी सर्वांची खात्री झाली. नंतर हिंदुस्थान सरकाराकडे पाठविण्यास एक अर्ज तयार करण्याकरितां व त्याच्या व्यवस्थेकरितां एक कमिटी नेमिली. या कामाचे सेक्रेटरी रा. रा. सखाराम विनायक वकील यांस नेमिलें आहे व त्यांनीं तयार झालेला अर्ज व सभेची हकीकत इंग्लिश भाषेंत छापून प्रसिद्ध केली त्याची एक प्रत आह्मास पाठविली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानितों. व या व्यापारी मंडळीच्या उद्योगाची तारीफ करितों.

इंग्रज सरकारच्या राज्याचा परिपाठ असाच आहे कीं मागितल्यावाचून बहुधा कोणास कांहीं मिळत नाहीं. व मागणाराची लगट फार असली तर न देण्याविषयीं गुटमुळत असलेलें मनही कधीं कधीं अर्जदारांच्या करुणापर विलापाकडे वळतें. ह्मणून दाद मागणें हें आपलें कामच आहे व ती मागितलीच पाहिजे. हा विचार नेटिव संस्थानांतील व्यापारी लोकांसारख्यांसही कळूं लागला व ते केवळ इंग्लिश पध्धतीप्रमाणें सभा, रिझोल्युशन्स, मेमोरियल्स वगैरे करूं लागले ही मोठी सुधारणेची व संतोषाची गोष्ट समजली पाहिजे. व्यापारी मंडळीनीं हिंदुस्थान सरकारास स्पष्ट कळविलें आहे कीं या व्यापारांत कांहीं कूस नाहीं. अफूच्या पेट्या आह्मी चिनास पाठवितों त्यास ६०० रुपयेच कर देतों तरी दर पेटीस सुमार ७३ रुपये आमचा तोटा होतो, व चालू असलेला व्यापार आह्मी केवळ ईर्षेकरितां पुढें चालवितों तर आणखी आपण ५० रुपये कर चढविला ह्मणजे या मोठ्या व्यापाराचा एकदम नाश होऊन लोकांचें बहुत नुकसान होईल सबब कृपा करून अधिक कर बसवूं नये.

त्यांनीं एका पेटीचा हिशेब दिला आहे तो असाः—

६३७८८ एका पेटीस किंमत. पेटींत अफू १३॥ धडे (६५॥ शेर) दरधडी ४८॥ रुपये प्रमाणें.
६०० सरकार दस्तुरी
६० खर्च
———
१२९७८८
१२२४८८ उत्पन्न होतें तें. चीन देशांत एका पेटीला ५७२ डालर्स येतात त्याचा आकार १२९८॥ रुपये होतो व त्यांत ७४ रुपये खर्च होतो तो जातां निवळ उत्पन्न.
———
७३
हा बाकी निवळ तोटा आहे असें इंदूरचे व्यापारी यांचें ह्मणणें आहे.

## एका युरोपियन स्त्रीवर फौजदारी मुकद्दमा.

बंगाल इलाख्यांत हावरा एथें मिस मेरी डानेली या नावाची १७ वर्षांचे वयाची एक अविवाहित युरोपियन स्त्री आहे. तिनें कोणा गृहस्थाला एक पत्र लिहिलें त्यास पोस्टाचे अर्ध आण्याचें टिकिट लावावयाचें तें जुनें-वापरलेलें टिकिट लाविलें यावरून मि. पेल्यु सा. तेथील माजिस्त्रेट यांनीं त्या बाईवर गुन्हा शाबीद ठरवून तिला २ महिने सक्त मजुरी कैदेची शिक्षा दिली. तिजवर हुगलीचे सेशन जज्जाकडे अपील केलें असतां त्यांनीं ती शिक्षा कायम ठेविली त्यावरून हायकोर्टाकडे अपील झालें आहे. आतां पुढें निकाल काय होतो पहावा. या मुकद्दम्याची हकीकत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

मिस डानेली हिचें ह्मणणें असें आहे कीं मी पत्र लिहिलें व टिकिट मजजवळ नव्हतें ह्मणून मी आपले आईला पैसे मागितलें तिनें अलमारीच्या किल्ल्या दिल्या त्या घेऊन दोघा भावासमक्ष मी दोन पैसे काढून एक नेटिव स्वयंपाकी होता त्याजवळ ते पैसे व पत्र दिलें आणि सांगितलें कीं याचें टिकिट घे व वरती कोरी जागा ठेविलेली आहे तेथें लाव आणि टपालचे खांबांत टाक. त्याप्रमाणें तो तें घेऊन गेला. टिकिट कोणतें होतें व कोठें लाविलें हें आपण पाहिलें नाहीं. व या गोष्टीचे प्रत्यंतराकरितां तिची आई, भाऊ व स्वयंपाकी यांच्या साक्षी झाल्या. आईनें व भावानीं डानेली इच्या ह्मणण्याप्रमाणें साक्षी दिल्या. स्वयंपाकी ह्मणाला कीं बाईनें मजजवळ कधीं पत्र दिलें नाहीं, पैसे दिले नाहींत, पोस्टांत जाण्यास सांगितलें नाहीं, मला कांहीं ठाऊक नाहीं.

हा मुकद्दमा पोस्टाकडून माजिस्त्रेटापुढें आला तेव्हां डानेली इजवर गुन्ह्याची शाबिदी नाहीं ह्मणून त्यांनीं सोडून दिला व पुढें ८ दिवसांनीं पोस्ट मास्तराकडून कांहीं लिहून आल्यावरून त्याच माजिस्त्रेटानीं तोच मुकद्दमा पुन्हा फैलावर घेतला व पहिले साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या. नंतर आपण न्यायासनावरून उठून साक्षीदाराचे जाग्यावर जाऊन प्रतिज्ञा घेऊन साक्ष दिली. पुन्हा न्यायासनावर जाऊन ती साक्षी लिहून घेतली. त्यांनीं आपले जबानींत असें लिहिलें कीं लखोट्याचे पाठीवर खोटें टिकिट लाविलेलें आहे व त्या टिकिटावर आरपार "स्टयांपूड" (टिकिट लाविलें) असा लेख लिहिलेला आहे त्या लेखाचें व डानेली बाईनें पत्रावर अड्रेस (पत्ता) लिहिला आहे. त्याचें अक्षर एकसारखें आहे त्यावरून खोट्या टिकिटावर जें लिहिलें तें डानेली इनें खुद्द लिहिलें आहे सबब खोट्या टिकिटाचा उपयोग तिनेंच केला असें खास आहे.

याप्रमाणें न्यायाधिशांनीं आपली साक्ष लिहिल्यावर पुरावा मजबूद होऊन डानेली बाईवर अपराध शाबीद झाला व सदरीं लिहिलेल्या प्रमाणें तिला शिक्षा झाली.

सेशन जडजानें शिक्षा मंजूर केल्यावर बाईच्या इष्टमित्रांनीं कलकत्यास हायकोर्टाकडे अर्ज केला कीं सेशन जडजाकडील या मुकद्दम्याचे कागद आणवून पहावे. बाईच्या वतीनें बारिस्टरानीं हाय कोर्टापुढें असेंही प्रतिपादन केलें कीं ज्या पुराव्यावरून अपराध शाबीद केला तो फार दुर्बल आहे; कारण एकटाच माजिस्त्रेट, न्यायाधीश या नात्यानें न्यायासनावर बसून इनसाफ करित असतां त्यास कायद्याप्रमाणें साक्षीदार होऊन साक्ष देण्याचा अधिकार नाहीं. तसेंच एकवेळा ज्या आरोपाबद्दल चौकशी करून मिस डानेली इजला सोडून दिलें, त्याच आरोपाबद्दल तिला पुन्हा धरून चौकशी चालविण्याचा माजिस्त्रेटास अधिकार नाहीं. तसेंच मिस डानेलीचें वय केवळ १७ वर्षांचेंच आहे याजबद्दलही आफिडेविट ह्मणजे प्रतिज्ञा लेख लिहून दिला. त्यावरून हाय कोर्टानीं कागद पाठविण्याविषयीं सेशन जडजास लिहिलें व ५०० रुपयांचे दोन जामीन घेऊन मिस डानेली इला सोडून दिलें.

हा मुकद्दमा मोठा चमत्कारिक आहे व यांत टीका करण्यायोग्य पुष्कळ स्थलें आहेत तथापि हायकोर्टापुढें याची चौकशी अजून व्हावयाची आहे, ह्मणून ती होऊन तिचा निकाल समजेपर्यंत आह्मी आपली टीका तकूब ठेवितों.

## मुंबईची म्युनिसिप्यालिटी

म्युनिसिप्यालिटीचें एकादें मोठें संस्थान पहावयाचें तर मुंबईचें पहावें. तेथें केवढा मोठा कारखाना आहे! स्वतंत्र एका मोठ्या जिल्ह्याचे राज्या इतकी त्या कमिटीची घडामोड आहे. तिचे हिशेब, कामदार, व एकंदर व्यवस्था पाहिली ह्मणजे इतर ठिकाणच्या कमिट्या केवळ बाहुल्यांच्या खेळासारख्या होत असें दिसतें. मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीकडे ३००० रुपये महिना पगाराचा एक कमिशनर आहे, त्याशिवाय अकौंटन्ट, इंजिनियर, हेल्थअफिसर, वगैरे कित्येक युरोपियन पगारदार असून त्यांना असिस्टंटही कित्येक आहेत. त्यावरून वाचकांचे मनांत या कमिटीच्या मोठेपणाची कल्पना येईल, त्याशिवाय गुदस्त सालचा तिचा रिपोर्ट प्रसिध्ध झाला आहे तो आमच्या पहाण्यांत आला नाहीं, तथापि त्याचे संबंधानें दुसरे पत्रांतून कांहीं लेख आले त्यावरून थोडीशी माहिती आम्ही आपले वाचकांस देतों.

गुदस्त साल[illegible]मास बजेटांत २९९६८७[illegible] पण साल अखेरीस निवळ उत्पन्न [illegible]७७२३ रु. झालें. ह्मणजे अजमासाबाहेर २२०८४६ रुपये जास्त आले.

एकंदर खर्च किती झाला तो आढळांत आला नाहीं. तरी फक्त कान्सरव्हन्सी ( शहरसफाई ) हलालखोर, जननमरण रेजिस्टर, देवी काढणें यासाठीं रुपये ५९१५५६ लागले.

गुदस्त सालीं पाऊस कमी पडला तरी विहाडवाटरचें पाणी शहराला पुरवलें. एवढें मात्र झालें कीं सकाळीं ज्यास पाणी मिळायाचें त्यानां रात्र होईपर्यंतही पाण्याची वाट पहात बसावें लागे. कारण अलीकडे लोक [illegible] फार मागूं लागले आहेत. व कापसाच गिरणीवालेही कित्येक लोक पाणी मागत आहेत त्याप्रमाणें त्यांना जर यावर्षीं पाणी दिलें असतें तर शहराला पाण्याचा तुटारा आला असता. विहाडप्रमाणें तुळशीचें पाणी आणण्याचा बेत चालू आहे तो लवकर अमलांत आला पाहिजे असें यावरून उघड दिसतें. पाणी मागणें व पाण्याविषयीं वाट पहाणें याच्या अर्थाविषयीं मुंबई न पाहिलेल्या लोकांच्या मनाचा घोटाळा होईल, त्यांस आह्मी सांगतों कीं मुंबईस बाहेरून पाण्याचे नळ बांधून आणिलेले आहेत व त्यावर देखरेखीस कामदार नेमिले आहेत त्यांच्या हुकुमाप्रमाणें हाताखालचे लोक प्रत्येक नळानीं पाणी सोडितात. व त्यांतून मग प्रत्येक घराला सोडितात. याजकरितां ज्या कोणास नळाचें पाणी नवीनच आपले घरीं घ्यावयाचें असेल त्याला तें अर्ज करून मागावें लागतें व त्याबद्दल रीतीप्रमाणें पैसे द्यावे लागतात ह्मणजे पाणीवाले त्याचे घराला नळाच्या तोट्या आणून लावितात व मग नित्य त्यास पाणी मिळूं लागतें तसेंच पाणी सोडण्याच्या हयगयी मुळें किंवा तें पुरविण्याच्या काटकसरीमुळें नित्य नेमाप्रमाणें कामदार लोक पाणी सोडीत नाहींत ह्मणून घरवाल्यास त्या करितां वाट पहात बसावें लागतें. पण ही गोष्ट फार वाईट आहे. पैसे खर्चूनही वेळेवर लोकांस पाणी न मिळावें ह्मणजे काय? पण लक्षावधि लोकांच्या सोयीची ही योजना आहे व पाणी पुरत नाहीं ह्मणून दुसरा मोठा नळ तुळशी गावाहून आणविण्याची तजवीज चालली आहे. त्यासही कोट्यावधि रुपये खर्च लागेल पण मुंबईची म्युनिसिप्यालिटी तो आणिल्यावाचून व लोकांची सोय केल्यावाचून रहाणार नाहीं.

गुदस्त सालीं देवीची सांथ मुंबईस बरीच आली होती. एकंदर १२१८ मुलें देवीचे आजारानें एका मार्च महिन्यांत मरण पावलीं व पुढें तो आजार कमी कमी होत गेला. शहरांतील इतर सर्व भागापेक्षां कामाठीपुऱ्यांत देवीनें अधिक मुलें मरण पावलीं. त्या भागांत गरीब व गलिच्छ अशा हिंदु व मुसलमान लोकांची वस्ती फार आहे व [illegible]विषयीं योग्य काळजी घेत[illegible] ह्मणतात. शोधावरून अ[illegible]आलें कीं, मुलें मरण्याची [illegible]त्यांचे वयाचे ७ वे महिन्यापासून १२ वे महिन्या पर्यंतची होती. तसेंच घरंदाज रहाणारा पेक्षां उपरी आलेले नवीन लोकांवरच या रोगाचा अंमल अधिक होता. अनियमित व अव्यवस्थित रहाणारे युरोपियन लोकांवर या रोगाची गदा आली तर त्यांस दुरुस्त होण्याची आशा थोडीच असतें असेंही या प्रसंगीं अनुमान झालें आहे.

गुदस्तां मुंबईंत महामारीचाही रोग उद्भवला होता व तेणें करून ३७८ मनुष्यें मरण पावलीं. या प्रसंगीं असा हिशेब काढिला आहे कीं, विहाडच्या नळाचें पाणी पिणारे व विहिरीचें पाणी पिणारे यांच्यांतून या रोगानें मरणारांची संख्या सरासरी सारखीच होती.

## पुण्यांतील पार्शी लोकांची अग्यारी.

आमचे एथील असिस्टंट कमिशनर मे. बहिमनजी साहेब यांचें घराणें मूळचेंच मोठें असून त्यांच्या लोकहिताच्या परोपरीच्या कृत्यावरून तें आणखी विशेष उदयास येऊं लागलें आहे हें ऐकून कोणासही संतोष झाल्यावाचून रहाणार नाहीं. एथें पार्शी लोकांची थोडीशीच वस्ती आहे पण त्याकरितां त्यांची धर्माची जागा अग्यारी ती नव्हती ह्मणून बहिमनजी साहेबांनीं स्वताचे खर्चानें अग्यारी बांधून तेथें अग्निस्थापना केली त्या वेळीं त्यांचे वडील बंधू खा. ब. दस्तुरजी साहेब त्या संस्थापनेकरितां एथें आले होते तेव्हां एथील मंडळीनीं त्यांस पाहिलें असेल. ते पार्शी लोकांचे धर्माध्यक्ष ह्मणजे आपले शंकराचार्याप्रमाणें आहेत. ते थोड्या महिन्यांमागें हैदराबादेस गेले होते तेव्हां निजाम सरकारानीं व त्यांच्या पदरच्या मंडळीनीं त्यांचा बहुमान केला व त्यांस मोलवान पोशाग दिले हाही मजकूर आमचे वाचकांस ठाऊक असेलच. हल्लीं एका विशेष गोष्टीनें त्यांची कीर्ति पुण्याच्या व मुंबईच्या वर्तमानपत्रांतून प्रसृत झाली आहे तिजविषयीं दोन ओळी लिहितों.

पुण्यास हल्लीं पार्शी लोकांचा समुदाय मोठा आहे व तेथें सोराबजी रतनजी पाटेल यांनीं ३५ वर्षांमागें एक अग्यारी बांधलेली होती तिची व्यवस्था खानबहादुर दस्तुरजी साहेब यांजकडे त्यांचे वडिलापासून होती. हल्लीं ती अग्यारी जीर्णदशेस आली व लोकसमूहाच्यामानानें फार लहान ह्मणून वाढविण्याचा विच्यार दस्तुर साहेबांनीं मनांत आणिला व त्यास त्यांच्या सर्व बंधूनीं संमति दिली त्यावरून फार मोठा खर्च करून त्या अग्यारीचा जीर्णोद्धार करण्याचें काम सुरू झालें. व आमचे दस्तुर बहिमनजी साहेबांनीं रजेंत पुण्यास राहून अंगें सर्व देखरेख करून व अतिशय श्रम करून मनाप्रमाणें सर्व काम पुरें केलें. नंतर त्यांत अग्नि संस्थापन करण्याचा संस्कार या महिन्याचे सहावे तारखेस झाला त्या वेळीं पुण्यांतील बहुतेक सर्व पार्शी मंडळी जमली होती व मुंबईहून व इतर ठिकाणाहून त्यांची मित्र मंडळी आली होती. धर्म कृत्याचें काम आटपल्यावर सभा भरली तींत दस्तुर होशंगजी सा. यांनीं त्या अग्यारीची मुळापासूनची सर्व हकीकत सांगितली ती ऐकून सर्व लोकांस मोठा संतोष झाला. खान बहादुर दस्तुरजी साहेबांनीं हें उत्तम काम हातीं धारिलें आहे सबब त्याच्या समारंभाच्या प्रसंगीं त्यांचा गौरव करावा एतदर्थ सर्व पार्शी लोकांनीं पूर्वींच एक सभा भरवून तींत ठराव केला होता कीं दस्तुरजी साहेबांचे, या परोपकाराचे उत्तम कृत्याकरितां, आभार मानावे व त्यांस ९०० रुपये किमतीची एक शालजोडी नजर द्यावी त्या ठरावाप्रमाणें डेप्युटेशन बरोबर ती शालजोडी या समारंभांत आली होती व दस्तुर साहेबांस मोठ्या सन्मानपूर्वक मंडळीनें ती नजर [illegible] दुसरे हीं कित्येक गृहस्थानीं दिवाणींत कित्येक शालजोड्या [illegible] झालेल्या नुकसान्नीं सर्वांचे आभार [illegible] मेजवानी झाली तींत सुमार ५०० पार्शी गृहस्थास आमंत्रण होतें. बेत फारच उत्तम ठेविला होता. व सर्व मंडळी त्या योगानें फार संतोषित होत्साती दस्तुरजी साहेबांची कीर्ति गात घरोघर गेली.

## वऱ्हाड

या सगळ्या आठवड्यांत पर्जन्य नाहीं. गेले आठवड्यांत बुधवारीं मृग लागतांच पर्जन्य पडला व गुरुवारींही बरेंच शिपणें झालें त्यावरून लवकर पाऊस लागेल असें वाटलें होतें पण पुढें आज ११ दिवसांत त्याचें नाव नाहीं. ढग येतात व मोठा पाऊस पडेल अशी गर्जना होते इतक्यांत सुसाट्याचा वारा सुटून चहोकडे निरभ्र व निर्जल होतें. व दोनप्रहरीं उन्हाळा तर केवळ असह्य असा हाऊं लागतो व रात्रीं वारा सुटतो. काल रात्रीं मोठा वारा सुटून फार थोडा पाउस पडला. अधिक मासाचे संबधानें पाहिलें तर वर्षाचा हा आषाढ महिन्याचा दुसरा आठवडा आणि अजून पाऊस सुरू होत नाहीं ही मोठी दुखाची गोष्ट आहे. आर्द्रा नक्षत्र बुधवारीं लागतें त्याची तरी चांगली वृष्टी होवो असें आह्मी इच्छितो.

हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट मे० स्मिथ साहेब यांची इराणी अखातावर रेसिडेंटचे जाग्यावर नेमणूक झाली होती व त्या धोरणानें मि० डनलप साहेब इकडील असिस्टंट कमिशनर यांस सेकंड असिस्टंट रेसिडेंटची जागा मिळाली होती व त्याप्रमाणें ते आज जाणार होते. त्यानीं आपले बरोबर न्यावयाचें तें सर्व सामान पुढे रेलवेमार्गें रवाना केलें, घोडे वगैरे पायवाटेनें पाठविले, न नेण्याजोगें सामान कमी किमतीनें विकून टाकिलें व हा सर्व प्रकार झाल्यावर तारायंत्रांतून त्यांनां लिहून आलें कीं आपली बदली राहित झाली आहे; कां कीं मे० स्मिथ साहेब आपले नवे जागेवर जात नाहींत. हा प्रकार मोठा चमत्कारिकच झाला. स्मिथ साहेब यांची नेमणूक होऊन तीन आठवडे झाले, व डनलप साहेब यांस बऱ्याच दिवसांनंतर हुकूम झाला, तेव्हां तो स्मिथ साहेब जाणार हें समजूनच झाला असेल आणि आतां त्यांनीं आपला बेत एकदम रहित केल्यानें डनलप साहेब यांचें सामान सुमानाचें विनाकारण नुकसान झालें व त्यांस त्रास सोसावालागला. असें झालें नसतें तर फार बरें होतें. व पुढें सरकार अशा नेमणुकी करण्याचे कामीं योग्य काळजी घेऊन कोणाचे मनास दुःख व सामानास नुकसान आणणार नाहीं असें आह्मी इच्छितों.

सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे रेसिडेंट महाबलेश्वरीं रजेवर गेले होते ते आपली रजा पुरी करून हैदराबादेस येऊन दाखल झाले.

रा. रा. बापुजी रंगनाथ एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर मंगळवारीं मंडळीच्या भेटीस एथें आले होते व बुधवारीं अडगावाकडे गेले. तसेच रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण हेही अडगावाहून एथें येऊन गुरुवारीं मलकापुराकडे गेले.

असें वर्तमान आहे कीं, उमरावतीस पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल आहेत त्यांजकडे स्यानिटरी कमिशनरकडील जेल इन्स्पेक्टरचें काम देणार.

येथील धर्मार्थ दवाखान्यावरील डाक्टर अय्याकानू हे महामारीचे दिवसांत गावांत हिंडून फार मेहनत करितात व लोकांस औषधें देतात सबब त्या दिवसांत त्यांनां म्युनिसिप्यालिटीकडून कांहीं विशेष नेमणूक मिळावी असा विच्यार चालू आहे.

उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट यांनीं रजा घेतली आहे व परवाचे दिवशीं ते येथें आले आहेत.

उमरावतीस गेल्या बुधवारीं रात्रीं थोडाच वेळ पण चांगला पाऊस पडला. नागपुराकडेही चांगली पर्जन्य वृष्टी झाल्याची खबर आली आहे.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब फर्स्ट असिस्टंट कमिशनर रजेवरून आज उद्या एथें येतील.

क्या० ग्राट साहेब एथील स्माल काज कोर्टाचे जडज तीन महिन्याचे रजेवर गेले आहेत ते जुलाईचे दुसरे तारखेपर्यंत येतील व तोंपर्यंत तें कोर्ट बंदच रहाणार असें ह्मणतात.

खानबहादूर नबाब शाबूदीन साहेब उमरावतीचे असिस्टंट कमिशनर रविवारच्या सुटींत एथें आले होते.

गेले सोमवारीं एथें घोड्यांच्या शर्यती झाल्या.

## वर्तमानसार

REGISTERED NO. 6, 1877.



अलाहाबादेस वकिलीची परीक्षा देण्याकरितां २००० उमेदवार होते त्यांत १३ पास झाले.

सिंध प्रांत मुंबईकडून पंजाबाकडे देणार व त्याचा सरहद्दीचा भाग हिंदुस्थान सरकार आपले कडे ठेवणार.

मेरिडानेरी नावाच्या एका युरोपियन स्त्रीनें टपालचें रद्द झालेलें टिकीट पुन्हा पत्रास लाविलें असा गुन्हा तिजवर शाबीद झाला सबब हावरा एथील माजिस्त्रेटानें तिला ९ महिने सक्त मजुरी कैदेची शिक्षा दिली व ती हुबळीच्या सेशन जज्जानीं मंजूर केली, आतां त्या स्त्रीचे इष्टमित्रांनीं हायकोर्टास अपील केलें आहे.

लाहोराहून तारायंत्रांतून वर्तमान आलें आहे कीं, काबुलच्या अमीरानें इंग्लिश सरकारच्या नोकरींत असलेल्या सर्व आफगाण लोकांस असें कळविलें आहे कीं, त्यांनीं तिकडील नोकरी सोडावी किंवा इकडे त्यांची बायका मुलें आहेत तीं घेऊन जावीं. इंग्लिश राज्यांतील व्यापारी लोकांस काबुलांत येण्याची मनाई केली आहे व पेशावराशीं जें दळणवळण होतें तें अगदी बंद केलें आहे.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब पुण्यास आले आहेत.

कापी राईटचा कायदा हिंदुस्थानांत चालू करावा असा सरकारचा विच्यार आहे.

इंग्रज सरकारानें कित्येक नेटिव राजापासून ७८ लक्ष रुपये कर्जाऊ घेतले आहेत. व इंग्लंडांत ३॥। कोटि रुपये स्टेट सेक्रेटरीनीं कर्जाऊ घेण्याची तजवीज केली आहे. शिवाय २॥ कोटि रुपये रयतेकडून कर्ज घेण्याची वेगळी तजवीज झालीच आहे.

हिंदुस्थान सरकारला २॥ कोटि रुपये कर्ज घ्यावयाचें आहे. त्या विषयींची जाहिरात ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे. ते दर साल दर शेकडां ४ रुपये व्याज देणार ज्या लोकांस आमचे कर्ज घ्या म्हणून अर्ज द्यावयाचे असतील त्यांनीं ते कलकत्यास जुलाइचे ९ वे तारखेस द्यावे.

मुंबईस कापड तयार होतें तें मद्रास, मलबार, सिलोन, कलकत्ता, कच्छ, काठेवाड, कराची, ग्वादर, मकराण, इराण, बगदाद, रसोरा, महामोरा, एडन, जेद्दा, मस्कत, कोहट, हांगकांग, सिंकापुर, पिनांग, जपान, योकोहामा, मागीशस, गोवें, दमण, दीव, रंगुन, पोंदेचरी, मालदीवबेटें, सुएझ, न्यूसाउथवेल्स, वगैरे ठिकाणीं जातें. एप्रिल महिन्यांत १३४२६३८ यार्ड सफेत कापड, १९३७४४ रंगीत कापड, आणि १४८३९९२ यार्ड सूत सदरील सर्व ठिकाणीं मिळून रवाना झालें.

स्पर्शसंचारी रोगाविषयींचा आक्ट मुंबईस पुन्हा चालू करावयाचा आहे पण म्युनिसिप्यालिटी कडून पैसे मिळण्याचे तजवीजीपर्यंत तकूब आहे.

दुष्काळाच्या मुलखांतून मुंबईस गेलेले लोक परत बाहेर देशीं पाठविल्याचे योगानें मृत्यूची संख्या बरीच कमी झाली आहे. आठवड्यांत साडेआठशें लोक मरत ते सहाशावर आले.

हालंड देशची राणी मरण पावली.

पारिस एथील म्युनिसिपल कौन्सलचे प्रेसिडेंट भाषण करीत असतां त्यांत मार्शल म्याकमोहन याविरुद्ध कांहीं बोलले सबब त्यांस कैद केलें आहे.

दर आठवड्यांत २६॥। लक्षांच्या हुंड्या विलायतच्या खर्चा करितां हिंदुस्थानावर केल्या जातील म्हणून स्टेट सेक्रेटरी कडून हिंदुस्थान सरकारास लिहून आलें आहे.

ता. ३० माहे मे रोजीं मुंबई एथें दोन सिंहाचीं पिलें त्रावण कोरचे महाराजांनीं पाठविलीं असून या पिलां पैकीं एक श्रीमंत महाराज गाईकवाड सरकार यांस व दुसरें श्रीमंत होळकर सरकार यांस देणार.

इतके दिवस म[illegible]ील दुष्काळ संबंधी चालू असले[illegible] लोकांस आदितवारचा [illegible] परंतु तेथील सरव[illegible] आहे कीं, आदितवारचा रोजमुरा [illegible] लोकांस शनवारीं देत जावा.

हैन[illegible] जनरल ट्राफिक १२ जून १८७७

विलायतेतील पार्लमेंट सभेचें हिंदुस्थान संबंधांचे "ब्लयू बूक" नावाचें पुस्तक नुकतें छापून प्रसिद्ध झालें आहे. यावरून कळतें कीं हिंदुस्थानांत इंग्रज सरकारच्या ताब्यांत ९०७०८६ चौरस मैल प्रदेश आहे यांत लोक वस्ती १९०५६३०४८ आहे व बाकीचे म्हणजे ५४६१९९ चौरस मैल जमीन नेटिव संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. यांत ४०२६७९१० लोकसंख्या आहे म्हणजे एकंदर हिंदुस्थानांत लोकसंख्या २३८८६०९५८ आहे त्या पैकीं १३९२४०५६८ हिंदू, मुसलमान ४८८८२९३७, सिक ११७४४३६, जैन धर्माचे २८३२८५१, व ८९६६५८ खिस्ती व बाकीचे इतर धर्माचे लोक आहेत. न्या. सिं.

राणी सरकारचे मुलांस दरसाल उत्पन्न खालीं लिहिल्याप्रमाणें मिळतें:— प्रिन्सेस रायल ८०००० रुपये, प्रिन्स आफ वेल्स ४०००००, व प्रिन्सेस आफ वेल्स १०००००, प्रिन्स आलफ्रेड २५०००० व प्रिन्स आरथर व प्रिन्स लीओपालड यांस प्रत्येकांस १५००००, प्रिन्सेस आलिस, हेलीना व लुइस यांस प्रत्येकीस रुपये ६०००० मिळतात.

आषाढ वद्य १ बुधवारपासून वद्य ४ मंदवारापर्यंत ४ दिवस मुंबईच्या पूर्वेस ५०० कोसक्षेत्रांत बहुत मेघवृष्टी होईल. तसेंच चालू पंचांगावरून ज्येष्ठ वद्य ३ गुरुवारपासून वद्य ४ शुक्रवारपर्यंत १ दिवस वरील क्षेत्रांत मेघवृष्टी होईल, तथापि कार्तिक मासापर्यंत धान्याची महर्गता राहील असें एकानें भाकित केलें आहे.

धान्याचा नाश—जबलपुर रेलवेलैनीवर गारावारा नावाचें स्टेशन आहे तेथें थोडक्या दिवसांपूर्वीं धान्याचे सुमार पाऊण लक्ष गोण जळाल्याचें कळतें.

दुष्काळास मदत—मुंबई एथील मांडवींतील व्यापारी लोकांनीं दुष्काळामुळें ज्या लोकांस खावयास मिळत नाहीं त्यांस सकाळीं चुरमुरे व संध्याकाळीं पोटभर खिचडी देण्याचा क्रम सुरू केला आहे. या ठिकाणीं रोज १००० वर पान होतें.

जेड्डा (आरबस्थान) एथील एका गृहस्थानें मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी शेख अबदुल लतीफ यांस तिकडून ५ जिराफ, २ शहामृग, १ हरीण व अबिसिनियांतील १ अडीच फूट उंचीची गाय पाठविली आहे.

मुंबईचे ट्रामवे कंपनीचे डायरेक्टरानीं गिरगावांत ट्रामवेचा रस्ता वाढविण्याचा हुकूम दिला.

नुकतेंच कांहीं दिवसांपासून इजिप्त देशाची राजधानी केरो एथें २०० बायका भरबाजारांत विकल्या. ही बातमी इंग्रज सरकारास कळली असून इंग्रज सरकार त्याविषयीं चवकशी करणार.

"इंडियन ट्राकब्यून" नामक बनारस एथील पत्रांत लिहिलें आहे कीं धीरा या नावाचे गावीं एका स्त्रीस एक मूल झालें आहे. या मुलाचे डोक्याचे चारी बाजूस चार निरनिराळीं तोंडें आहेत. मूल बोलतें व त्यानें असें भाविष्य केलें आहे कीं एक आठवडापर्यंत अहोरात्र एकसारखा पाऊस पडावयाचा आहे.

हिंदुस्थानांतील नेटिव पलटणींतील लोकांचे पगार वगैरे तारीख १ जानेवारी पासून वाढविले आहेत त्याबद्दल सालीना १४ लक्ष खर्च अधिक होईल असा अजमास केला आहे. ने.ओ.

दरमहा ५००० किंवा त्याहून जास्त पगाराचे जे कामदार मद्रास शहरांत रहातील त्यांवर दरसाल २५० रुपये लायसेन्स टाक्स बसविण्याचा ठराव झाला आहे श. द.

---

## हिंदु व इंग्रज या उभयतांत वैमनस्य

धर्मांत किंवा गृहव्यवस्थेंत इंग्रज लोक कदापिही हात घालावयाचे नाहींत आणि त्यांचा राजकीय संबंधांत मात्र एतद्देशीय लोकांना पादाक्रांत करण्याचा हेतु असेल. अशा निराधार कल्पनेवर आमचे भोळ्याचे राजे हिंदु लोक इंग्रज लोकांवर फार दृढतर प्रेम करीत आले, त्यांच्या अनन्वित आणि काव्याच्या आज्ञा मानीत बसले आणि सरकार व इंग्रज लोक काय ते आमचे माय बाप आहेत या पवित्र मंत्राचा जप करीत बसले, परंतु इंग्रज लोकांचा तसा शुद्ध मनाचा भाव आणि पूज्यबुद्धी हीं न बसतां त्यांनीं मधुर शब्दजाल मात्र मोठें पसरलें व ज्याप्रमाणें धीवर आपल्या गरीच्या आकड्यास पिठाची अगर आमिषाची गोळी लावून अथवा जाळें पसरून जलांतील मच्छांस अथवा मच्छिणीस पाशांत घालतो त्याप्रमाणें हिंदू लोकांस अनेक हुलकावण्या दाखवून दृढ म्हणजे कधीं शिथिल न होणारा, जबर व अभेदक व वज्रासारिख्या गोड अशा शब्दपाशांत घातले. असो जें झालें त्यास कांहीं उपाय नाहीं हें खचीतच आहे. आतां सदरील पाशांत ते पूर्णपणें सांपडल्यानंतर एकंदरीनें आजपर्यंत हिंदू लोकांचा सहवास इंग्रज लोकांना दुःसहनीय तर वाटलाच होता, परंतु त्याकडून तो सहवास टाळण्याकरितां उघडपणें प्रयत्न चालू नव्हते, परंतु हल्लीं आम्ही जें म्हणूं किंवा करूं तें पातशाही अमलाच्या जोरानें सहजासहजीं चालेल असें इंग्रज लोकांस वाटूं लागल्यावरून त्यांनीं आम्हास हिंदू लोकांच्या सहवासाचा अथवा त्यांच्या समीप बसण्याचा अगदी तिटकारा आणि त्रास येऊं लागला आहे असे उघडपणें बोलण्याचा घातलेला परिपाठ पाहून हिंदू व इंग्रज या उभयतांत वैमनस्य पडण्याचा काल अगदी नजीक येऊन ठेपला आहे असें आमच्यानें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. पायोनियरच्या एका बातमीदारानें असें सुचविलें आहे कीं, ईस्ट इंडिया रेलवेप्रमाणें ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवेवर तिसऱ्या वर्गांतून प्रवास करणाऱ्या युरोपियनाकरितां निराळी आणि हिंदू लोकांपासून अगदीच विभक्त व पृथक असी सोय करावी आणि या सूचनेचा सरकार विच्यारही करीत आहे. युरेशियन व युरोपियन लोकांकरितां तिसऱ्या वर्गाची स्वतंत्र, विभक्त व पृथक सोय कां असावी याचीं कारणें आमच्या द्वेषी इंग्रजी पंडितांनीं दिलीं आहेत त्यांत ते असें म्हणतात कीं, हिंदू लोक घाणेरे, अर्धनग्न (विजार आणि बूट घातलेले नव्हत) वाचाळ आणि मूर्ख असल्या कारणानें त्यांच्या शेजारीं गोऱ्या, स्वच्छ, शहाण्या, अच्छादित आणि देखण्या इंग्रज लोकांनीं बसणें हें कायद्याबाहेरचें आहे. आतां या संबंधानें आमचें असें मत आहे कीं, तिसऱ्या वर्गांतून हिंदू लोक विशेषकरून प्रवास करीत असतात याचें कारण त्यांस पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाचें भाडें भरण्याची ऐपत नसतें हें नव्हें, तर बहुतकरून इंग्रज लोक पहिल्या व दुसऱ्या वर्गांतून प्रवास करणारे असून हिंदू लोकांच्या स्त्रिया वगैरे त्यांनीं आपआपल्या गाडींत पाहिल्या तर श्रीमदानें अर्धांच धुंद असल्यानें ते मूर्खपणाचा गोंधळच करून सोडतील, बीभत्स शब्द बोलतील, वेळेस अविचाराची धिंगामस्ती करतील आणि चिरूटानें व दारूनें व घाणेऱ्या विलायती लोणच्यांनीं घाण करून कोमल स्त्रियांस व मुलांस त्रास आणतील म्हणून हिंदू लोक तिसऱ्या वर्गांतून प्रवास करतात. असें असून युरोपियन व युरेशियन लोकांस हिंदू लोकांपासून वेगळें बसवा असें म्हणण्यास आमच्या इंग्रजी महापंडितास आशंका कशी वाटली नाहीं याचेंच आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. यांतलें सार इतकेंच आहे कीं, इंग्रज लोक हिंदूलोकांचे गृहव्यवस्थेंत हात घालून व लाजिरवाणीं मागणीं मागून हिंदूलोकांबरोबर वैमनस्याची अधिक वृद्धि करीत आहेत हें फारच भयंकर आणि मानसिक भ्रष्टतेचें चिन्ह आहे. तिसऱ्या वर्गांत युरोपियन व युरेशियन लोकांसाठीं निराळी सोय नसून चांगल्या स्वच्छ, नीतीनें वागणाऱ्या शहाण्या, व गरीब हिंदूलोकांसाठीं निराळी सोय असावी हेंच सांप्रतच्या व्यवहाराला ठीक दिसतें. इं. प्र.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० २४ माहे जून सन १८७७ इ० अंक २५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

[illegible] वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडेयन पेनिन्सुला रेलवे

NOTICE.

## नोटिस.

WARDHA VALLY STATE RAILWAY.

वर्धा व्हाली स्टेट रेलवे

शुक्रवार तारीख १५ जून सन १८७७ इसवी रोजीं व त्यापुढें वर्धा व्हाली स्टेट रेलवेचा पुढील भाग हिंगणघाट एथें केलेल्या नव्या कायमच्या स्टेशनापर्यंत सुरूं होईल आणि त्या तारखेपुढें दुसरी नोटिस होईपर्यंत मिक्स्ड गाडी सरकारच्या हुकुमाअन्वयें दरआठवड्यांत प्रत्येक मंगळवार, गुरुवार व शनिवार या दिवशीं हिंगणघाट कायम स्टेशन आणि जी. आय. पी. रेलवेचे वर्धा स्टेशन यांचे दरम्यान जाऊं येऊं लागेल.

ही आगगाडी वर्ध्याहून हिंगणघाटाला जाण्याला सदरील दिवशीं संध्याकाळीं ५ अवर १० मिनिटांनीं निघत जाईल व हिंगणघाटाहून वर्ध्याला जाण्याकरितां सकाळीं ९ अवर ३० मिनिटांनीं निघत जाईल. या गाड्या जी आय पी रेलवेच्या नागपुर मुख्य लायनीच्या जाणाऱ्या येणाऱ्या गाड्याच्या धोरणानें जाणार येणार आहेत.

सदरील तारखेस व त्या तारखेच्या पुढें हिंगणघाटाचे टेंपररी स्टेशन बंद केलें जाईल.

तारीख १५ जून पासून तारीख ३० सप्तंबरपावेतों दोन्ही दिवस धरून सरकार हुकुमा अन्वयें वर्धा व्हाली रेलवेवरील सर्व प्रकारच्या मालावर हल्लीं जो दर घेण्याचा साधारण शिरस्ता आहे त्याहून दर मणास ६ पै अधिक घेतल्या जातील. आणि गुडस, पार्सलें, प्यासेंजर [ उतारू लोक ] व इतर ट्राफिक याजबद्दल वर्धा व्हाली रेलवे वरील दरदाम लांबीच्या दूरत्वाचें प्रमाण व टर्मिनल्स वगैरे संबधानें, ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे प्रमाणें हिशेबी धरले जातील. तसेच कामाकाजाविषयींचे कायदेकानू ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे प्रमाणेंच वर्धाव्हाली रेलवेचे आहित असें समजावें व याजबद्दल आणखी माहिती पाहिजे असेल तर स्टेशनावर व खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळेल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई, १२ जून १८७७

## नोटिसा

बजाई मर्द दर्याजी व राघोजी वल्लद नटवाजी आरबट रहाणार मौजे पनोरें प्रगणे मूर्तिजापुर तालुके दर्यापुर यांशीं— महिमाजी वल्लद राजमोलजी टोळे रहाणार मौजे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची तुह्माकडे १२० रुपयांची रकम असून त्याचा पुर्जा दर्याजीचे नावचा आमच्यापाशीं आहे ती रकम हल्लीं व्याजासुध्धां सुमार २१० रुपयापर्यंत निघत आहे. सदर्हू दर्याजी मैत झाला व तुह्मी त्याचे जिनगीचे वारस आहा ह्मणून आह्मी तुह्मास दोनचार वेळा रुपये मागितले पण तुह्मी देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांचे आंत रुपये आदा करावे. असें न केल्यास तुह्मावर फिर्याद करून रुपये घेतले जातील व मग तुह्मास देणें भाग पडेल व कोर्टाचा खर्च आणि या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल कळावें. तारीख १९ जुलै सन १८७७ इसवी.

(सही) महिमाजी वल्लद राजमोलजी टोळे निशाणी खुद्द हातची

ताजाकलम—आमचा देणेदार दर्याजी हा मरण पावला तरी त्याची शेती नंबर ६, बैल ६, ह्मैस १, हेला १, कवलाचें रहातें घर १, याशिवाय तांब्या पितळचीं भांडीं कुंडी, सोन्या रुप्याचे डावडागिने व शेतीचीं आउतभांडीं असा सर्व खटला त्याचा तुमचे पाशीं आहे त्यावरून त्याचे देण्याचेही मालक तुह्मास झालें पाहिजे. अगर तुह्मी बेमानी केली व आमचे रुपये न दिले तरी सरकार सदर्हू मालाचा हरास करून आमचे रुपये देवविन हें खूप समजावें. कळावें तारीख मजकूर.

नोटिस.

भगुलाल ताराचंद दुकान अकोलें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, माझी मकानें ताजनापेठेंतील २००० रुपयांवर तुमचे पासी ताबेगहाण आहेत त्यांची दुरुस्ती तुह्मी ठेवावी असा करार असतां त्याप्रमाणें तुह्मी न करितां मकानें बिलकूल खराब केल्यामुळें आमचें नुकसान झालें आहे सबब तुह्मास अशी नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे रुपये २००० आह्मी देण्यांस राजी आहों परंतु मकानें पूर्वींचे स्थितींत आणण्यास जो वाजवी खर्च लागेल त्याबद्दल च्यार भलें मनुष्यें जे सांगतील तितकी रकम मजरा देण्याबद्दल आह्मास कळवून आठ दिवसांत घरें आमचे ताब्यांत द्यावींत बाकी राहिलेले रुपये तुह्मी द्यावे असें न केल्यास रीतीप्रमाणें दिवाणींत फिर्याद करून घरें व त्याबद्दल झालेलीं नुकसानीं तुमचे कडून भरून घेण्यांत येईल कळावें तारीख १९ माहे जून सन १८७७ इसवी.

( सही ) शेख मलंग वल्लद पीर अहमद साहेब रहाणार ताजनापेठ अकोले निशाणी खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपल्या पत्रामध्यें खालीं लिहिलेला मजकूर अवश्य छापाल अशी आशा बाळगून लिहिण्यास आरंभ करितों.

पत्रकर्ते महाराज आज कित्येक वर्षांपासून नागपुर पहाण्याची इच्छा उत्पन्न झाली होती ती या वर्षीं पूर्ण झाली. रेलवे स्टेशनावर उतरलें ह्मणजे स्वाभावीक दोन भाग झालेले दिसतात. एक दक्षिणेस आणि एक उत्तरेस. दक्षिणेचे बाजूस सीताबरडी ह्मणतात तेथें सर्व अमलदार, नेटिव व युरोपियन रहतात सेंट्रल प्राविन्सचे चीफ कमिशनर साहेबही तेथेंच रहातात म्युझियम हाऊस आणि बाग वगैरे पहाण्यासारखे देखावे आहेत आणि सर्व नागपुर शहरचें ऐश्वर्य एथेंच आलें आहे असें ह्मटल्यास चालेल. एथील किल्ला मोडकळीस आला असून त्याचा बहुतेक भाग पडला आहे. या ठिकाणीं मागेझाईन ( दारू गोळा ) फक्त आहे. आता उत्तरेकडील भागाचें वर्णन करितों.

आरंभीं कापसाची गिरणी लागते तिजमध्यें सूत काढणें आणि गावठी हलक्या प्रकारचें कापड विणणें सुरू आहे व तिचें अर्धें काम अजून व्हावयाचें आहे. या ठिकाणीं २६ नंबरपर्यंत सूत निघतें. सुमार ५०० चाती चालू असून २०० वर मनुष्य कामावर आहे. या कारखान्यापासून कांहीं दिवसांनीं कोष्टी लोकांच्या पोटावर पाय येणार आहे. नागपुर शहरांत कमींत कमी सुमारें १००० वर कोष्टी लोकांची घरें आहेत. या लोकांचें उदरपोषण हातावरचें आहे असें ह्मटल्यास चालेल. चालू सालीं महागाई बरीच असल्यामुळें या लोकांच्या मालाला कोणी विचारीत नाहीं ह्मणून कित्येक गोर गरीब उपास काढितात. गिरणीजवळ जुमानावाचा तलाव आहे तो फार विस्तीर्ण आहे आणि त्याचे दोन भाग झाले आहेत. शहरापासून हा तलाव नजीक असून पाण्याची जितकी सुपीकता असावी तितकी नसून बरीच विपत्ति आहे असें ह्मटल्यास चालेल. हल्लीं नवीन नेलेलें नळाचे २०० पासून ५०० घराच्या अंतरानें उश्वास आहेत व तेथेंच काय ती पाणी भरण्याची सोय आहे तरी त्या ठिकाणीं फारच अव्यवस्था आहे असें दिसून आलें तशी दुसऱ्या सुधारलेल्या शहरांत नसेल. सर्व जातीचे लोक त्यांत घामट जातीचे देखील येऊन पाणी भरतात व स्वच्छता ह्मणजे काय हें तर तेथें पहाण्यास नको. आह्मांस असें वाटतें कीं १० वर्षांत देखील चुना अगर गिलावा मोठमोठ्या हवेल्यास कोणी केला आहे असें दिसत नाहीं याचें कारण काय असेल तें असो.

एथें देवालयें बरींच आहेत व तीं बहुतेक [illegible] दगडानें बांधलीं आहेत [illegible] वालय इसवी सन १७९५ त बांधलें असे लेख लिहिले आहेत. नागपुरचें राज्य, धर्मराज्य होतें असें वाटतें. कारण गल्लोगल्लीं देवालयें बरींच आहेत. नागपुरच्या राजास ४ स्त्रिया होत्या त्या प्रत्येकीस एक एक मंदीर व त्याजमध्यें बागबगीचे चांगले लावून दिलेले आहेत त्यांत मोतीबाग व तुळशीबाग पहाण्यासारखे आहेत परंतु व्यवस्था नीट नाहीं असें दिसतें. नागपुर शहर केवळ राजाविरहित आहे असें दिसतें. कारण ज्या हवेलींत नामधारी जानोजी राजे आहेत तिचे पुढील भागास तर चुना व गिलावा देखील नाहीं. नुकत्याच मरण पावलेल्या राणी दाजीबाई साहेब यांस सालीना ४५००० रुपये पेनशन मिळत होतें, आनंदी बाई साहेब मेल्या त्या वेळेस त्यांचे नोकर लोकांस यांणींच आश्रय दिला होता परंतु आतां यांच्या लोकांस कोण देतो पहावें. ते लोक फार हवालदील होऊन गेले आहेत.

राजे बुऱ्हाणशहा यांचा बंदोबस्त वगैरे नावाप्रमाणें चांगला व्यवस्थित आहे व त्यांचा वाडा वगैरे पहाण्यासारखा असून आणखी नवीन कामही सुरू आहे. यांचा मानमरातब चांगला आहे यांस सालीना उत्पन्न काय आहे हें समजलें नाहीं. हे जातीचे मूळचे गोंड असून मुसलमान झालेले आहेत.

नागपुरच्या ईशान्येस कामठी आहे या ठिकाणीं इंग्रज लोकांची फौज रहात असते हा गाव भरवस्तीचा असून याठिकाणीं व्यापार कपड्याचा आणि धान्याचा चांगला चालतो. ही रायपुर व बालाघाटची उ

तारपेठ आहे. क्यांपमध्यें आणि गावामध्यें अंतर अर्ध मैल आहे. नागपुर शहरांत व त्याचप्रमाणें एथेंही घोड्याच्या गाड्या थोड्याच मिळतात. ज्याप्रमाणें पुण्यास अगर मुंबईस मिळतात त्याप्रमाणें एथें मिळत नाहींत. नागपुरास म्युनिसिप्यालिटी आहे किंवा नाहीं हें समजत नाहीं, व जरी कदाचित असली तरी तिजपासून जीं कामें होण्याचीं तीं होत नाहींत. रात्रीं दिवे तर कोठेंच लागत नाहींत, सडकेवर पाणी शिंपीत नाहींत, व भरउन्हाळ्यांत शहरांतील गटारांतील गलिच्छ पाणी वाहून गल्या खराब झालेल्या सर्वत्र दिसतात. याजवरून नवीन मुशाफरास वाटेंत कीं एथें इंग्रजी अंमल आहे किंवा नाहीं कोण जाणें! स्टेशनावर धान्याचीं पोतीं ठेवण्यास जागा नाहीं, सुमारें १ लाख पोतीं कंपौंडांत पडलेलीं आहेत. कळावें पत्रविस्तारास्तव लेखणी आटोपतों. ता. १८ माहे जून सन १८७७ इसवी.

एक "क्ष"

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः——

वि. वि. गेल्याआठवड्याच्या प्रमोदसिंधूत मि० लक्ष्मीपती नायडू बारिस्टर यानां मद्रासेकडे चांगल्या अधिकाराची जागा लवकरच मिळणार, असें ते पत्र कर्ते एका पत्राचे आधारानें लिहितात, व थोड्या दिवसां मागें आपल्या वऱ्हाडसमाचारांतही बारिस्टर साहेब सिमल्यास गेले आहेत व त्यास नोकरी मिळण्याची लढण्य तजवीज चालू आहे अशा अर्थाचें कोशिहिलें आहे त्याप्रमाणें यांना जागा मिळावी अशी बहुत लोकांची इच्छा आहे; कारण हे नामांकित विद्वान आहेत व विलायतेपर्यंत जाऊन परीक्षा देऊन आले आहेत सबब असे गृहस्थाचा वऱ्हाडास लाभ झालेला आहे तो अंतरावा अशी कोणाची इच्छा नाहीं, सबब सरकारानीं मेहेरबान होऊन इकडेसच कोठें त्याना जागा दिली असतां चांगलें होईल. कळावें तारीख २० माहे जून सन १८७७ इसवी.

एक वऱ्हाडवासी.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ शुद्ध १४ शके १७९९

---

## ब्राह्मणांची वर्णव्यवस्था आणि ख्रिस्ती लोकांची गुलामगिरी.

या विषयावर रावबहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं पुण्यास गेले महिन्यांत एक सुरस व्याख्यान दिलें तें नुकतेंच इंग्लिश भाषेंत आमचे पहाण्यांत आलें, हा विषय फार महत्वाचा, व व्याख्यान देणारे प्रख्यात विद्यानयनिपुण ह्मणून त्यांचे विच्यार व युक्ति आणि विषयाचें प्रतिपादन आपच्या वाचकांस अंशतः तरी कळावें ह्मणून आह्मी त्यांच्या भाषणाचें मेरार्टीत ठिपण करून इकडील लोकांस सादर करितों. रानडे यांचे विच्यार फार चांगले आहेत. त्यांनीं हल्लीं आपले देशांत शूद्र मुळींच नाहींत असें प्रतिपादन केलें आहे तें मोठें सोयीचें आहे व दुसऱ्याही त्यांच्या व्याख्यानांत महत्वाच्या गोष्टी आहेत, तर लोकांनीं त्यांच्या मताचा विच्यार करून त्याप्रमाणें वागावें. व नीचतेप्रत गेलेला देश लोकांचे पूर्ण ऐक्यानें पुन्हा लवकर उच्चत्वास यावा अशी आमची फार इच्छा आहे व ती कृपाळु परमेश्वरानें आशीर्वाद देऊन सिद्धीस न्यावी.

### व्याख्यान.

बाह्य दृष्टीनें पहाणारास हा ब्राह्मणांचा जातिभेद व गुलामगिरी यांचा सारखेपणा दिसणार नाहीं. सुधारलेल्या ख्रिस्ती राष्ट्रांतूम गुलामगिरी कित्येक हजार वर्षे चालून हल्लीं ती बंद झाली आहे. अमेरिकेंतील सन १८६० पासून १८६४ पर्यंत चाललेल्या लढाईंत तिचा खरोखर अंत झाला व हा जातिभेद गुलामगिरीच्याही पूर्वींपासूनचा असून हिंदुस्थानांतून तो नाहींसा झाला नाहीं. तो अजून जिवंत आहे. त्यानें बौध्ध धर्मावर, मुसलमानी धर्मावर, व थोडाबहुत ख्रिस्ती धर्मावरही जय मिळविला आहे. या जातिभेदानें हिंदुस्थानांतील मूळचे लोक, किनाऱ्यावरील लोक, व डोंगरी लोक यांसही आपणांत सामील केलें आहे व तो अजून- करीतही आहे. त्याची शक्ति लोकांचें बरें करण्यापेक्षां वाईट करण्याकडे हल्लीं अधिक आहे हें सर्वांस चांगलें ठाऊक असेल. जातिभेद हा मंडळींत फुटाफूट करणारा आहे. तो हलक्या जातीवर दाब राखतो व उंच वर्णाला नीचतेप्रत नेतो, ह्मणून वरवर पहाणाराला हा सजीव जातिभेद व निर्जीव गुलामगिरी यांत सादृश्य आहे असें वाटणार नाहीं. जातिभेदाचें मूळ वेगवेगळ्या प्रकारचें मानिलेलें आहे.- कोणी ह्मणतात कीं जातिभेद ईश्वरानें निर्माण केला आहे, कोणी ह्मणतात तो धर्माधिकाऱ्यांचा कावा किंवा राजकीय मसलत आहे, कोणी ह्मणतात वेगवेगळ्या धंद्याकडे मनुष्याची श्रम वाटणी व्हावी ह्मणून हे भेद केलेले आहेत, व दुसरे कित्येक ह्मणतात कीं देश, भाषा, नीति, वंश, धंदे आणि धर्म यांच्या फरकावरून हा जातिभेद उत्पन्न झाला. तथापि या सर्व प्रकारावरूनही हिंदुस्थानांत हल्लीं ज्या प्रकारचा जातिभेद आहे त्याचा प्रबोध होत नाहीं; कारण सदर्हू कारणें आहेत तीं थोड्या फार अंशानें सर्व राष्ट्रांतून आहेत परंतु तेथें इकडच्यासारखा जातिभेद नाहीं. जातिभेदाच्या उत्पत्तीविषयीं वर जे प्रकार सांगितले त्यांच्या योगानें वास्तवीक पहातां जातिभेद मूळ उत्पन्न झालेला नाहीं, असलेला अधिक दृढ होऊन तो विकोपास मात्र गेला. जातिभेदाचें खरें मूळ पाहिलें तर तें गुलामगिरीच्याच साम्यतेचें आहे. जेव्हां जेव्हां च्यार वर्णांतून एकादा वर्ण प्रबल व विशेष प्रबुद्ध होऊन आपल्याहून कमी प्रतीच्या बाकीच्या वर्णास जिंकितो तेव्हां तेव्हां पुढें लिहिलेल्या तीन प्रकारांतून एकादा प्रकार घडून येतो. १ जेथें कमी प्रतीच्या जाती शारीर शक्तीनें दुर्बळ आणि सुधारणेंत निकृष्ट असतात तेथें त्या नाहींशा होतात किंवा नाहींशा करून त्यांचें बीबुड करून टाकिलें जातें, जसें उत्तर अमेरिका, आस्ट्रेलिया व पासिफिक महासागरांतील बेटें यांत झालें आहे तसें.— २ जेथें कमी प्रतीच्या जाती शारीर बलानें सुदृढ पण बुद्धिमत्तेनें दुर्बळ असतात तेथें त्या जातीचे लोक जिंकलेल्याचे दास, कृषीक, अथवा सर्व प्रकारानें नागविलेले असे होऊन रहातात. जसे पश्चिम हिंदी बेटांतील आफ्रिकन शिद्दी लोक व अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांतील लोक. प्राचीन काळीं एका राष्ट्रानें दुसरें राष्ट्र जिंकून घेतलें. म्हणजे तेथें असा परिणाम होत असे. ग्रीक आणि रोमन लोकांनीं हजारों लोकांस गुलाम केलें. प्रापंचिक कामाकाजांत बहुत गुलाम पदरीं असणें हें त्यांच्यांत मोठें प्रतिष्ठास्पद समजलें जात असे. ३ आतां तिसरा प्रकार असा आहे कीं, जिंकणारे व जिंकले जाणारे यांच्यांत तफावत अधीक परंतु ती केवळ बेसुमार नाहीं. असें असलें म्हणजे तेथें जातिभेद निर्माण होतो. मग श्रेष्ठ जातीचे लोक सर्व सत्ता व शहाणपण आपलेकडे राखून ठेवितात. आणि जिंकिलेल्या बहुतेक जातीच्या लोकांच्या मेहेनतीवर आपला निर्वाह करितात. व त्या गरीब जिंकलेल्या लोकांस आपल्या मेळापासून दूर बहिष्कृतासारखें ठेवितात. जुन्या काळीं हें कसकसें घडून आलेलें आहे याची साक्ष हल्लीं आपल्या इतिहासांतील गोष्टी वरून चांगली पटते. आपल्या देशांत चार जाति होत्या पण इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान घेतांच त्यांची पाचवी जाति झाली व ती पहिल्या चोहोंहून श्रेष्ठ ठरली. इंग्लिश लोक आपणांत जातिभेद असल्याप्रमाणें दाखवितात व श्रेष्ठ जातीस जे हक्क आणि स्वातंत्र्य असतें त्याचें आपणावर प्रावर्ण घेतात व इतर जातीच्या लोकांनां बहिष्कृताप्रमाणें वागवितात. आतां या व्यवस्थेंत कांहीं असाधारण प्रकार आहे असें नाहीं. कित्येक लोकांनां वाटतें कीं, ख्रिस्ती धर्म जातिभेदाच्या विरुद्ध आहे, हें कदाचित खरें असेल, पण इतिहासाच्या प्रत्यक्षप्रमाणावरून ज्या गोष्टी दिसून येतात त्यांवरून असें सिद्ध होतें कीं ख्रिस्ती धर्म हा या जातिप्रकरणांत केवळ दुर्बळ हून दुर्बळ आहे. मनुष्यें जो धर्म आचरतात त्याचे योगानें त्यांच्या स्वभावावर किंवा गुण[illegible] वर चांगला अंमल बसतो असें कांहीं नाहीं. उदाहरण पहा कीं ख्रिस्तियन लोकांचीं गुलामगिरी ही मूर्तिपुजकांच्या गुलामगिरी पेक्षां ही फार भयंकर होती. अमेरिकेंतल्या काळ्या लोकांशी ख्रिस्ती लोकांनीं जें वर्तन केलें तें परम निंद्य व अवर्णनीय होय. अमेरिकेंतील राज्यव्यवस्था पृथ्वितील सर्व राष्ट्रांपेक्षां फार सवलतीची आहे, तेथील राज्य लोकसत्तात्मक आहे, तेथील लोक उत्तम धर्मात्मे आहेत, तथापि तेथील गुलाम बाळगणारे ख्रिस्ती लोक आपले गुलामास जसें वागवितात तसें आपण आपल्या मुक्या जनावरांसह कधीं वागविणार नाहीं. अशा अमेरिकेंतही गुलामगिरी मोडण्याकरितां आपआपसांत ५ वर्षे लढाया झाल्या, व साऱ्या एकत्र संस्थानांचा नाश होतो कीं, काय असें भय पडलें, मग परिणामीं त्या गुलामगिरीचा अंत झाला, पण तोही गुलाम बाळगणारांच्या संमतानें झाला असें नाहीं, त्यांची अगदी संमती नसतां झाला. इंग्लंडांतही गुलामगिरी मोडण्याकरितां ५० वर्षे सतत खटपट चालू होती. असें हें राजकीय आवेशाचें किंवा जातिभेदाचें प्राबल्य आहे. आणि आमचा जातिभेदही हिंदुस्थानांतील मूळचे रहाणारे लोकांस आमचे पहिले तीन वर्णाचे लोकांनीं पराक्रमानें व अकलेनें जिंकिलें याचा दर्शक आहे. आमच्या दयाभूतपणानें एथील मूळच्या लोकांस गुलाम न करितां, होते तसेंच राहूं दिलें हें ब्राह्मण धर्मास मोठें भूषणास्पद होय. जे लोक जातिभेदाची निर्भर्त्सना करितात, त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, जातिभेदानें शूद्राला (हलके जातीला) २ तऱ्हेचे जे २ निकृष्ट परिणाम व्हवयाचे त्यापासून बचाविलें आहे. विशेषें आमच्या वर्णव्यवस्थेनें शूद्राला आपणांत घेतलें व त्या योगानें त्यांना उच्चतेप्रत येण्याला मार्ग राखिला; या वर्णव्यवस्थेपासून जीं अनिष्टें उत्पन्न होतात त्यांस उपायही ही वर्णव्यवस्थाच उत्पन्न करिते; ह्मणजे जेव्हां उंच वर्णाचे लोक आळशी व ऐशआरामी होऊन सुधारणा करण्याचें सोडून देतात तेव्हां हलके वर्णाचे लोक उदयास येऊन पराक्रमी व शहाणे होतात. आमचा मागील इतिहास असें घडल्याचीं ताजीं उदाहरणें दाखवितो. आपल्या देशांत ज्या राजकीय अदलाबदली झालेल्या आहेत त्यांत धनगर, गुराखी, कुणबी या जातींतील कित्येक पुरुष उदयास येऊन सिंव्हासनारूढ झालेले आहेत व हजारो शूद्र लोक मोठाले मानवान सरदार होऊन गेलेले आहेत आणि त्यांचीं कुळें त्यांच्या कीर्तीमुळें व प्रतिष्ठेमुळें देशास केवळ भूषण अशीं होऊन राहिलीं आहेत. आमचा धर्मसंबंधी इतिहास पाहिला तरी ही अशा गोष्टी पुष्कळ आढळतील. जे मोठमोठाले तपस्वी ऋषी झाले ते हलके वर्णांतले होते, ब्राह्मण नव्हते. हिंदुस्थानांतील इतर भागांत तर ब्राह्मण जातीस इतरांपेक्षां कमी मान आहे; आतां महाराष्ट्र देशांत जी तद्विरुद्ध स्थिति आहे ती ह्मणजे ब्राह्मणांला इतरांपेक्षां अधिक मान आहे तो ब्राह्मणांच्या जुन्या काळच्या पावित्र्याकरितां नव्हे, तर पेशवे, पटवर्धन, रास्ते, फडके वगैरे जे ब्राह्मण वीरपुरुष गेले शतकांत आपले अद्भुत पराक्रमानें प्रसिद्धीस आले त्यां करितां आहे. यास्तव जे जातिभेदाच्या विरुद्ध मताचे असतील त्यानीं या गोष्टीचा आठव करावा. आणि आपलें मत बदलण्यास उदार व्हावें. या वरील गोष्टी जातिभेदापासून घडत असलेले अनर्थ टाळण्या विषयीं जे प्रयत्न चालू आहेत त्यांस व्यत्यय आणितात असें नाहीं. पाचवा वर्ण च्यार वर्णांवर वरचढ झाला आहे त्यानें तर अशी खास अवश्यकता उत-

न केली आहे कीं. बाकीच्या सर्वांनी आपणा मधील उणीव काढून टाकावी व सर्वांनी एक विच्यार होऊन आपली शक्ती वाढवावी. व पराक्रम करून दाखवावा. आतां जो पराक्रम दाखवावयाचा आहे तो पराभूत झालेल्या आप आपसांतल्या जातींत लढाई करून दाखवावयाचा आहे असें नाहीं. तो पाश्चिमात्य जातीवर वर्चस्व करून दाखवावयाचा आहे. याचा कोणी असा अर्थ समजूं नये कीं, इंग्लिशांची हिंदुस्थानांत जी राजकीय सत्ता आहे तिच्या विषयीं कुरकुर करण्यास. आह्मांस कांहीं कारण आहे. आमचें तर असें ह्मणणें आहे कीं, आमच्या देशांतील कनिष्ठ दशेस आलेल्या जातींचे ऐक्य होऊन त्यांनीं सुधारणेचा उद्योग जास्ती करावा ह्मणून परमेश्वरानेंच या इंग्लिश राज्याची या समयास योजना केली आहे. जशी रोम देशांतील प्याट्रिशियनच्या योगानें प्लेबियन, लाटिन, व ग्रीक यांची सुधारणा झाली.

याप्रमाणें जातिभेद आणि गुलामगिरी यांत सारखेपणा दिसत असल्याच्या योगानें असा भरवसा मानण्यास जागा आहे कीं गुलामगिरी नाहींशी झाल्याप्रमाणें जातिभेदही नाहींसा होईल. आतां प्रश्न इतकाच आहे कीं तो कसा नाहींसा होईल? आह्मी ह्मणतों कीं तो उंच जातीचे लोक हलके स्थितींत आल्यानें नाहींसा होणार नाहीं, तर हलके जातीचे लोक उदयास येण्याच्या योगानें नाहींसा होईल. या नवीन पाचव्या वर्णानें इतर च्यार वर्णांस हलकें केल्यानें त्यांच्याशी लढण्यांत आपणास हें अवश्यक आहे कीं स्वसन्मान संरक्षणावर आपण नजर ठेविली पाहिजे ह्मणजे तेंच आपणास राजकिय कारभार संबंधांत जें आपलें दुर्दैव आहे तें दाखवूं शकेल. राजकीय व धर्मसंबंधी इतिहासावरून हलके वर्णाचे लोक उच्चतेस येऊं लागण्याचें काम अर्धें सुमार झालें असें दिसत आहे. आतां साऱ्यांचें ऐक्य होणें शेष राहिलें आहे तेंही लवकरच होईल. हल्लीं आपले देशांत शूद्र कोणी नाहीं. जे सर्व लोक आपण आहों ते वरच्या तीन वर्णांचे आहों. शूद्रवर्ण जो मागें होता तो दासाचा ह्मणजे गुलामांचा होता. मनुस्मृति व दुसरे कित्येक शास्त्र ग्रंथ यानीं शूद्रांना फक्त सेवाधर्म सांगितला आहे व त्यांना कोणताही संस्कार सांगितला नाहीं यावरून हल्लीं ज्यांनां आपण शूद्र ह्मणतो त्यांनां सदरील दोन्ही गोष्टी लागू नाहींत हें उघड आहे. कारण ते दास किंवा गुलाम नाहींत, व ब्राह्मणाकडून त्यांचे धर्मसंस्कार यथास्थित होत असतात व नुसते धर्म संस्कार ब्राह्मणद्वारा होतात एवढेंच नाहीं ब्राह्मण लोकांनीं मराठे, माळी, सुतार, सोनार आणि चांभार लोकांस देखील यज्ञोपवीत धारणाची दीक्षा दिलेली आहे त्यावरून ते शूद्र नसून वरच्या ३ वर्णांत जन्मा आहेत असें स्पष्ट ठरतें. आतां इतकें मात्र झालें पाहिजे कीं हलके जातीचे लोक उच्चत्वास येण्याबद्दल ज्याना त्रास वाटतो त्यांनीं कृपाकरून ती वृत्ति सोडून दिली व ब्राह्मणाची निर्भत्सना करण्याचें सोडून दिलें व त्यांच्या भिक्षावृत्तीवर आणि धर्मकर्मावर कटाक्ष ठेविला नाहीं, व शूद्र ज्यांनां ह्मणतात ते आतां शूद्र नाहींत, उंच वर्णाचे आहेत, त्याना वेदाधिकार व धर्मकर्माधिकार आहेत असें स्वतां व मित्रमंडळीकडून त्यांनां वारंवार सांगितलें तर इच्छित हेतूला त्यांकडून मोठें सहाय होईल. याप्रमाणें न करतां कित्येक लोक खरोखरी शूद्र नसून आपणास शूद्र समजतात व हलकेपणा आपणाकडे ओढून घेतात ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. सर्व हिंदुस्थानांतून शूद्रजाति नाहींशी झाली व जे लोक हल्ली आहेत ते त्रिवर्णाचे असून ते सर्व द्विज आहेत असें सर्वांस महशूर झालें ह्मणजे बराच मोठा कार्यभाग साधला असें होईल. पहिल्या तीन वर्णांत जो निराळेपणा आहे त्यांत कांहीं अंतर नाहीं असा तो आहे व त्या निराळेपणास कांहीं शास्त्राधार नाहीं, सबब तो इंग्लिश राज्याधिकाराचे योगानें व धर्माविषयीं अधिक आवेश बाळगल्यानें लवकर नाहींसा होणार आहे. तर ही गोष्ट सर्वांस समजावी व त्यानीं तिचा आदर करावा ह्मणजे त्यांनां सुलभरीत्या इष्ट कार्य सिद्धीस नेण्यास कांहीं अडचण येणार नाहीं.

---

**लढाई**— रशियासारख्या प्रबल राजानें तुर्कस्थानाशीं लढाई आरंभली तिला दोन महिने झाले तरी अजून घोर रण माजलें नाहीं, उगीच छांछूं चाललें आहे व कित्येक वेळां त्यांत रशियाचा पराभवही झाला आहे, असें आहे तर मग ही लढाई उकरून काढण्याचें कारण काय? असा बहुत लोक प्रश्न करितात. पण ही मुत्सदगिरीची गोष्ट आहे ह्मणून तिच्या आंतील बाहेरील सर्व योजना लोकांस कळतील असें नाहीं सबब त्या विषयीं आतांच कांहीं सांगवत नाहीं. पण तुमुल युद्धाचें वर्तमान अजून कांहींच नाहीं व तें केव्हां होईल या विषयींही कांहीं नेम नाहीं. सल्याविषयीं बातम्या होत्या त्याबद्दल हल्लीं असें लिहून आलें आहे कीं सल्ला करण्याची रशियाची इच्छा नाहीं व त्यांचे राज्यांत त्या गोष्टीविषयीं वार्ताही नाहीं. तूर्त रशियन फौजेचा दोन ठिकाणीं वेध आहे. युरोपांत डान्यूबनदी ओलांडून तुर्कस्थानांत शिरावें व एशिया मैनरमध्यें कार्सचे किल्ल्याजवळ लढाई करून इकडील तुर्कस्थानही पादाक्रांत करावें असा कावा आहे पण काय घडेल तें खरें.

---

## वऱ्हाड

---

हैदराबादेहून असें वर्तमान आलें आहे कीं, १४ वे तारखेस अलिशान रेसिडेन्ट साहेब महाबळेश्वराहून तेथें गेले, त्यांस स्टेशनावर भेटण्याकरितां दिवाण साहेब सर सालरजंग व फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट मे० स्मिथ साहेब व पेशकार साहेब असे दिवाण साहेबांच्या घोड्याच्या गाडींत बसून गेले असतां अकस्मात घोडे उधळले व बेफाम पळाले, त्यांस आवरण्याकरितां मागून स्वार धावले पण त्यांस पाहून ते अधिक चवताळले व शेवटीं बाजारच्या एका लहानशा रस्याच्या कोपऱ्यावर जाऊन एका घराला थबकले. त्याच्या धक्यानें तें घर पडलें तेव्हां त्याच्या गल्हाऱ्यांत गाडी अडकली तेव्हां थांबली, पण दोन घोडे ठार मेले, गाडीवाला व दुसरा गडी यांस जखमा झाल्या, व पाठीमागले बैठकीवर पेशकार बसले होते त्यांसही जबर लागलें. ईश्वरकृपेनें दिवाण साहेब व स्मिथ साहेब यांस फारशी दुखापत झाली नाहीं. मागें दिवाण साहेबांचे गाडीचे घोड्यांनीं अशीच मस्ती केल्याचें आम्ही ऐकिलें होतें तर असे जलाल घोडे बाळगून जीवावर धास्ती आणून घ्यावी, त्यापेक्षां थोडे कमी पाणीदार घोडे असले तर चालणार नाहींत कीं काय तें आह्मास समजत नाहीं. आम्ही इच्छितों कीं, त्यांस आपल्या जीवाची परवा नसली तरीं साऱ्या राष्ट्राचे हिताकरितां व निष्काळजी करितां त्यांनीं सामान्य प्रतीचे घोडे वापरावे किंवा घेतात त्याहून अधिक खबरदारी घ्यावी.

---

खान बहादूर नवाब शाबुद्दीन साहेब अऱ्याची यांस आसिस्टंट कमिशनर करितांना मि० किट्स साहेब यांचा हक्क पाहिला गेला नाहीं असें हिं० सरकारच्या मागाहून लक्ष्यांत आल्यावरून त्यांनीं ती नेमणूक बदलली. असें दुर्लक्ष लोकांच्या विनाकारण अपमानास साधन होतें सबब पुढें असें होत जाऊ नये हें चांगलें.

---

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं एथील एक सभ्य वकील रा. रा. केशव यादव हे बरेच दिवस आजारी होते ते गुरुवारीं मरण पावले.

---

एथें इंजिनियर खात्यांत तीस तीस रुपयाच्या ३।४ जागा होणार होत्या त्याकरितां सुमार १२५ लोकांचे अर्ज झाले होते इंजिनियर साहेबानीं एकच जागा ३० रुपयांची करून दोन वीस वीस रुपयाच्या केल्या.

---

अकोटास एका कुणब्यानें आपली बायको वाईट कामांत आढळल्यावरून तिचा गळा कापला. सदहू मनुष्य दोन दिवसांपूर्वीं पोलिसानें पकडून एथें आणला.

---

इकडून नोटा गेल्या होत्या त्या बदला उमरावती खजिन्यांतून ७ लक्ष रुपये चार दिवसांपूर्वीं एथें आले.

---

खामगावास येका रंगाऱ्याचे ३ वर्षांचे मुलाचे अंगावर सुमार २५ रुपयांचे रुप्याचे दागिने होते तेवढ्याकरितां कोणी दुष्टानें त्यामुलास नेऊन त्याचे डोकें दगडानें ठेचून दागिने काढून घेतले. पोलिसाचे तपासांत मूल जिवंत सापडलें, गुन्हेगार अजून सापडला नाहीं.

---

फत्तेखेलड्याहून १३ वे तारखेचें पत्र आलें आहे कीं मृगाचे ३ पर्जन्य साधारण मानानें पडले. सर्कीच्या पेरण्या क्वचित सुरू आहेत, रोगराई नाहीं, धारण महाग असून वैरण फार महाग होत चालली आहे तेणेंकरून जनावरांचा उपास मारा आहे.

---

अकोल्यास गुरुवारीं रात्रीं थोडा पाऊस पडला व काल शनिवारीं पहाटें ४ वाजल्यापासून ९ वाजेपर्यंत मोठा धुवाधार पाऊस पडला. तेणेंकरून हवेंत थंडावा येऊन लोकांच्या तोंडावर टवटवी आली आहे. आतां पेरण्याचें काम झपाट्यानें चालेल. नदीलाही काल नवें पाणी थोडें आलें होतें.

---

एथील उर्दूअकबार छापखाना व त्यांतील दोन्ही भाषेचीं वर्तमानपत्रें त्यांचे मालक या महिना अखेर बंद करणार, असें त्यानीं गेल्या आठवड्याच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें आहे, तरी गावांत अशी वार्ता आहे कीं, दुसरे कोणी गृहस्थ तो कारखाना घेऊन पूर्ववत पत्रें चालविणार आहेत तसें झाल्यास फार चांगले होईल.

---

मि० फ्रव्हेस्ट जंगल खात्याचे असिस्टंट कन्सरवेटर यांस ३ तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

गल्हाची धारण १६ शेराहून कमी आहे सबब आठ व आठाहून कमी रु. पगाराचे सरकारी नोकरास महागाई भत्ता मिळण्याचा ठराव झाला आहे. तरी हा भत्ता तहशिलींतील शिपाई व पोलिस कानस्टेबल यांस मिळणार नाहीं असें रे० आ० मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

शिगाव एथें २१ वे तारखेस सायंकाळीं ५ वाजल्या पासून ८ वाजेपर्यंत मोठा पाऊस पडला. व ६ वाजतां वीज पडून रामरेखा मारवाडी याचे २ मुलगे बारा व सोळा वर्षांचे मरण पावले— याच दिवशीं याच वेळेस खामगाव तालुक्यांत हिंगणे एथें देवीचे देवळावर वीज पडली तेणें करून एक कुणबी ठार मेला व एक बेशुद्ध झाला. उन्हाळखेडे गावींहीं एक महाराचे घरावर याच वेळीं वीज पडून तो व त्याचे बकरीचीं दोन पिलें मरण पावलीं. या अनर्था बद्दल आह्मांस फार वाईट वाटतें.

---

रा. रा. लक्ष्मीपति बारिस्टर यांस जागा मिळावी या संबंधानें दुसरे पृष्ठावर पत्र आहे तें पहावें.

---

## वर्तमानसार

---

मिस डोनेली इला हाय कोर्टानें निर्दोष केलें. त्यांनीं ठरविलें कीं, नवा पुरावा कांहीं नसतां माजिस्त्रेटानें सोडून दिलेला मुकद्दमा पुन्हा चालविला हें गैरकायदा होय.

मि० अशबर्नर साहेब रिविन्यू कामिशनर यांस मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सलर नेमिलें.

सोलापुरास तारीख १६ रोजीं रात्रीं १० वाजून १५ मिनिटांनीं पर्जन्यास सुरुवात होऊन १॥ तास भर पाणीच पाणी होऊन गेलें. व पुढें सर्व रात्रभर झिप झिप चालू होती. मृग सुरू झाल्यापासुन जे पर्जन्य पडले त्यांत हा उत्तम झाला.

तुळजापुराकडे पर्जन्य पुष्कळ पडल्या कारणानें सोलापुराजवळ एकरुके तलावांत ९। फूट पाणी जास्त जहालें आहे.

विजापुराकडे बराच पर्जन्य पडला.

पंढरपुर एथील पुअर हौसांत हल्लीं २ हजारपर्यंत अनाथ लोकांची संख्या आहे.

मुलांच्या भाकरी व दूधखान्याकरितां बडोद्याहून सर टी माधवराव यांजकडून ७ शें रुपये नवीन वर्गणी आली. क. त

इजिप्तमध्यें गुलामाचा व्यापार चालू आहे व हा व्यापार तेथील सरकार मोडण्याविषयीं आह्मी होईल तितका प्रयत्न करणार असें ह्मणतें. परंतु हल्लीं असें कळतें कीं, इजिप्त सरकारचे हुकुमानें सदर्हू व्यापार सुरू आहे नुकतेंच कांहीं दिवसां पूर्वीं इजिप्त देशची राजधानी केरो एथें ३०० बायका भर बाजारांत विकल्या. ही बातमी इंग्रज सरकारास कळली असून इंग्रज सरकार त्या विषयीं चवकशी करणार ह्मणून कळतें. आ. व.

पुणें म्युझिअम कमेटी – दुष्काळामुळें चालू सालीं या कमेटीनें प्रदर्शन करण्याचा बेत रहित केला आहे. व खालीं लिहिलेले पदार्थ जे कारागीर उत्तम प्रकारचे करून देतील त्यांस बक्षिसें देण्याविषयीं जाहिरात प्रसिद्ध केली आहे ती अशी–

श्री. होळकर सरकाराकडून बक्षिस रुपये १०० दक्षिणेंतील किंवा माळवे प्रांतांतील उत्तम तऱ्हेच्या कापसाचा नमुना जो हजर करील त्यास सदर्हू बक्षीस मिळेल. श्री० सर. टी. माधवराव यांजकडून बक्षिस रुपये ७० पत्र लॉकप्रमाणें मोठीं, लहान व मध्यम कुलुपांचे नमुने तयार करून देणारास सदर्हू बक्षिस मिळेल.

म्युझिमम कमिटीकडून बक्षिसें ६

१. या देशांतील निरनिराळ्या रंगाची माती. जशी गेरू, पिवडी, शाडू, काळी माती वगैरे यांची माहिती ह्मणजे अशा रंगाची माती कोणकोणते ठिकाणीं पुष्कळ आहे व त्या मातीचे कोणते उपयोगी पदार्थ करितां येतील त्याचे नमुने करून लेखी वर्णन सुद्धां हजर करणें........१००

१. या देशांतील वेगळाल्या दगडाचें वर्णन. जसे पोरबंदर दगड, कुरुंद स्लेटीचे दगड, छापण्याचे दगड, शहाबादचे दगड, संगमरवरी वगैरे हे दगड कोणकोणते ठिकाणीं पुष्कळ आहेत. त्याचे उपयोगी पदार्थ कोणते करता येतील त्याचे नमुने व लेखी वर्णन हजर करणें १००

१. या देशांतील निरनिराळ्या जातीचीं लाकडें. जसें, तुत्याचें लाकुड, पांढरीचें लांकूड, पेन्सलीचें लाकूड, देवदार वॉक्स उडासारखें व महागनीसारखें. वगैरे. अशीं लांकडें पुष्कळ कोणकोणते ठिकाणीं सांपडतील व त्यांचे उपयोगी पदार्थ कोणते होतील, त्यांचे नमुन्यासह लेखी वर्णन हजर करणें १००

१ या देशांतील निरनिराळ्या जातींचे गवत व झाडांच्या रंगीबेरंगी पातीं जसें लव्हाळा, शिंदी नारळी वगैरे अशी गवतें व झाडांच्या पाती कोणते ठिकाणीं पुष्कळ मिळतात व त्यांचे कोणते उपयोगी पदार्थ करतां येतात त्यांचें नमुन्यासह लेखी वर्णन हजर करणें १००

१. बिलोरी बांगड्या पैलूदार करून हजर करणें २५

१. रोशेल [ तेल ] व जवसाचें तेल काढणें व तें उपयोगी पडण्या जोगें करण्याची कृति लेखी लिहून नमुन्या सुद्धां हजर करणें २५

ने. ओ.

---

## कोहिनूर.

कोळसा आणि हिरा हे एकाच द्रव्यापासून झाले आहेत हें ऐकून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं ? तरी वस्तुतः हे दोन्ही पदार्थ एकच आहेत. रसायन शास्त्राच्या अभ्यासानें आपणास अशा गोष्टी कळतात कीं, त्यांचा संभव आपल्या स्वप्नींही आला नसेल. पदार्थ कोणतीं द्रव्यें एकत्र होऊन झाले आहेत, याचा शोध जितका अलीकडे झाला आहे, तितका पूर्वीं झाला नव्हता. काय चमत्कार बघा ! ज्या हवेवाचून आपला जीव रहाणार नाहीं, त्या हवेची आणि नैत्रिक आसिड ह्मणून एक क्षार आहे त्याचीं मूलद्रव्यें एकच होत. आपल्या अन्नाचे आणि पुष्कळ विषांचे घटकावयव एकच आहेत! कापडाच्या चिंध्यांपासून साखर करतां येतें ! जळत असला ह्मणजे मात्र ज्यापासून तेज निघतें, ज्याला घाण येते, ज्यापासून धूर उत्पन्न होतो, व काळा, अमंगळ आणि घाणेरडा दिसतो असा कोळसा आणि ज्याचे अप्रतीम तेज अक्षयीं सभोंवार पसरतें, ज्यासारखा पांढरा पदार्थ दुसरा नाहीं, जो निर्मल, चकचकीत आणि सुंदर दिसतो, असा दिवा; या दोन्ही पदार्थांचें बाह्यरूप मात्र वेगळें, परंतु अंतरंग स्वरूप एकच; असें समजलें ह्मणजे केवढा अद्भुत चमत्कार वाटतो !

या दोन्हीं पदार्थांचें मूळ द्रव्य एक. सर्व लाकडांच्या आणि प्राणीमात्रांच्या अंगभूत असें एक मूलद्रव्य आहे, त्यास "कार्बान" असें इंग्रजींत ह्मणतात. लाकडाचा कोळसा होतो. तो अशुद्ध कार्बान होय. परंतु हिरा हा शुध्ध कार्बान होय. कोळसा आणि हिरा यांचे मूळभूत द्रव्य एक असतां त्याचे गुणधर्म भिन्न झाले याचें कारण कळत नाहीं. कदाचित परमाणूंची रचना भिन्न भिन्न असावी.

हिंदुस्थानांत हिरे सापडतात अशी पूर्वींपासून प्रसिद्धी आहे. हिऱ्यापासून तादृश उपयोग जरी नाहीं, तरी त्याच्या सौंदर्यानें आणि दुर्मीळतेनें त्यास अतिशय मूल्य आलें आहे. फ्रान्स देशांत एक मोठा हिरा आहे, तो पूर्वीं मद्रासचे गवरनर मि० पिट यांणीं दोन लाख रुपयांस घेतला, तो साडेबारा लाखांस विकला. त्याची किंमत आतां चौदा लाखांवर करितात.

रशियाच्या बादशहाजवळ एक हिरा आहे, तो चमत्कारिक रितीनें तिकडे गेला. असें ह्मणतात कीं, तो आपल्या या देशांतील एका मूर्तीच्या डोळ्यांत बसविला होता; त्याचें अप्रतीम तेज पाहून एका फ्रेंच सरदारानें तो चोरण्याचा निश्चय केला, आणि भटाचें सोंग घेऊन तो त्या देवळांत राहिला. एकदा पूजा करीत असतां त्यानें तो हिरा काढून घेऊन त्या जागीं कांचेचा डोळा बसविला ! याप्रमाणें चोरी करून स्वारी पळाली, आणि त्यानें आपल्या समजुतीप्रमाणें मोठ्या किमतीस तो हिरा विकला. त्याचें स्थलांतर होत होत रशियाची "कायेरीन" ह्मणून एक बादशाहीण होती, तिच्या तो हातीं गेला. तिनें तो नऊ लाखांस विकत घेतला, आणि याशिवाय विकणारास मरेपर्यंत ४०,००० रुपयांचें वर्षासन करून दिलें.

हिरा हा शुद्ध कार्बान आहे असें ह्मटलें तेव्हां, तो जळतो अशी वाचकांची कल्पना झाली असेल. नुसता आक्सिजनवायू घालून हिरा जाळला असतां त्याचे तेज बरेंच दिपवणारें असतें. अधार कोठडींत जर हा प्रयोग केला तर आकाशांत जसा तारा चमकतो त्याप्रमाणें हिऱ्याचें तेज चोंहोकडे फाकतें.

कोहिनूर याचा मूळ अर्थ 'तेज:पर्वत' असा आहे. या तेजोराशी हिऱ्या इतका मूल्यवान् हिरा या पृथ्वींत दुसरा नाहीं या हिऱ्याचा एक इतिहासच आहे. हा प्राप्त करून घेण्यास किती एक राजांनीं लढाया केल्या, आणि या करितां रक्ताचे पूरही वाहिले. हा हिरा २००० वर्षांपूर्वीं सापडला. पुढें मुसलमानी अंमल दक्षिणेंत झाल्यावर हा गोवळकोंडच्या बादशहाच्या हातीं गेला. पुढें दिल्लीचा बादशहा शहाजहान यानें आपला हात दक्षिणेंकडील मुसलमानाचे राज्यव्यवस्थेंत घातला तेव्हां गोवळकोंड्यास कुतुबशहा बादशहा होता. कुतुबशहा याचा वजीर मीर जुमला हा फार शहाणा होता व यास हिऱ्याची पारख फार चांगली असे. शहाजहान बादशहाचीही कमी नव्हती. या बादशहाविषयीं तर अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं पुढें याचा मुलगा औरंगजब यानें यास पदच्युत करून कैदेंत ठेविलें होतें, तेव्हां एका लालाची परीक्षा कोणाच्यानेंही होईना ते व्हां तो लाल याजकडे तुरुंगांत पाठविला तेव्हां त्याची किंमत त्यानें केली! असो कुतुबशहाचे आणि मीर जुमलाचें वाकडें पडलें, तेव्हां शहाजहाननें वजीराचा पक्ष उचलला त्याजबद्दल वजीरानें शहाजहानास हा कोहिनूर हिरा दिला. हा हिरा मोंगल बादशहापाशीं सन १७३९ पर्यंत होता. त्या वर्षीं इराणचा बादशहा नादरशहा यानें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लींतून अपार द्रव्य लुटून नेलें त्यांत हा कोहिनूर हिराही गेला. या हिऱ्याचा असा कांहीं चमत्कार दिसतो कीं ज्याजवळ तो जावा त्यास सार्वभौमत्व प्राप्त व्हावें. पहा पुढें नादरशहा यास त्याच्याच एका मनुष्यानें ठार मारलें तेव्हां त्याचा सरदार अहमदशहा हा नादारशहानें लुटून आणलेलें द्रव्य घेऊन पळाला. यानें मोठें एक राज्य स्थापिलें. अहमदशा अबदाली हा मराठ्यांचे इतिहासांत प्रसिद्ध आहे. यानें दुराणी राज्य स्थापिलें, तो इतका प्रबल झाला कीं त्यानें मराठ्यांस जिंकून मोंगल बादशहास पुन्हा दिल्लीच्या तक्तावर बसविलें.

हा हिरा दुराणी घराण्यांतच या शतकाच्या आरंभापर्यंत होता. जमान शहा ह्मणून दुराणी बादशहा होता त्यास त्याचा भाऊ शहासुजा यानें १८०८ त कैद केलें, आणि त्याची संपत्ति सर्व लुटली, परंतु तींत हिरा नव्हता. शेवटीं जमान शहाला ज्या वाड्यांत कोंडून ठेविलें होतें, त्याच्या एका भिंतींत लपवून ठेविलेला सापडला. शहासुजा उजव्या हातांत पोंची घालीत असे, तींत कोहिनूर त्यानें बसविला होता.

पुढें शहासुजास काबूल येथून हाकून दिलें त्यावेळीं त्याजवळ दुसरें कांहीं नव्हतें. हा हिरा मात्र घेऊन पळाला. तो रणजीतसिंग शीक लोकांचा राजा याजला शरण गेला. शहासुजा जवळ हिरा आहे असें कळतांच रणजीतसिंगास त्याचा लोभ सुटला, आणि त्याजपाशीं मागणी केली. दुराणी राजपुत्रानें नाना तऱ्हा केल्या पण व्यर्थ. सन १८१३ च्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस रणजीतसिंग आणि शहासुजा यांची एका वाड्यांत आधीं ठरविल्या प्रमाणें मुलाखत झाली. दोघेही खालीं बसले. अगोदर कोणीच बोलेना, असें कांहीं वेळ चालल्यावर रणजीतसिंगानें इशारा केल्यावरून त्याच्या जवळच्या सरदारानें शहासुजास सूण केली. तेव्हां शहासुजानें जवळच्या नोकरास खुणावलें. त्या बरोबर त्यानें आंत जाऊन एक पुडी आणिली आणि दोघे बसले होते त्यांच्या मध्यें ठेविली. पुढें दोघांतून कोणीही बोलेना शेवटीं रणजीतसिंगाच्या संज्ञेवरून ती पुडी उघडली तों कोहिनूरच्या अप्रतीम तेजानें आणि सौंदर्यानें सर्वांचे नयन दिपले!

पुढें रणजीतसिंगाचें आणि इंग्लिशयांचें युद्ध झालें. त्याअंतीं कोहिनूर हिरा इंग्लिशांचे ताब्यांत गेला. तो हल्लीं महाराणी विक्टोरिया यांपाशीं आहे. सन १८५१ सालीं लंडन एथें "क्रिस्टलपालेस" नामक इमारत बांधून तेथें सर्व जिनसांचें प्रदर्शन झालें, त्या वेळीं कोहिनूर हिरा लोकांस दाखवायास सरकारानीं दिला होता. त्या प्रसंगीं लक्षावधी लोकांच्या तो दृष्टीस पडला. जो हिरा लुटून किंवा युद्ध करूनच पूर्वीं एक दोघांच्याच दृष्टीस पडत असे तो या सुधारलेल्या युगांत लढाई न करितां लाखो लोकांच्या दृष्टीस पडला.

कोहिनूर एवढा हिरा आज पृथ्वींत नाहीं. तो लहानशा अंड्या एवढा आहे. याचें वजन पूर्वीं सातशें कारटवर होतें, परंतु वरचेवर कापल्यानें याचें वजन आतां एका ग्रंथकाराच्या मतें २७० कारट आहे. दुसरा ग्रंथकार ह्मणतो कीं, १०३ कारटच वजन आहे. याचें असें ही ह्मणणें आहे कीं, मूळच्या कोहिनूरचे अकस्मात तीन तुकडे झाले. एक सध्याचा कोहिनूर, दुसरा रशियाच्या बादशहा जवळ हिरा आहे तो, व तिसरा दर्यावनूर ( ह्मणजे तेजोनिधी ) रशियाचे बादशहाजवळ जो हिरा आहे त्याचें वजन पहिल्या ग्रंथकाराच्या ह्मणण्याप्रमाणें १९० कारट आहे, व फ्रान्समध्यें आहे त्याचें सारें १३०कारट आहे.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.